साप्ताहिक


# माणूस

२५ सप्टेंबर ८२
दोन रुपये

## महात्म्याशिवाय तुम्ही स्वातंत्र्य मिळवू शकला नाहीत, तर ते टिकवूही शकणार नाही, हे लक्षात ठेवा

— त्यांच्यातल्या राजकारण्याने संतावर मात केल्याचे मला स्पष्ट दिसले

— विल्यम शिरर



व्यक्तिमत्व घडवायचंय ? मग तुम्हाला 'नाही' म्हणता यायला हवं. नकार देण्याचंही एक शास्त्र आहे...

उरुळीकांचन ते बाईफ इंटरनॅशनल
— मणिभाई देसाई



साप्ताहिक

# माणूस

¤

**वर्ष : बाविसावे**

**अंक : सोळावा** १८

**२५ सप्टेंबर १९८२**

**किंमत : दोन रुपये**

¤

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

¤

सहाय्यक

**दिलीप माजगावकर**

**सौ. निर्मला पुरंदरे**

¤

वार्षिक वर्गणी

**पन्नास रुपये**

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

**मुखपृष्ठ**

अनंत सालकर

¤

## सप्रेम नमस्कार

¤ आपल्या साप्ताहिकाचा मी एक जुना नियमित वाचक आहे. आज पत्र लिहिण्याचे कारण आपल्या साप्ताहिकाचा वाढत गेलेला दर रु. २|– म्हणजे सामान्य वाचकाला डोईजडच. वाचायची आत्यंतिक इच्छा व आपल्या अंकाचा बिनतोड दर्जा यामुळेच केवळ मी हे अंक विकत घेऊ शकतो.

आज मुंबईत आपल्या साप्ताहिकाच्या दर्जाचे मराठी साप्ताहिक नाही यात मला शंका नाही. याबद्दल मी आपले अभिनंदन करतो; परंतु किंमतीबद्दल बघा की काही तरी ! कारण आम्हाला दुसरेही बरेच वाचायचे असते.

६ सप्टेंबर — **रमेश वामन परांजपे**, मालाड

¤ 'जॉन मॅकेन्रो...' ही जाहिरात वाचून धक्काच बसला. क्रीडाविषयक लेख म्हणजे कोणत्याही विषयावरचा पानपूरक लेख नव्हे. 'माणूस'कडून ही अपेक्षा नव्हती. भारतीय क्रीडाजीवनाशी जॉन मॅकेन्रोचा काय संबंध? तुमचे साप्ताहिक काही क्रीडाविषयाला वाहिलेले साप्ताहिक नव्हे. क्रीडाविषयक लेख जरूर हवेत; पण त्यांची निवड फार चोखंदळपणे होईल असे मात्र वाटत होते. याचा निषेध म्हणून मी ११ सप्टेंबरचा अंक विकत घेणार नाही. (नशीब, मी वर्गणीदार नाही !)

तुम्हाला लेखकांची व विषयांची वानवा नसावी असे गृहीत धरून हा निषेध नोंदवीत आहे. आपण त्यामागील भावना जाणाल अशी आशा आहे.

६ सप्टेंबर — **शि. जि. शिर्के**, चिपळूण

¤ दिनांक ४-९-८२ च्या अंकातील 'स्वातंत्र्य आणि जबाबदारी' हा अग्रलेख विचार-स्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्यांना विचार करण्यासारखा !

दिनांक ११-९-८२ च्या अंकातील टेनिसपटू मॅकेन्रोवरील द्वारकानाथ संझगिरीचा क्रीडालेख आवडला.

शेवटी 'महात्मा आणि माणूस' या गांधीजींच्या जीवनावरील घटनांची अनुवादरूपाने अभ्यासपूर्ण माहिती देत असलेल्या निखिल वागळे यांचे अभिनंदन.

१० सप्टेंबर — **वसंत दातार**, मुंबई

¤ 'दोन कॉम्रेड्स' वाचून भारावून गेलो. शेजारींना मुद्दाम सक्तीने वाचावयास भाग पाडले. पार्टीत काम करीत असतानाचे अनेक चेहेरे नजरेसमोरून धावत गेले. परवा यवतमाळला योगायोगाने गेलो होतो. गंजपेठेत, यवतमाळला अजूनही दारिद्र्याशी सामना करीत ताठ उभे असलेले कॉम्रेड्स आठवले. पु. लं. नी त्यांची पुस्तिका काढण्याची सुरेख सूचना केली आहे. मला वाटते त्याच पुस्तिकेत मागे आपण उत्तर प्रदेशातल्या अशाच एका सर्वोदयी कार्यकर्त्यांची कहाणी मुद्रित केली होती, तिचा समावेश करावा.

११ सप्टेंबर — **रतनलाल भंडारी**, रत्नागिरी.

¤ आपले आताचे रंगीत मुखपृष्ठांचे अंक आकर्षक वाटतात. त्यातील बरीचशी सदरे मी हल्ली आवडीने व आठवणीने वाचू लागले आहे. आमचे आवडते सदर म्हणजे खेळाचेच असणार. आतापर्यंतच्या अंकांतील रवी शास्त्री, कपिलदेव, संदीप पाटील यांचे लेख वाचनीय होतेच; परंतु विशेष करून आपला ११ सप्टेंबरचा अंक विशेष आवडला. त्यातील सर्वच लेख अगदी मनापासून वाचले. मुखपृष्ठ फारच छान होते. मॅकेन्रोवरचा लेख तर खूपच आवडला. वरील खेळाडूंच्या जोडीने त्याचा खेळसुद्धा आवडीने पहाते. कमलाकर सारंग यांची मुलाखत, शेवटचे अणुबाँबवरचे सदर आवडले. असेच खाद्य आम्हाला सतत पुरवत रहावे.

११ सप्टेंबर — **अश्विनी गोडे**, दादर.

¤ आपला ११ सप्टेंबरचा अंक एकदम टॉप! 'माणूस'मध्ये पुष्कळ वेळा अप्रकाशित परंतु

वरच्या दर्जाचे लेखक आपले साहित्य पाठवीत असतात. 'दोन कॉम्रेड्स'बद्दल मी जास्त लिहू शकत नाही. कारण मराठीतले दोन जायंट्स पु. ल. देशपांडे व विजय तेंडुलकर यांनी खास लिहिलेच आहे.

स्वामी धीरेंद्रवरच्या लेखाने मुग्ध केले. श्री. सुरेश खऱ्यांची कुठलीही मुलाखत, मुलाखत वाटतच नाही. त्यामुळे त्यांच्याबरोबर त्या व्यक्तीच्या सान्निध्यात बसल्यासारखे वाटते. वातावरण एकदम घरगुती वाटते. माझ्या मते दुसऱ्या कुठल्याही नाटककाराने सतत अशा घरगुती गप्पा मारल्या नसाव्यात.

माणूसच्या (बहुतेक) मोठ्या लेखांची शीर्षके तर विचारूच नये !

माझ्या वतीने श्री. द्वारकानाथ संझगिरी यांना सप्रेम नमस्कार प्रविष्ट करणे. आपण एकदम खूष आहोत. मला स्वतःला टाइम्स ऑफ इंडियाचे खास समीक्षक के. एन. प्रभु फार आवडतात. ते फार Poetic लिहितात व दुसरे ऑस्ट्रेलियन समीक्षक ब्लोफील्ड; परंतु श्री. संझगिरींनी पण बाजी मारली बुवा !

मला वाटले संझगिरींचा अभ्यास फक्त कपिलपुरताच होता; परंतु मॅकेन्रोवरचा लेख पण तसाच आहे. वाईट एवढेच वाटते की, त्यांनी बोर्गचापण काय चिकणा परिचय करून दिला असता !

असेच 'माणूस'मध्ये सतत 'टॉप' वाचावयास मिळू दे हीच इच्छा !

१३ सप्टेंबर — वा. र. गोडे, दादर

## सीता रावणाची मुलगी ?

◻ माणूसचे सर्वच अंक हल्ली वाचनीय असतात. अमृत पुरंदरे यांचे लेख फारच चांगले आहेत. म. गांधींचे चरित्र प्रसिद्ध करीत आहात याचा आनंद वाटला. अशाच पद्धतीने काही जुन्या क्रांतिकारकांच्या आयुष्यांची ओळख करून द्याल तर 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले' हे नवीन पिढीला पटेल.

आपल्या ७ ऑगस्ट अंकातील राम-सीतेची नवीन गोष्ट वाचली. मी मागे एकदा रामेश्वरला गेलो होतो. तेथील एका प्रमुख उपाध्यायांनी राम–सीतेची वेगळ्या प्रकारची गोष्ट सांगितली. ती अशी—

रावणाच्या लंकेतून सीतेला सोडवण्याकरता श्रीराम वानरसैन्यासह रामेश्वरला आले. त्या वेळी या गावाचे नाव वेगळे असले पाहिजे.कारण रामाने तेथे लंकेला जाण्यापूर्वी शिवाची पूजा केली. तेव्हा या स्थळाला रामेश्वर हे नाव पडले असावे. लंकेला जाण्यापूर्वी शिवाची पूजा करून त्यांना प्रसन्न करून घ्यायचे होते. कारण रावण हा शिवभक्त ब्राह्मण होता व त्याचा वध करायचा म्हणजे शिवाचा आशीर्वाद असणे अवश्य होते. श्रीराम क्षत्रिय होते. तेव्हा पूजेकरता ब्राह्मण हवा होता. त्यांना रावणाचे नाव सांगितले म्हणून त्यांनी रावणाला निरोप पाठविला. रावण शिवपूजेला कधीही नाही म्हणत नसे. तो आला व त्याने रामाला सांगितले की, तुझी पत्नी जिवंत असताना एकट्याने पूजा करणे बरोबर नाही. तेव्हा त्याने सांगितले की, ती लंकेत आहे. तेव्हा रावणाने तिला आणविली व श्रीरामांनी यथासांग पूजा केली. तदनंतर पुन्हा तिची रवानगी लंकेला केली.

सीता ही रावणाची मुलगी होती. मंदोदरीपासून त्याला मुलगी झाली तेव्हा ज्योतिषाने भविष्य सांगितले की, हिच्यामुळे तुझा मृत्यु ओढवेल. तरी हिचा त्याग कर! मग रावणाने तिला पेटीत बंद केली व समुद्रात सोडून दिले व तिच्या रक्षणाकरता स्वतःचे शिवधनुष्य पेटीला बांधले. ही पेटी पुढे जनकाला सापडली व त्याने तिला आपली मुलगी म्हणून वाढवली. तिच्या स्वयंवराच्या वेळी रावण आला होता; पण त्याने जेव्हा शिवधनुष्य पाहिले तेव्हा त्याला कळले की, ही आपलीच मुलगी आहे. त्या वेळी त्याने शिवधनुष्याचा भंग न करता ते आपल्या अंगावर पाडून घेतले व तो निघून गेला. कारण स्वतःच्याच मुलीशी लग्न करणे त्याला शक्यच नव्हते.अन्यथा तो अत्यंत बलाढ्य होता व शिवधनुष्य सहज पेलून त्याने बाण लावला असता.

त्याला पुढे या मुलीचे लग्न रामाशी झाले हे माहीत नव्हते.अन्यथा त्याने तिला पळविले नसते; पण रावणाचा वध रामाकडून व्हायचा होता हे ठरलेले होते म्हणूनच रावणाने तिला पळविले. शेवटी ज्योतिषाचे भविष्य खरे झाले व श्रीरामांनी रावणाचा वध केला.

१४ सप्टेंबर — श्री. शं. लिमये, मद्रास

## पुणेवार्ता

# इतिश्री-सत्यकथा

सत्यकथेचा ऑगस्ट–८२ चा अंक नेहमीप्रमाणे प्रसिद्ध झाला. ऑगस्टचा अंक जरा वेगळा होता. ५५–५६ पानांवर संचालक श्री. पु. भागवत आणि संपादक राम पटवर्धन यांची दोन निवेदनं होती. भागवतांच्या निवेदनातली पहिली ओळ 'या अंकाबरोबर 'सत्यकथे'चे प्रकाशन बंद होत आहे' अशी होती. एकोणपन्नासाव्या वर्षाच्या दहाव्या अंकाबरोबर सत्यकथेची समाप्ती झाली ! कोणी सत्यकथेच्या 'अवतारसमाप्ती'-बद्दल लिहिलं, कोणी त्याला मंडईच्या मानाच्या गणपतीच्या जागी बसवलं. सत्यकथा जगवण्यासाठी कोणी प्रयत्न केले असतील अगर नसतील; पण आता 'हळहळ' व्यक्त करायला मात्र कोणी चुकले नाही.

बुधवार १५ सप्टेंबरला साहित्यपरिषदेच्या सभागृहात सत्यकथेचे संचालक व पूर्वसंपादक श्री. पु. भागवत यांच्या साक्षीनं आणि प्रा. वसंत कानेटकर यांच्या अध्यक्षतेखाली एक कार्यक्रम झाला. विषय—'सत्यकथेची इतिश्री' वक्ते – प्रा. स. शि. भावे, श्री. ग. माजगावकर, डॉ. अनुराधा पोतदार, ग. वा. बेहेरे आणि प्रा. अरविंद मंगरूळकर.

प्रास्ताविकात कानेटकर म्हणाले, 'मासिकं बंद पडणं ही काही नवीन घटना नाही. (खरं तर, चांगली मासिकं फक्त बंद पडण्यासाठीच निघतात) एखाद्या मासिकाच्या संपण्यामुळं बरेच लोक अस्वस्थ होतात, म. सा. परिषदेला त्यावर चर्चा आयोजित करावीशी वाटते, मान्यवर लेखक, संपादक त्यात भाग घेतात आणि रसिक लेखक–वाचक ते आस्थेनं ऐकायला येतात हेच सत्यकथेचं contribution आहे' सत्यकथेनं केलेल्या संस्कारांची आपण दखल घेतो आहोत हे

सुचिन्हच आहे' असंही ते म्हणाले.

नंतर अनुराधा पोतदार बोलल्या. 'सत्यकथेची समाप्ती ही इतकी नजीकची घटना आहे की, त्याचा पुरता perspective आत्ताच घेण्याबद्दल मी साशंक आहे,' अशा शब्दात त्यांनी आपली अवस्था व्यक्त केली. त्या म्हणाल्या, 'सत्यकथेच्या समाप्तीमुळं काय वाटलं? आश्चर्य, विस्मय आणि खंत! कारण गेल्या काही वर्षांत साहित्यिक जीवनाचं अंग असलेली सत्यकथा वैयक्तिक जीवनाचंच एक अंग बनली होती. सत्यकथेच्या समाप्तीतून उदास स्वीकारशीलतेचा प्रत्यय आला. सत्यकथा मराठी साहित्यजीवनाचा अपरिहार्य भाग असताना हे असं का घडावं? शेवटी शेवटी सत्यकथेची अटीतटीची झुंज चालली होती. या वेळी सत्यकथा अपरिहार्य आहे या मताच्या सुजाण वाचकवर्गाची संख्या पहिल्याइतकीच होती की, घटली होती याचा विचार करायला हवा. सत्यकथेतून तिच्या संचालक–संपादकांना मिळणारं जाणिवेच्या जागृतीचं, तृप्तीचं समाधान तितकंच अबाधित होतं का?

सत्यकथेच्या बंद पडण्याबद्दल अनुराधा पोतदारांनी शोधलेली कारणं चिंतनीय आहेत. त्या म्हणाल्या, 'गेल्या काही वर्षांत सत्यकथेतील वैयक्तिक अभिरुची आणि संपादकीय संतुलन याबद्दल माझ्या मनात शंका आहे. गेल्या काही वर्षांत सत्यकथेतून साहित्यिकांची पिढी घडत होती; पण त्याचा 'ठसा' मात्र उमटत नव्हता. त्या निर्मितीचे वाचकाशी काही संबंध, लागेबांधे जुळत होते किंवा काय याबद्दल माझ्या मनात शंका आहे. त्यामुळे वैयक्तिक अभिरुचीचा परिणाम सुजाण वाचकांवर हवा तसा झाला नाही असं वाटतं. तरीही साहित्यबाह्य प्रयोजनांचे अडसर बाजूला करून सत्यकथेने जी अभिरुची निर्माण केली ती बंद पडत असताना मराठी रसिकतेच्या कक्षा किती अरुंद आहेत याचंच भान सत्यकथेच्या समाप्तीतून आलं.'

नंतर प्रा भावे बोलले. सत्यकथेवर टोकाचं प्रेम करणाऱ्यांचे भावे प्रतिनिधी वाटले. त्यांना कित्येक वर्षांपासून, शाळेत सत्यकथेची गोडी लागली तेव्हापासून, अगदी परवापर्यंत 'सत्यकथा येण्याची, वाचण्याची आणि त्यावर विचार करण्याची सवय होती.' ते म्हणाले, 'मौज नावाच्या प्रकाशनाची सत्यकथा ही प्रवृत्ती होती. सत्यकथेचा प्रत्येक अंक एक स्वतंत्र कलाकृती असे. त्याचबरोबर सामाजिक संदर्भाचं भानही सत्यकथेला होतं. (आणीबाणीत मुखपृष्ठावर छापलेला त्रिमाचा पाढा!) सत्यकथेनं कविता छापल्या, त्या त्याना योग्य महत्त्व देऊन. सत्यकथेचा दर नोव्हेंबरमध्ये बदलणारा आणि पुढच्या डिसेंबरपर्यंत रेखीवपणे कायम रहाणारा मजकूर देण्याचा आकृतिबंधही तितकाच कलात्मक असे. (सत्यकथेतल्या जाहिरातीसुद्धा किती कलात्मक उंचीच्या असत हे त्यांनी सांगितलं.)

तरीही सत्यकथा बंद का पडावी? व्यक्तिगत उपक्रम सामाजिकतेकडे नेणारं संस्थात्मक रूप सत्यकथेला नको असावं. सार्वजनिक संस्थांत १००% सत्त्वशीलता अपेक्षिताच येत नाही. मिळतील ते ५५–६० टक्के स्वीकारले तर संस्था चालू राहतात. संस्थांना पुढे गतानुगतिकत्वही येतं. हे धोके टाळण्यासाठी कदाचित सत्यकथेनं समाप्तीचा निर्णय घेतला असावा. सत्यकथेनं घेतलेलं सत्त्वशीलतेचं व्रत मुळात आपल्याला आज हवं आहे का? हवं असेल तर आपण त्याची काय किंमत करतो हा प्रश्नही महत्त्वाचा आहे.'

नंतर बोलले श्री. ग. माजगावकर. सत्यकथेच्या प्रेमळ माणसांपुढे ते रोखठोक वाटले. सत्यकथा बंद करण्याचा संचालकीय (संपादकीय नव्हे) निर्णय हा बरेचसे निर्णय व्यक्तिगत पातळीवर घेण्याच्या एकांड्या मराठी बाण्यातून घेतला गेला आहे असं ते म्हणाले.

भागवतांनी हा निर्णय का घेतला? माजगावकर म्हणाले, 'सत्यकथेची ही आत्महत्याच आहे. आर्थिक बिकट अवस्था हा काही अचानक उद्भवलेला प्रश्न नव्हता. चाळीस वर्षं तोटा सहन करतच सत्यकथा चालवलं गेलं. अशी नियतकालिक तोट्यातच चालतात, तोटा सहन करण्यासाठी निधी जमवणंही अवघड नव्हतं. त्यासाठी मित्राची मदत हा काही जोगवा म्हणता येणार नाही. नवीन प्रवाहांचा ओघ घेण्याची प्रवृत्ती, निर्मितिक्षमताच संपली असेल तर ही आत्महत्या समजू शकते. त्याला एक वेगळा अर्थही आहे; पण असे नसेल, तर सत्यकथा ही अभिजात साहित्यिक-परंपरा होती. या परंपरेतलं सातत्य आणि नवीनता चालू ठेवण्यासाठी नवीन ताज्या रक्ताचा शोध घेणं यालाही एक अर्थ आहे. म्हणूनच सत्यकथा बंद करण्याचा निर्णय एकांड्या मराठी बाण्याचाच वाटतो.'

ग. वा. बेहेरे म्हणाले, 'सत्यकथेमागची प्रेरणाच जर संपली असेल तर ती बंदच पडायला हवी. आर्थिक कारण खरे नाही. चांगल्या गोष्टीसाठी पैसे उभे करता येतात; पण त्याचं प्रयोजन मात्र अंतःकरणात हवं. सत्यकथा बंद पडायलाच हवी होती. कारण नवीन शोध घेणारे डोळेच जर आंधळे झाले असतील, तर असा शोध घेण्याचा प्रयत्न करणच हास्यास्पद आहे. त्या दृष्टीनं सत्यकथेची आत्महत्या नैसर्गिक आहे, समजू शकते.

अरविंद मंगरूळकर म्हणाले. 'सत्यकथेची समाप्ती हा वाङ्मयीन अभिरुचीचाच आविष्कार आहे. सत्यकथेच्या अलीकडच्या काळात तिचा नेमका role कोणता ह्याबद्दल माझ्या मनात शंका होती. तरीदेखील हे अपरिहार्य होत का? मुखपृष्ठ आणि इतर खर्च कमी करून ते मासिक नाही, तर द्वैमासिक, त्रैमासिक का निघू नये? सत्यकथेची परंपरा जिवंत रहायला हवी!'

यानंतर आतापर्यंत शांतपणे ही चर्चा ऐकत बसलेल्या श्री. पु. भागवतांना दोन शब्द बोलण्याबद्दल कानेटकरांनी विनंती केली. भागवत म्हणाले, 'ज्या आस्थेनं आज तुम्ही सत्यकथेवर चर्चा केलीत त्याचा अपमान होऊ नये म्हणून मी बोलणं मान्य केलं आहे. सत्यकथा बंद करण्याचा निर्णय मी अत्यंत व्यथित अंतःकरणानं घेतला आहे. आजपर्यंत जे काम करण्यामध्ये मला आस्था होती, ज्यामुळं मला अतिशय आनंद झाला, अत्यंत निर्मितिशील, बुद्धिमान माणसांचा स्नेह लाभला; पण आपल्या अभिरुचीची कल्पना किती व्यवहार्य आहे ते मी पाहिलं नव्हतं. यापुढं मला ही चैन परवडणारी नाही. जोगवा देखील नवसाचा मागतात. जन्मभरासाठी नाही. आज परिस्थिती अशी आहे की. कोणत्याच भूमिकेला पुरेसा वाचक, ग्राहक नाही. सत्यकथेसारखं काम पुरेशा लोकांना हवं आहे का? दिवसेंदिवस मराठीशी संबंध तुटत आहे. सांस्कृतिक प्रेरणा कमी होत आहेत. लहान लहान मुलं इंग्रजी कॉमिक्स वाचून मोठी होतात, या परिस्थितीत सत्यकथा वाचणार कोण? आणि सत्यकथेत लिहिणार कोण? मला वाटलं, अभिरुचीशी इमान राखता येत नसेल तर थांबणच योग्य आहे; पण एक सांगतो. भिन्नभिन्न भूमिकांनी पण जिद्दीनं आणि निष्ठेनं मोलाचं काम करणारी जी धडपडणारी मासिकं आहेत त्यांची जिजीविषा थकणार नाही असा प्रयत्न आपण केला पाहिजे. आपली गरज संपली आहे असं कृपा करून त्यांना जाणवू देऊ नका!"

भागवतांनी बोलताना सत्यकथा आजपर्यंत सोसत असलेल्या आर्थिक तोट्यासंबंधीचे काही नेमके आकडे दिले आणि शेवटी भविष्यकाळात मराठी भाषेला अपरिहार्यपणे येत असलेल्या दुय्यम महत्त्वाबद्दल खंत व्यक्त केली.

मराठी भाषेबद्दल नव्या पिढीत निर्माण होत असलेली अनास्था हा प्रश्न गंभीरच आहे; पण याच बिकट परिस्थितीत सत्यकथेनं जिद्दीनं घट्ट रोवून रहाण्याची गरज होती.

सत्यकथेच्या मार्गानं जाणारी इतर नियतकालिकं या समाप्तीतून योग्य धडा घेतील का?

—मेधा देशपांडे

मुंबई वार्ता

# ऑक्टोपसचा एक पाय

बिहारचं वृत्तपत्रविषयक विधेयक ही सध्याची वाईट अर्थानं गाजणारी गरमागरम घटना आहे. या विषयाबाबत काही घडत नाही, काही बोललं जात नाही, असा एकही दिवस जात नाही.

लोकशाही हक्क संरक्षण समितीने याच विषयावर आयोजित केलेली एक सभा नुकतीच मुंबईत घडून आली. नीलकंठ खाडिलकर, दिनू रणदिवे, अरुण विनायक यांच्याबरोबर आणखीही बऱ्याच ज्ञात–अज्ञात, छोटया–मोठया पत्रकारांनी, नागरिकांनी आणि समितीच्या सभासदांनी या चर्चेमध्ये उत्स्फूर्त भाग घेतला होता. चर्चेच्या सुरवातीला बोलताना खाडिलकर म्हणाले, वृत्तपत्रस्वातंत्र्य अबाधित रहाणं हे लोकशाहीच्या दृष्टीनं इतकं आवश्यक आहे की, त्याशिवाय लोकशाही म्हणजे डेन्मार्कच्या राजपुत्राशिवाय 'हॅम्लेट'! सभेची प्रस्तावना करताना असा एक मुद्दा मांडला गेला होता की, प्रसिद्धीची साधनं हातात असणाऱ्या पत्रकारांवर अन्याय झाला, म्हणून तर त्याला अधिक प्रसिद्धी मिळतेच असं नाही ना? अन्याय, अत्याचार, जुलूम ही या देशात आता फारशी नवी गोष्ट राहिलेली नाही. अशा परिस्थितीत पत्रकारांवर झालेला लाठीमार, अटक, तुरुंगवास हे सारं प्रकाशात येतं, कारण तसं ते आणणं पत्रकारांच्या हातात आहे. या गोष्टीला पत्रकार अवाजवी महत्त्व तर देत नाहीत ना?

पण पत्रकारांवर अन्याय होणं आणि तोही अशा प्रकारचा की, त्यांची तोंडं बंद केली जावीत, हा खरा जनतेवरचा, लोकशाहीतत्त्वावरचा अन्याय आहे. खाडिलकर म्हणतात, लोकशाहीच्या मूलभूत संकल्पनेमध्ये हे मुळी अभिप्रेतच आहे की, वस्तुस्थितीचं यथातथ्य ज्ञान मिळवण्याचा, सत्य जाणून घेण्याचा जनतेला अधिकार आहे. सगळेच पत्रकार उच्च दर्जाचे, सारासार विचार-विवेक जाणणारे असतात असं जरी नसलं, तरी पत्रकार तुरुंगात जातो किंवा त्याच्या हातातली लेखणी हिसकावून घेतली जाते, तेव्हा निःपक्षपाती सत्याचा एक मोठा मार्ग वाचकांना बंद होतो. बातम्या, संपादकीय, वृत्तपत्रीय भाष्यं हा केवळ पत्रकाराचा नव्हे, प्रामुख्यानं वाचकाचा अधिकार आहे.

वृत्तपत्रस्वातंत्र्याचा दुरुपयोग केला जाईल, त्यामधून 'यलो जर्नालिजम' फोफावेल आणि 'स्करिलस राइटिंग' वाढीला लागेल हे आरोप समजा खरे धरलेही; तरीही तामिळनाडूतल्याप्रमाणे सामान्य कॉन्स्टेबलची किंवा सर्वथैव अयोग्य व्यक्तीची नियुक्ती वृत्तपत्रासारख्या अतिशय नाजूक, प्रभावी माध्यमाचं नियमन करण्यासाठी व्हावी,हे म्हणजे मानवी हृदयावरची अवघड शस्त्रक्रिया करण्यासाठी खाटकाला आणण्यासारखं आहे. हे तर रोगापेक्षाही भयंकर औषध झालं. समाजशास्त्र, राजकारण, मानसशास्त्र यांची चांगली जाण असलेल्या व्यक्ती, ज्ञान आणि अनुभव असणारे पत्रकार यांनी करायचं हे काम केवळ मामुली अधिकाऱ्याच्या हाती सोपवून अनर्थच ओढवला जाईल.

बिहारचं हे वृत्तपत्र–विधेयक एकदा संमत झालं की, त्याचा दुरुपयोग होणारच हे सांगायला कुणा ज्योतिषाची आवश्यकता नाही. मिसा, इमर्जन्सी यांसारख्या तथाकथित सुरक्षात्मक उपायांचा बडगा कसा काटेरी असतो, हे या देशाच्या इतिहासात काळयाकुट्ट अक्षरांनी ठसवलं गेलं आहे. अजून (तरी) विधेयक संमतही झालेलं नाही; पण एवढयातच राज्य परिवहन मंडळाच्या बसेसनी वृत्तपत्रांची वाहतूक करू नये अशी सरकारी गुंडगिरीही सुरू झाली आहे आणि हे सुरक्षात्मक उपाय तरी कसले? कुणासाठी? सुरक्षा जनतेसाठी? की, वृत्तपत्रांमधलं लेखन वाचून, चिथावलं जाऊन जनतेनं भ्रष्ट सरकारी यंत्रणा मोडून टाकू नये म्हणून सुरक्षा? ज्याचे हात साफ असतील त्याला 'स्करिलस' पत्रकारितेचं भय कशाला? वृत्तपत्रांवर निर्बंध कशासाठी? कैद्यांचे डोळे फोडले जातात हे लोकांना कळू नये म्हणून. दरोडेखोर गावंच्या गावं कापून काढतात हे झाकलं जाण्यासाठी. भर शहरात, दिवसाढवळया पोलीस स्त्रियांवर बलात्कार करतात हे दडपण्यासाठी. स्वतः मुख्यमंत्री सिमेंटचा गैरव्यवहार करतात तो पडद्याआड ठेवण्यासाठी. जे भ्रष्टाचार, अन्याय सरकारी पातळीवर निपटता येत नाहीत, किंबहुना ज्यांना सरकारी हातभारच लागतो, ते नजरेआड करण्याचा, जनतेचा रोष न होऊ देण्याचा निर्लज्ज प्रयत्न म्हणजे वृत्तपत्रांवरची बंदी!

पण सत्य कटू असलं तरी ते पचवावं लागतं, टोपलीआड झाकून चालत नाही. दिनू रणदिवे म्हणतात, आणीबाणीच्या काळात सत्याची गळचेपी झाली. वृत्तपत्रं, नियतकालिकं सगळयांवरच बंधनं आली. परिणाम? सत्य गुदमरलं वगैरे तर नाहीच, गुदमरलं ते परिस्थितीची कल्पना न आलेलं सरकार! तेव्हा सत्याचे हे प्रयोग सरकारला महागात पडणार हे नक्की!

लोकशाहीवर येणारी ही गदा टाळण्यासाठी पत्रकार काय करू शकतील? खाडिलकरानी एक सूचना मांडली. मंत्री इत्यादिकांच्या सर्व कार्यक्रमांवर, भाषणांवर वृत्तपत्रांनी बहिष्कार टाकावा. वृत्तपत्राची पहिली पानं म्हणजे जणू काय सरकारी गॅझेटस् अशीच त्यांची परिस्थिती असते. मंत्र्यांची बारीक-सारीक भाषणं, मुळीच प्रेक्षणीय नसणारे फोटो छापणं सोडलं, तर वृत्तपत्रांचा दर्जा सुधारेल आणि खपही वाढेल! नाही तरी मुख्यमंत्र्याची बातमी असून-असून काय असणार? ते आज मुंबईत आहेत किंवा दिल्लीत आहेत, एवढीच!

मंत्र्यांच्या कार्यक्रमांवर बहिष्कार घालण्याच्या कल्पनेनं सभेत चांगलंच मूळ धरलं. त्यावर उलट-सुलट चर्चाही पुष्कळ रंगली. कारण सूचना चागली, प्रभावी, तशीच गैरसोय-गोंधळाचीही. एका मुलीनं विचारलं, मंत्र्यांची अपकृत्यं छापताना तरी त्यांची नावं घ्यावीच लागतील ना? (आणि खरं तर तेवढं सोडून त्यांच्याबद्दल लिहिण्यासारखं असतंच काय?) पण बहुतेक सर्वांनीच धंका

काढली, वृत्तपत्रावर पत्रकारांची मालकी थोडीच असते ? तेव्हा अखेर मालकाचेच इंटरेस्ट्स प्रभावी ठरणार ! एका पत्रकारानं सांगितलं, वृत्तपत्रस्वातंत्र्य म्हणजे निरर्थक चलनी नाणं बनू शकतं. वार्ताहर म्हणतो, वृत्तपत्रस्वातंत्र्य आहेच; पण मी आपलं संपादकाचं ऐकणार. सपादक म्हणतो, वृत्तपत्रस्वातंत्र्य आहेच; पण मालक म्हणेल ते खरं. मालक म्हणतो, स्वातंत्र्य आहे की; पण जाहिरातदार बघू काय म्हणतोय. जाहिरातदार म्हणतो, वृत्तपत्रस्वातंत्र्य म्हणजे कोण थोर गोष्ट ! पण सरकारी धोरणांचाच पाठपुरावा केलेला बरा ! एक प्रसिद्ध विनोद आहे – मी या घरात सर्वेसर्वा आहे आणि असं म्हणण्यासाठी मला बायकोची परवानगी देखील आहे ! त्याच्यातलाच हा प्रकार झाला. स्वातंत्र्य अमान्य तर कुणीच करत नाही हो; पण ते पेलण्यासाठी हवेत मजबूत खांदे आणि खंबीर मन. झोकून देण्याची तरुण, सळसळती वृत्ती! स्वातंत्र्य म्हणजे चैन नाही, उघड्या डोळ्यानी करायच ते अग्निदिव्य आहे. ते करणं किती जणांना शक्य आहे ? तेव्हा कुठल्याही सूचनेचा व्यावहारिक संदर्भ, शक्याशक्यता या बाजूनं विचार करायला हवा.

चर्चा खूपच रंगली. व्यासपीठावरून एक वक्ता बोलणार आणि उरलेले प्रेक्षक खाली बसून श्रवणभक्ती करणार असं तिचं स्वरूप हां हां म्हणता संपलं आणि घडून आला तो ज़िवंत, उत्साही संवाद. एकामागून एक माणसं येत होती. आपल्याला सोयीच्या वाटणाऱ्या भाषेत स्वत:ला खोलवर भिडलेले विचार मांडून जात होती. प्रामाणिक शंका विचारत होती. त्यांच स्वरूप कधी व्यक्तिगत अनुभव, आत्म-कथनाचं होतं. कधी वादविवाद स्पर्धेसारखं जोषपूर्ण, कधी अनुभवानं संथ, संयत; पण त्या सगळ्या भाषणांतून जाणवत होती ती प्रचंड कळकळ. कशावरची तरी श्रद्धा. मूल्यं जपण्याचा अट्टाहास आणि म्हणूनच संख्येनं लहानशी उपस्थिती असणारी ती सभा आणि वक्तव्यं हृदयस्पर्शी वाटली. खरं म्हणजे हा विषय केवळ गेला महिन्याभरातला. तशात त्यामागे असणारा भीषणपणा, भेसूरपणा इतका ठळक आणि प्रथमदर्शनी आहे की, चर्चेचे कीस पाडावेत, सूक्ष्म बारीकसे मुद्दे मांडावेत किंवा त्याचे नवनवे पैलू शोधावेत अशीही परिस्थिती नाही. या साऱ्या भाषणांतून खूप नवेच आणि आजवर न ऐकलेले मुद्दे ध्यानात आले, असं नव्हे. तरीही झपाटलेली ही सभा भारावून गेली.

बिहार वृत्तपत्र विधेयक ही मामुली आणि स्वतंत्र-एकाकी बाब नव्हे. चाचपणीदाखल उठवलेलं ते एक वादळ आहे, अशी चमत्कारिक आणि भयावह भावना आज जनमानसात निर्माण होते आहे की, आमची समग्र शासनयंत्रणा म्हणजे जणू काही सर्वव्यापी ऑक्टोपस आहे. बिहारच्या मिश्राची ही हालचाल हा त्या ऑक्टोपसचा एक पाय आहे. त्याची व्याप्ती किती वाढेल आणि तो काय गिळंकृत करेल हे सांगणं कठिण आहे.

खरोखरीची आणीबाणी निर्माण होते आहे. सरकारनं जाहीर केलेली नव्हे, सरकारनं निर्माण केलेली, सरकार जबाबदार असलेली !

म्हणूनच अशा वेळी लोकशाही हक्क संरक्षण समितीसारख्या संस्थांचा आधार वाटतो. रात्र वैऱ्याची आहे. सावध रहायला हवं, ठेवायला हवं आणि हेच जागल्याचं काम अशा संस्था करत आहेत.

२५ जून १९७५ ला आणीबाणी जाहीर झाली, त्या वेळी आम्हाला नागरी हक्कांवर होणाऱ्या, होऊ शकणाऱ्या अतिक्रमणाची प्रथमच जाणीव झाली.

पण खरं म्हणजे असं अतिक्रमण, लोकशाहीची अशी पायमल्ली ही त्याच्याही किती तरी आधीपासून चालूच होती. त्याच्याकडे काही प्रसंगांच्या निमित्तानं लक्ष वेधलं जात असे; पण या देशाचा जुना आर्थिक आजार, गरिबी, राजकीय आणि पक्षीय अस्थिरता या गदारोळात त्याच्याकडे म्हणावंसं लक्ष जात नव्हतं; पण हळूहळू सत्ता अधिकाधिक केन्द्रित होत होती, सत्ताधाऱ्याच्या हाती. सत्ता भ्रष्ट होते—करते आणि संपूर्ण सत्ता संपूर्ण भ्रष्ट होते. या दुर्दैवी न्यायानं राजकारण—अर्थकारण—समाजकारण या साऱ्या क्षेत्रात येणारं अपयश झाकण्यासाठी सत्तेची शस्त्रसामुग्री अधिकाधिक तेज आणि तिखट बनत होती.

आणीबाणी जाहीर झाली आणि याचा प्रत्यय आला. प्रत्येक बाबीचं किती प्रमाणात सरकारीकरण झालेलं आहे, ते ठळठळीतपणे जाणवलं. न्याय, कायदा, प्रशासन, पोलीस, गुप्तहेर, सैन्य—निमसैन्य यापैकी कुणालाच स्वतंत्र आवाज राहिलेला नव्हता. सरकारही नाही, तर केवळ सत्ताधारी पक्षाच्या हातातली ती बाहुली बनली होती.

याचा अर्थ असा की, व्यक्तीला, नागरिकाला स्वातंत्र्य केवळ घटनेनं दिलं, म्हणजे त्याच्यापर्यंत पोचलंच असं नाही. मुळात आपल्या देशात शिक्षणाचा प्रसार कमी. भूतकालीन वैभवात रमण्यापेक्षा वर्तमानकाळात जगाव अशी वृत्ती कमी. त्यात मनही हुकूमशाहीच्या ताबेदारीच्या वळणानं, सुरक्षित पंखाखाली वाढणारी. लोकशाही म्हणजे बाहेरून इथे आणून लावलेलं रोपटं. या रोपट्यानं तरारून मोठा वृक्ष व्हावं आणि सगळ्यांना छाया द्यावी असं वाटत असेल, तर डोळ्यात तेल घालून काळजी घ्यायला हवी. लोकशाही हक्क संरक्षण समितीसारख्या संघटना छोट्या-मोठ्या प्रमाणात गावोगावी उभ्या राहिल्या पाहिजेत. घराघरातून त्याचे सभासद असले पाहिजेत, तरच लोकशाहीला भवितव्य उरेल !

—ललिता बर्वे


उंबरठ्याबाहेर पडलेली स्त्री हे उद्याच्या आपल्या समाजाचं प्रतीक होणार आहे.
पण फक्त स्वत:ला घडवण्यासाठी स्त्रीनं घराबाहेर पडणं आज आपल्याला पटत नाही.
जब्बारनं हे समजून घ्यायचा बराच प्रयत्न केलाय,
तरीही सुलभा महाजनचं दुःख प्रातिनिधिक पातळीवर जाऊ शकत नाही.

**उंबरठा - जब्बारचा ? स्मिताचा ?**

पुढील अंकात....

कामगार वृत्त

# उद्याचा भरवसा आता कोणीच देऊ शकणार नाही !

२॥ लाख गिरणीकामगारांच्या संपाला पाठिंबा देण्यासाठी कामगारनेते डॉ. दत्ता सामंत यांनी गुरुवार दि. १६ सप्टेंबर रोजी विधानभवनावर जो लाँग मार्च काढला, तो खरोखरच अतिशय विराट आणि अविस्मरणीय असा होता ! मागील आठवड्यात डॉ. सामंतांनी जेव्हा या लाँग मार्चची घोषणा केली तेव्हापासूनच मुंबईकरांनी या मोर्चाचा धसका घेतला होता.

आजकाल मुंबईकर आपला जीव मुठीत घेऊन चालतो आहे. तापलेल्या या मुंबईत केव्हा वणवा पेटेल याचा भरवसा नसल्याने येथील माणूस दिवसा–दिवसाचे गणित मोजू लागला आहे. बाहेर कामावर गेलेले सर्वजण संध्याकाळी घरी सुखरूप आले की, 'आजचा दिवस तरी गेला !' असा सुस्कारा टाकून येथील माणूस आपले जीवन कंठत आहे. पोलीसबंडात जे होरपळून निघाले त्यांनी तर आता खूपच धास्ती घेतली आहे.

१६ सप्टेंबरचेच उदाहरण घ्या ! डॉ. सामंतांच्या या लाँग मार्चबद्दल मुंबईत अनेक अफवांना ऊत आला होता. ४ सप्टेंबरपासूनच लोक या मोर्चाबद्दल बोलू लागले होते. १६ सप्टेंबरला 'रास्ता रोको' आंदोलन सुरू होणार; मुंबईतील बेस्ट, रेल्वे, टॅक्सी त्या दिवशी धावणार नाही. प्रसंगी रेल्वेही बंद पडणार ! पाहता पाहता तुफान दगडफेक आणि जाळपोळ सुरू होऊन सर्वत्र एक धमाल माजणार ! अशा प्रकारच्या अनेक अफवांना येथे ऊत आला. १६ तारखेला काय होणार याची चर्चा लोक सर्वत्र करू लागले होते.

आयोजित केलेला लाँग मार्च पूर्णपणे यशस्वी झाला पाहिजे म्हणून डॉ. सामंतांनी आणि त्यांच्या पाठिराख्यांनी कंबर कसली होती. अवघ्या आठ दिवसांत त्यांना आपला लाँग मार्च यशस्वी करून दाखवायचा होता. त्यासाठी मोहल्ल्यामोहल्ल्यातून त्यांनी कार्यकर्त्यांच्या जाहीर सभा घेण्यास सुरुवात केली. या सभेने आठ महिने गप्प बसलेला गिरणीकामगार तर पेटून उठलाच; पण त्याच्या मदतीला धावण्यासाठी इतर क्षेत्रात काम करणारा त्याचा बंधूही जागा झाला. डॉ. सामंतांच्या पाठिराख्यांनी घेतलेल्या या छोट्या छोट्या सभांनी वातावरण तापून उठले आणि या तापलेल्या वातावरणातच १६ सप्टेंबरचा गुरुवार उजाडला !

कामगार चळवळीच्या इतिहासात या गुरुवारची नोंद अवश्य करावी लागेल ! सकाळपासून लोकांमध्ये चर्चेचा एकच विषय होता की संध्यकाळी काय होणार ? याची धास्ती मुंबईतील हॉटेलमालकांनी, मोठमोठ्या दुकानदारांनी, फेरीवाल्यांनी, इतकेच काय तुमच्या–आमच्यासारख्या मध्यमवर्गीयांनीही घेतली होती !

मुंबई उपनगराच्या रेल्वेस्थानकाजवळ ज्यांची उपहारगृहे आहेत त्यांना तर आजचा दिवस केव्हा एकदा जातो असे झाले होते. रेल्वेस्थानकावर असणाऱ्या स्टॉलधारकांची हीच स्थिती होती; पण सर्वांत पाहण्यासारखे दृश्य फोर्ट भागातच होते.

फोर्टभाग हा नेहमी गर्दीने गजबजलेला ! फेरीवाल्यांची आरडाओरड, लोकांचे धावणे, टॅक्सी, बस आणि कार गाड्यांची सदैव वर्दळ असणाऱ्या या फोर्टभागात दुपारपासूनच शुकशुकाट जाणवू लागला होता. रस्ते ओस पडू लागले होते, वाहनांची वर्दळ तुरळक होत होती आणि अशा या वातावरणाने सर्वत्र भयाण शांतता जाणवू लागली होती !

फोर्टभागातील कार्यालयातून दुपारी एक फेरफटका मारला असता जाणवलं की, ऑफिसमध्ये चर्चेला 'लाँग मार्च'चाच विषय होता. दुपारी काही गडबड झाली तर आपण घरी कसे जाणार याच चिंतेची चर्चा लोक करत होते. आपले कर्मचारी घरी सुखरूप पोहचावेत यासाठी खाजगी कंपन्या दुपारी बारानंतर बंद होण्यास सुरुवात झाली होती. फोर्ट विभागातील कार्यालये अशा प्रकारे बंद होऊ लागली. कर्मचारी भीत भीत स्टेशन गाठून घरी परतू लागले. सरकारी कर्मचारीही घरी परतण्यासाठी प्रयत्न करू लागले !

फोर्ट विभागातील कार्यालये अशा प्रकारे बंद होऊ लागली तर इकडे उपहारगृहे आणि मोठमोठी दुकानेही बंद होऊ लागली. व्ही.टी. स्टेशनपासून हुतात्मा चौकापर्यंतची दुकाने दुपारनंतर जवळजवळ पूर्णतः बंद झाली. फेरीवाल्यांनी केव्हाच घर गाठलं होतं. यामुळं दोन्ही बाजूंचे फूटपाथ रिकामे पडले.

एक जबरदस्त धास्ती घेऊन लोक भयभीत झाले खरे; पण तिकडे आझादमैदानावर कामगारांची गर्दी हजारोंनी वाढत होती. ज्या ज्या कारखान्यात डॉ. सामंतांचे नेतृत्व आहे तेथील सर्व कामगारं प्रसंगी काम बंद ठेवूनही या मोर्चासाठी येत होते. त्यांच्या घणाघाती घोषणांनी आझादमैदान दुमदुमून गेले होते. कामगारांची गर्दी सतत वाढतच होती.

कामगारांच्या गर्दीबरोबरच पोलिसांची गर्दीही कमी पडणार नाही याकडे सरकारने कटाक्षाने लक्ष दिले होते. मुंबईच्या बहुतेक प्रमुख रेल्वेस्थानकांवर पोलीसपहारा जबरदस्त होता. व्ही. टी. स्टेशनला, हँडलूम हाउसला पोलिसांनी पुरते घेरले होते. व्ही. टी. स्टेशनपासून काळा घोड्यापर्यंत रस्त्याच्या दुतर्फा पोलिसांची, एस. आर. पी. ची उपस्थिती प्रकर्षाने जाणवत होती.

अशा या वातावरणातच दुपारी साडेचार वाजता डॉ. सामंतांचा 'लाँग मार्च' आझादमैदानावरून घोषणांच्या ललकारीत निघाला. 'डॉ. दत्ता सामंत झिंदाबाद, कोण म्हणतो देणार नाही, घेतल्याशिवाय राहणार नाही !' या गर्जनात कामगारांनी काळा घोडा गाठला. पोलिसांनी मोर्चाला तेथे अडवले. त्यानंतर

डॉ. सामंताच्या नेतृत्वाखालील एक शिष्टमंडळ औपचारिकपणा म्हणून बाबासाहेबांना निवेदन देण्यास गेले.

मोर्च्यासमोर ज्या ज्या लोकांची भाषणे झाली त्यांनी सरकार व प्रामुख्याने बाबासाहेब भोसल्यावर तोफ डागली होती. वक्ते बोलत होते, कामगाराची आपसातील चर्चा मी ऐकत होतो आठ महिने शांततेने लढा देऊनही जर हे सरकार ऐकत नसेल तर पोलिसानी अवलबलेला मार्ग आपण स्वीकारावयास हवा त्यासाठी डॉ. सामंताची नुसती परवानगी मिळाली तरी आम्ही एकेका आमदाराची–खासदारांची गाडी रोखतो. साऱ्या मुंबईला वेठीस धरतो !

कामगारांच्या या भावना अनेक वक्त्यानी आपल्या भाषणात व्यक्त केल्या. रतन म्हात्रे या डॉ. सामंतांच्या नेत्याने आपल्या भाषणात सांगितले की, कामगारांना बलिदानाशिवाय न्याय मिळणार नाही. समोरच्या त्या हुतात्मा चौकाकडे बोट दाखवून रतन म्हात्रे म्हणाले की, ती पहा बलिदानाची निशाणी! त्या १०५ लोकानी संयुक्त महाराष्ट्राच्या लढयाच्या वेळी बलिदान केलं म्हणूनच मुंबई महाराष्ट्रात राहिली आणि आम्ही विजय मिळविला ! इतिहासाची पुनरावृत्ती होते, हे सागून म्हात्रे म्हणाले की, आता बलिदानाशिवाय पर्याय नाही !

या सभेत अनेक नेते बोलले. लाल निशाण गटाचे नेते यशवंत चव्हाण यांनी जोपर्यंत शेतकरी–शेतमजुराचे राज्य या भूमीवर येत नाही तोपर्यंत हा लाँग मार्च वाढतच गेला पाहिजे असं मत व्यक्त केलं. आपला सर्व श्रमिक संघ डॉ. सामताच्या समवेत सल्ल्या भावाप्रमाणे काम करेल असंही सांगितलं.

डॉ. सामंत मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन येईतोपर्यंत त्याचे बंधू दादा सामंत यांनी लढ्याचा पुढील कार्यक्रम जाहीर केला होता. कारण शिष्टमंडळाला आशादायक कोणतेच उत्तर बाबासाहेब देऊ शकणार नाहीत याची सर्वांना कल्पना होती.

आणि तसेच झाले.बाबासाहेबांनी ' आधी कामावर परता, मत वाटाघाटी ' हा आपला सूर तसाच लावल्याने डॉ. सामंतांनी मागण्या मान्य होईतोपर्यंत लढा चालूच राहील असं सांगितलं. त्यासाठी रोज 'जेल भरो'आंदोलन आता सुरू होत आहे. रोज कमीत कमी पाच हजार कामगार स्वतःला अटक करून घेतील २ ऑक्टोबरच्या गांधीजयंतीपर्यंत सुमारे १ लाख कामगार स्वत स अटक करून घेतील. एवढे करूनही जर सरकार बदलले नाही तर ऑक्टोबरनंतर आपले चालू असलेले सर्व कारखाने बद ठेवण्याचा डॉ. सामंतानी निर्णय घेतला आहे.

आतापर्यंतचे आंदोलन शांततापूर्ण व लोकशाहीमार्गाने चालले आहे. याच्यापुढे जर का काही झाले तर त्याची संपूर्ण जबाबदारी सरकारवर राहील ! असे डॉ. सामंतानी आधीच सांगून टाकले आहे.

मोर्चा संपला. रात्रीचे साडेसात वाजत आले होते. रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या इमारतीतील लाइट केव्हाच विझले होते. टॅक्सी, बस, कार गाड्यांचा तर दुपारपासून या मार्गावर पत्ताच नव्हता. म्हणूनच कामगारांनी फुंकलेल्या शिट्ट्यांनी फोर्टपरिसर दुमदुमून गेला.

इतका मोठा मोर्चा असताना, लोक संतापलेले असतानाही कोठेच गडबड–गोंधळ झाला नाही. मी प्रथमपासूनच अनेकांना सांगितले होते, ' डॉ. सामंताच्या आजच्या लॉंग मार्चमध्ये कोठेही गडबड–गोंधळ होणार नाही म्हणून ! त्यांचे अनेक लॉंग–मार्च मी पाहिले आहेत. दंगल माजविण्यातले डॉ. सामंत नाहीत; पण उद्याचा भरवसा मीच काय डॉ. सामंतही देऊ शकत नाहीत; गिरणीकामगार खरोखरच संतापला आहे. त्याचा आणखी अंत पाहणे सर्वांच्याच धोक्याचे आहे. तोपर्यंत सरकारला जर का काही दृष्टांत झाला तर याच्यापेक्षा मोठं ते भाग्य कोणतं ?

---

# असंघटित

---

मुंबईसारख्या औद्योगिक शहरात संघटित कामगाराबरोबरच असुरक्षित व असंघटित कामगारही लाखो आहेत संघटित कामगारानी युनियनद्वारे शक्तीच्या आधारावर अनेक फायदे मिळविले; पण ज्या ठिकाणी युनियनचे नाव घेणेही मुश्किल आहे अशा लहानसहान धंद्यात काम करणाऱ्या असंघटित कामगारांना कोणी वाली आहे की नाही हाच प्रश्न आज येथे अनेकांना भेडसावत आहे.

लहानमोठ्या उद्योगपतीबरोबरच लघुउद्योगांतून व लहान लहान दुकानातून व्यापार करणाऱ्या उद्योजकांचा एक फार मोठा वर्ग येथे आपणास पहावयास मिळतो. या ठिकाणी लाखो कामगार आज काम करीत आहेत कापडमार्केट, लोखंडमार्केट, झवेरी बझार, फळांचा बाजार, दाणाबदरभाग बझार, कटलरी मार्केट, प्लास्टिक मार्केट, चहाची दुकाने आदी ठिकाणी लाखो कामगार आज काम करीत आहेत ! पण या कामगारांची परिस्थिती काय आहे ?

अवघ्या २०० ते ३०० रुपये मासिक मजुरीवर हे कामगार काम करीत आहेत. १०० ते २०० रुपयांवर काम करणाऱ्या शेकडो महिला व मुली या ठिकाणी आपणास दिसतात दहा–दहा तास त्याना काम करावे लागते. कित्येक वर्षे काम करूनही त्यांना कायम करण्यात येत नाही. आठवड्याची सुट्टी मिळत नाही. मालकाचा कोणताही आदेश जर मानला नाही तर नोकरी जाईल की राहील ही टांगती तलवारही त्यांच्या मानेवर असते.

वरील धंद्यात काम करणारे लाखो कामगार असुरक्षित व असंघटित असल्यानेच ज्या ज्या वेळी प्रश्न उभा राहिला त्या वेळी सरकारने त्यांच्यासाठी विविध कायदे केले. या असघटित कामगाराची पिळवणूक थाबावी म्हणून स्वातंत्र्यपूर्वकाळापासून त्या पद्धतीने विविध कायदे करण्यात आले आहेत. त्यापैकी प्रमुख कायदे पुढीलप्रमाणे—

(१) कामगार नुकसान–भरपाईचा कायदा, १९२३

(२) पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट, १९३६

(३) किमान वेतन कायदा, १९४८

(४) फॅक्टरी ॲक्ट, १९४८

(५) बॉम्बे शॉप्स ॲण्ड एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट, १९४८

(६) औद्योगिक कलह–निवारण कायदा, १९४७

(७) इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टँडिंग ऑर्डर्स) ॲक्ट, १९४९

(८) एम्प्लॉईज स्टेट इन्शुरन्स ॲक्ट, १९४८

(९) प्रॉव्हिडंट फंड ॲक्ट, १९५२

(१०) पेमेंट ऑफ बोनस ॲक्ट, १९६५

(११) पेमेंट ऑफ ग्रॅज्युटी ॲक्ट, १९७२

कामगारांसाठी केलेले वरील कायदे पाहिले की कोणीही म्हणेल की, हे सरकार किती कामगारपाली आहे; पण आत जाऊन जर आपण डोकावले तर पदरी घोर निराशाच पडेल !

कायद्यानुसार किमान वेतन देण्याचा कायदा असतानाही लघुउद्योगधंद्यात काम करणाऱ्या या लाखो कामगारांना आजही किमान वेतन मिळत नाही. आठवडयाची सुट्टी मिळत नाही. आठ तासांचा दिवस असतानाही दहा-बारा तास त्यांना राबावे लागते. ओव्हरटाइम मिळत नाही. मिळालाच तर तो कायद्यानुसार असत नाही. चार–चार वर्षे काम करूनही या कामगारांना कायम केले जात नाही. प्रत्येक वर्षी बोनससाठी संघर्ष करावा लागतो. संघर्ष जास्त करूनही चालत नाही. कारण नोकरी जाण्याची टांगती तलवार असतेच ! कित्येक दिवस काम करूनही त्यांना इन्शुरन्सकार्ड दिले जात नाही. प्रॉव्हिडंट फंड कापला जात नाही अशी किती उदाहरणे द्यावीत ?

कायदे अस्तित्वात असतानाही आणि ते तयार करणारे शासन असतानाही हे असे का होते ? वास्तविक वरील सर्व कायद्यांची मालकवर्गाकडून अंमलबजावणी होते की नाही हे पाहण्यासाठी त्या त्या कायद्याप्रमाणे तपासनिसांची (इन्स्पेक्टरांची) नेमणूक करण्यात आलेली आहे. या तपासनिसांचे अधिकारही याच कायद्यात समाविष्ट करण्यात आले आहेत.

त्या त्या कायद्यांची अंमलबजावणी होते की नाही हे पाहण्यासाठी विभागवार इन्स्पेक्टरांची नेमणूक करण्यात आलेली आहे. त्या विभागात असणाऱ्या कंपन्यांमध्ये या सर्व कायद्यांची अंमलबजावणी होते की नाही हे पाहण्यासाठी त्या कंपन्यांना भेट देण्याची जबाबदारी या तपासनिसांवर कायद्याने टाकण्यात आली आहे. नुसती भेट न देता त्या कंपन्यातील कामगारांचे दैनंदिन हजेरीचे रजिस्टर, पगार दिल्याचे रजिस्टर, हक्काच्या रजेचे रजिस्टर, हजेरीकार्ड, रजेचे कार्ड, पगाराचा ताळा दाखविणारे पत्रक आदी रजिस्टरे पाहण्याचीही जबाबदारी तपासनिसावर टाकण्यात आलेली आहे.

या जबाबदारीप्रमाणे हे तपासनीस त्या विभागातील कंपन्यांना भेटी देतात. पण ज्या कामासाठी आपली नेमणूक करण्यात आलेली आहे ते कर्तव्य आपण पार पाडत आहोत की नाही याची ते फारशी काळजी करत नाहीत असेच चित्र सर्वत्र दिसत असल्याची अनेकांची तक्रार आहे. कारण तपासनिसांनी भेट देऊनही तेथील कामगारांना किमान वेतन. हक्काच्या रजा, आठवडयाची सुट्टी मिळत नसल्याची अनेक उदाहरणे येथे पहावयास मिळतात.

असंघटित कामगारांचे असे दुहेरी हाल चाललेले पहावयास मिळतात. कारण कोणतीही मोठी युनियन या कामगारांना संघटित करून त्यांचे नेतृत्व स्वतःकडे स्वीकारण्यास तयार नसते. हे काम अतिशय किचकट आणि परिश्रमाचे असल्याने मोठी युनियन येथे काम करण्यास राजी नसते. ज्या ठिकाणी कामगारांची संख्या शंभराच्या–हजाराच्या पटीत आहे तेथे जाण्यास मोठी युनियन केव्हाही उत्सुक असते; पण अनेक ठिकाणी विखुरलेल्या पाच–पंचवीस कामगारांना संघटित करून त्यांच्यासाठी काम करण्यास ही युनियन तितकीशी उत्सुक नसते. म्हणून मोठ्या युनियनकडून या असंघटित कामगारांना आधार मिळत नाही तर तिकडे सरकारकडूनही त्यांचे प्रश्न सोडविले जाण्याची शक्यता नसते. अशा तऱ्हेने त्यांचे हे दुहेरी हाल चाललेत.

या त्यांच्या हलाखीनेच औद्योगिक अशांतता वाढण्याचीही भीती आहे. आज हा कामगार असंघटित आहे; परंतु उद्या जर का तो जागा झाला तर परिस्थितीला वेगळे वळण लागण्याचीही शक्यता आहे !

यासाठीच सरकारने पुढाकार घेऊन या लाखो असंघटित कामगारांची या पिळवणुकीतून सुटका करावी अशी मागणी अनेक लहानमोठे युनियन-नेते करत आहेत. असे जर झाले तरच या परिस्थितीतून या असंघटित कामगारांची सुटका होणार आहे; अन्यथा ते असेच भरडले जाणार आहेत !

—मोहन शंकर कुलकर्णी

## परराष्ट्र

# चीन

## माओऐवजी डेंगचा मार्ग

वा. दा. रानडे

चीनमध्ये अकरा दिवस चाललेल्या चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या बाराव्या काँग्रेसने माओवादापासून दूर आणि डेंग झिआओ पिंग यांच्यामार्गावर ठाम पावले टाकली आहेत. चीनच्या यापुढच्या वाटचालीची दिशा कोणती राहणार याबद्दल आता शंका राहिलेली नाही.

याबाबतीत उपस्थित होणारा पहिला प्रश्न म्हणजे चीनने माओवाद सोडला म्हणजे कम्युनिझमचा त्याग केला आहे का ? तसे म्हणता येणार नाही. माओंच्या चुका दुरुस्त करून चीनचे नवे नेते त्यांना योग्य वाटणारी नवी धोरणे अवलंबीत आहेत. स्टालिनच्या चुका क्रुशोव्ह यांनी सुधारल्या, क्रुशोव्ह यांची चुकीची धोरणे ब्रेझनेव्ह यांनी बदलली, त्याच पद्धतीने चीनमध्ये बदल होत आहेत.

माओचा अंतकाळ समीप आला तेव्हापासूनच चीनमधील बदलांना सुरुवात झाली होती. पक्षातील व सरकारमधील अधिकारपदांवरून डाव्या अतिरेक्यांची हकालपट्टी हा या बदलाचा पहिला टप्पा होता. १९७७ साली भरलेल्या पक्षाच्या अकराव्या काँग्रेसमध्ये माओंच्या शेवटच्या कालखंडातील चुकांचीच फक्त दुरुस्ती करण्यात आली. माओंनी हुआगुओ फेंग यांना आपले राजकीय वारस नेमले होते. अकराव्या काँग्रेसमधील त्यांनी डाव्या अतिरेक्यांच्या धोरणाचा निषेध केला; पण निरंतर क्रांतीच्या माओंच्या भूमिकेचा पुरस्कारच केला. या भूमिकेस विरोध करण्याचे धैर्य त्या वेळी डेंग झिआओ पिंग यांना नव्हते.

कामगारवर्गाच्या हुकूमशाहीच्या नेतृत्वाखाली क्रांती सतत चालू ठेवली पाहिजे आणि वर्गलढाही चालू ठेवायला हवा असे डेंग यांनी त्या कांग्रेसमधील भाषणात सांगितले होते. बाराव्या कांग्रेसने ही भूमिका आता सोडली आहे. तिच्यात डाव्या अतिरेकी विचारप्रणालीचेच काही अवशेष होते म्हणून ती सोडली, असे स्पष्टीकरण नव्या भूमिकेची मांडणी करणाऱ्या अहवालात दिले आहे. पक्ष पुनः १९४५ ची सातवी कांग्रेस आणि १९५६ ची आठवी कांग्रेस यात मान्य केलेल्या भूमिकांकडे वळला आहे. माओंची सांस्कृतिक क्रांतीच केवळ नव्हे तर जलद प्रगतीसाठी त्यांनी अंमलात आणलेला 'ग्रेट लीप' चा (मोठी झेप) कार्यक्रमही चुकीचा होता असे बाराव्या कांग्रेसने म्हटले आहे.

डिसेंबर १९७८ मध्ये भरलेल्या पक्षाच्या मध्यवर्ती समितीच्या बैठकीत नव्या बदलाची दिशा ठरविणारे काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. समाजवादी समाजपद्धतीतही वर्गलढा सतत चालूच असतो, हा माओंचा सिद्धांत अमान्य करण्यात आला. पक्षाचे अध्यक्षपद आणि पंतप्रधानपद या दोन्ही पदांवरून हुआ गुओ फेंग यांना दूर करून सांस्कृतिक क्रांतिपूर्वकाळातील कम्युनिस्ट पक्षाच्या यूथ लीगचे प्रमुख हुया ओबांग यांना अध्यक्ष नेमण्यात आले व पंतप्रधानपदी झाओ झियांग यांची निवड झाली. बाराव्या कांग्रेसेने तर याच्यापुढचे पाऊल टाकून हुआ गुओ फेंग यांना पोलिटब्यूरोमधूनही वगळले.

पक्षाची नवी घटना बाराव्या कांग्रेसमध्ये मंजूर करण्यात आली. पक्षाच्या घटनेत अध्यक्षपद सुरुवातीपासून नव्हतेच. माओंनी १९४५ पासून ते सुरू केले आता ते रद्द करण्यात आले असून सरचिटणीसच पक्षप्रमुख राहणार आहे. पक्षात एकाच व्यक्तीचे महात्म्य वाढू नये म्हणून हा बदल करण्यात आल्याचे समर्थन करण्यात येत आहे; पण ते पटणारे नाही. अध्यक्षास केवळ सरचिटणीस म्हटल्याने व्यक्तिमहात्म्य वाढविण्याच्या प्रवृत्तीस आळा बसणार नाही. रशियन कम्युनिस्ट पक्षात कोठे अध्यक्षपद होते ? स्टॅलिन यांनी सरचिटणीसपदावर राहूनच आपले व्यक्तिमहात्म्य वाढविले होते. तेव्हा या प्रवृत्तीस आळा घालण्यास केवळ एवढे उपाय पुरेसे नाहीत. एका व्यक्तीकडे एकपेक्षा अधिक अधिकारपदे ठेवायची नाहीत आणि फार काळ तिच्याकडे ती राहू द्यावयाची नाहीत, वृद्ध नेत्यांनी विशिष्ट वयाच्या पलीकडे स्वेच्छेने सर्व पदावरून निवृत्त व्हावयाचे हे निर्णय एकाच व्यक्तीने न घेता सामुदायिक नेतृत्वाने, सामुदायिक पद्धतीने निर्णय घेण्याची प्रथा रूढ करावयाची, हे संकेत रूढ करायला हवेत.

बाराव्या कांग्रेसच्या निर्णयाकडे त्या दृष्टीने पाहिले तर जुने नेतृत्व पूर्णपणे दूर सारण्यात आलेले नाही. डेंग व त्याचे सत्तर वर्षांवरील सहकारी नव्या तरुण नेतृत्वाकडे पूर्णपणे सूत्रे सोपवितील अशी अपेक्षा होती. नव्या घटनेत सल्लागारमंडळाची तरतूद त्या उद्देशानेच करण्यात आली; पण या वृद्ध नेत्यांना पोलिटब्यूरोत पुन: घेण्यात आले आहे. डेंग ७८ वर्षांचे आहेत. वास्तविक त्यांनी निवृत्त झाले पाहिजे; पण नवे नेतृत्व पूर्णपणे स्थिर झाल्याची खात्री पटेपर्यंत आणखी दोन वर्षे अधिकारपदावर रहावे असे त्यांना वाटत असल्याचे दिसते; पण पक्षाचे सरचिटणीसपद, पंतप्रधानपद ही महत्त्वाची पदे त्यांनी स्वत.कडे ठेवलेली नाहीत हे खरे; पण एक महत्त्वाचे पद त्यांनी स्वत.कडे ठेवले आहे. ते म्हणजे लष्करी समितीचे अध्यक्षपद. जरूर पडलीच तर लष्करी बळाचा वापर करून देशाची गाडी आपण आखून दिलेल्या मार्गावरच ठेवावयाची हा उद्देश त्यामागे असणे शक्य आहे. लष्करावर माओंच्या धोरणांचा पगडा आहे.तेव्हा डेंगचे समर्थक आणि लष्कर यांच्यात संघर्ष होण्याची शक्यता काही निरीक्षकांनी पूर्वी व्यक्त केली होती; पण लष्कर आपल्या नियंत्रणाखाली ठेवण्यात डेंगना यश आले आहे असे दिसते.

व्यवहार्य वास्तव धोरण हा नव्या भूमिकेचा महत्त्वाचा विशेष. आधुनिकीकरण हा परवलीचा शब्द; पण आधुनिकीकरण म्हणजे केवळ पाश्चात्यांच्या आधुनिक तंत्राचे अनुकरण नव्हे. मोठी झेप, सांस्कृतिक क्रांती यासारख्या माओंच्या मार्गांनी जुनी आर्थिक सामाजिक घडी मोडते हे खरे; पण त्या जागी शिस्तबद्ध नवी घडी निर्माण न झाल्याने विकास खुंटतो हा अनुभव आला. शिस्तबद्ध आर्थिक, सामाजिक, राजकीय घडी उभारूनच जलद प्रगती साधू शकेल अशी नव्या नेतृत्वाची धारणा आहे.

सरचिटणीस हु याओ बांग यांनी आपल्या अहवालात जो आर्थिक कार्यक्रम सादर केला त्यावरून हे स्पष्ट होते. हा कार्यक्रम यशस्वीपणे अंमलात आणण्यासाठी प्रथम अस्थैर्याच्या जागी स्थैर्य व अव्यवस्थेचे जागी व्यवस्था निर्माण करण्यावर डेंग यांनी भर दिला. १९८१ ते २००० या वीस वर्षांसाठी जो कार्यक्रम आखण्यात आला आहे त्यानुसार औद्योगिक व शेतीउत्पादनात चौपट वाढ होणार आहे. सध्या एकूण वार्षिक उत्पादन ३५५००० कोटी रुपये आहे ते २०००साली १४,००,००० कोटी रुपयांपर्यंत जाईल. शेती, ऊर्जा, वाहतूक, शिक्षण आणि विज्ञान याच्या विकासास प्राधान्यक्रम देण्यात आलेला आहे.कार्यक्रमाचे दोन टप्पे आहेत. एक १९९० पर्यंतचा टप्पा व दुसरा १९९१ ते २००० पर्यंतचा टप्पा. पहिल्या टप्प्यात भक्कम पाया उभारण्यावर भर देण्यात येईल.

परराष्ट्र-धोरणाच्या बाबतीत रशियाबरोबरच्या संबंधात एक बदल सूचित झाला आहे. रशियाशी संघर्ष हेच मुख्य सूत्र मानून त्यावर चीनच्या परराष्ट्रधोरणात भर देण्यात आला होता. चीनच्या हितसंबंधांना आणि आंतरराष्ट्रीय शांतता व स्थैर्यास रशियापासूनच मुख्य धोका आहे,अशी रशियाशी संबंध बिघडल्यापासून चीनच्या परराष्ट्रधोरणाची मांडणी होती. नव्या मांडणीत या धोक्यावर भर नसून बड्या राष्ट्रांचा साम्राज्यवाद,वसाहतवाद आणि इतरांवर वर्चस्व गाजविण्याची प्रवृत्ती यामुळे शांततापूर्ण सहजीवनास धोका निर्माण होतो यावर भर दिला आहे. तैवानबाबत त्यात अमेरिकेस कडक इशारा दिला असून इस्राइलला मदत करण्याच्या अमेरिकन धोरणावरही कडक टीका केली आहे. चीनचे परराष्ट्रधोरण स्वतंत्र राहील. तिसऱ्या जगातील देशांच्या हितसंबंधांशी ते निगडित आहे. रशियाविरोधातून चीन अमेरिकेकडे अधिक झुकलेला नाही असे त्यावरून दिसते. □

अवती भवती

शरद कृष्णन

# □ आंध्र प्रदेशामधील सत्तांतर

आंध्र प्रदेश विधानसभेची येऊ घातलेली निवडणूक एन. टी. रामराव या चित्रपटअभिनेत्याने स्थापन केलेल्या 'तेलगू देशम्' या प्रादेशिक पक्षाला मिळत असलेली वाढती लोकप्रियता आणि सत्तेवर असूनही निष्क्रिय असलेले मुख्यमंत्री श्री. बी. वेंकटराम या साऱ्यांचे दडपण येऊन आंध्र प्रदेशामध्ये केवळ दोन वर्षांच्या कालावधीमध्ये चौथा मुख्यमंत्री आणला जात आहे. सत्तांतराच्या या नाटकातून सत्ता ग्रहण करीत असलेले के. विजय भास्कर रेड्डी यांच्यावर आता आंध्र प्रदेश इंदिरा काँग्रेसला आगामी विधानसभा निवडणुकीच्या वेळी नेतृत्व देण्याची जबाबदारी आली आहे. विद्यमान विधानसभेमध्ये प्रचंड संख्याबळ असूनही इंदिरा काँग्रेसला स्थिर सरकार देता आलेले नाही. स्वाभाविकपणे जनतेमध्ये या पक्षाबद्दल वाढती नाराजी असून निवडणुकीच्या वेळी या नाराजीचे प्रतिबिंब उमटल्याखेरीज रहाणार नाही.

नवीन मुख्यमंत्री के. विजय भास्कर रेड्डी यांचे नाव काहीशा अनपेक्षितपणे पुढे आले. आंध्र प्रदेशामध्ये सत्तांतर झालेच तर बी. वेंकटराम मंत्रिमंडळामधील महसूलमंत्री श्री. जनार्दन रेड्डी यांची निवड होईल असा एक अंदाज होता. जवळजवळ शेवटपर्यंत त्यांचेच नाव प्रामुख्याने घेतले जात होते; परंतु स्वपक्षीय आमदारांचा त्यांना असलेला तिखट विरोध लक्षात घेऊन त्यांचे नाव बाजूस सारण्यात आले आणि के. विजय भास्कर रेड्डी यांचे नाव निश्चित झाले. आंध्र प्रदेश नेतृत्वात बदल होणार हे स्पष्ट झाल्यापासून आंध्र प्रदेशचे अर्ध्याहून जास्त मंत्रीगण दिल्लीत तळ ठोकून होते. इंदिराजींनी अनेकांच्या गाठीभेटी घेतल्या, त्यांचे म्हणणे ऐकून घेतले पण आपल्या मनात काय आहे याचा थांगपत्ता लागू दिला नाही. राज्याच्या नेतृत्वात बदल केला जात असताना संबंधित राज्याच्या केन्द्रशासनामधील महत्त्वाच्या मंत्र्यांचे मत विचारात घेतले जाते. त्या दृष्टीने श्री. नरसिंहराव व श्री. पी. शिवशंकर यांच्याशी चर्चा करण्यात आली; परंतु नेहमीच्या पद्धतीप्रमाणे अखेरचा निर्णय इंदिराजींनी स्वतःच घेतला व तो घोषित करण्याची जबाबदारी अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांच्यावर सोपवली. मावळते मुख्यमंत्री श्री. बी. वेंकटराम केवळ सहा महिने सत्तेवर होते. त्यांनी २४ फेब्रुवारीला सत्ताग्रहण केले आणि आंध्र प्रदेशचा कारभार आपल्या हाती घेतला. सहा महिन्यात ते आपला ठसा उमटवू शकले नाहीत. दिल्लीमधून जो जोरकस पाठिंबा त्यांना अभिप्रेत होता तो त्यांना कधीच मिळू शकला नाही आणि सत्ताग्रहण केल्यापासूनच यांचे काही खरे नाही अशी जी भावना स्वपक्षीयामध्ये रुजली होती ती बळावत गेली. एन. टी. रामराव यांच्या तेलगू देशमच्या वाढत्या लोकप्रियतेचा धसका मुख्यमंत्र्यांनीच घेतल्यामुळे पक्षयंत्रणेवर प्रतिकूल परिणाम झाला. अखेरीस बी. वेंकटराम यांना स्वतःलाच मुख्यमंत्रीपदाचे हे ओझे आपल्याला पेलण्यासारखे नाही याची जाणीव झाली असावी आणि म्हणूनच सतत दिल्लीला फेऱ्या मारूनच ते प्रत्येक गोष्टीचा निर्णय घेत होते. नवीन मुख्यमंत्री के. भास्कर विजय रेड्डी यांचा आंध्र प्रदेश राजकारणाशी प्रत्यक्ष संबंध उरला नसल्याने त्यांनाही ही नवीन जबाबदारी पेलणे तसे अवघडच जाणार आहे. अर्थात त्यांनी आंध्र प्रदेशामध्ये काही काळ अर्थमंत्री म्हणून काम केले असले तरी या राज्याच्या सध्याच्या अस्थिर वातावरणाची त्यांना पुरेशी जाणीव नाही. मंत्रिमंडळामधील सहकारी निवडण्याच्या कामातून ते जरा मोकळे होतील न होतील तोच त्यांना निवडणुकीचे आव्हान पेलावे लागणार आहे.

आंध्र प्रदेश म्हणजे वास्तविक पहाता इंदिराजींच्या पक्षाचा बालेकिल्ला. काँग्रेसमधील पहिल्या मोठ्या फाटाफुटीपासून म्हणजेच १९६६ पासून हे राज्य खंबीरपणे इंदिराजींच्या पाठीशी उभे आहे; परंतु अनुकूल लोकमताचा फायदा घेणे या पक्षाला जमले नाही. हास्यास्पद वाटावेत अशा पद्धतीने मुख्यमंत्रीपदामध्ये बदल केले गेल्याने या पक्षाची प्रतिमा निस्तेज झाली आहे. डॉ. चेन्ना रेड्डी हेच त्यातल्या त्यात प्रभावी मुख्यमंत्री म्हणावे लागतील. १९८० च्या प्रारंभी त्यांच्याविरुद्ध ओरड सुरू झाली. तथापी, जाणार–जाणार म्हणत त्यांनी आणखी चार-सहा महिने खाल्लेच ! ते गेल्यानंतर टी. अंजय्या यांना आणण्यात आले. त्यांना आणण्यातही कोणतेही खास आडाखे नव्हते. अंजय्यांनी आपल्याला वाढता पाठिंबा मिळावा म्हणून मंत्रिपदे खिरापतीसारखी वाटली. आंध्र प्रदेशाने कधीही पाहिली नाही असे ऐसपैस मंत्रिमंडळ त्यांनी तयार केले. त्यांच्यावर चौफेर टीका झाली आणि त्यांचा एकंदरीत कारभारही विलक्षण भोंगळ होता. पक्षामधील बेशिस्त वाढली आणि त्यांच्याच कारकीर्दीमध्ये एन. टी. रामराव यांचा नवीन पक्ष जन्माला आला आणि सत्ताधारी पक्षानेही धसका घ्यावा इतक्या झपाट्याने तेलगू देशम् या पक्षाने जनमानसामध्ये स्वतःसाठी स्थान निर्माण केले. अंजय्या यांची हकालपट्टी झाली आणि कोणाच्या ध्यानी-मनी नसलेले बी. वेंकटराम मुख्य मंत्री झाले; अंजय्या यांनी कशी का होईना निदान २ वर्षे तरी रेटली; पण वेंकटराम यांना केवळ सहा महिन्यातच सत्ता सोडावी लागली. एकंदरीत इंदिरा काँग्रेसच्या विविध राज्यांमधील स्थान सतत दोलायमान असल्याने जर कोणी सुस्थिर मुख्यमंत्री असलेच तर ते प. बंगालचे ज्योती बसू आणि तामिळनाडूचे एम्. जी. रामचंद्रन असे विनोदाने म्हटले जाते आणि इंदिरा काँग्रेस ज्या पद्धतीने मुख्यमंत्र्यांना वागवत आहे ती पद्धत पाहता या विनोदामधील तिखटपणा लक्षात येतो.

## निवडणुकीचे वेध

आंध्र प्रदेशाच्या राजकारणात दिल्लीकडून नको तितकी ढवळाढवळ होते. मुख्यमंत्री तर दिल्लीवरूनच लादला जातो; पण पुढेही प्रत्येक बाबतीत त्याला इंदिराजींच्या मर्जीवरच अवलंबून रहावे लागते, अशी टीका एन्. टी. रामराव यांनी केली. त्या पद्धतीने सी. अंजय्या व श्री. वेंकटराम यांच्या हाती राज्याची सूत्रे सोपवण्यात आली. त्याची त्यांनी टिंगल–टवाळी केली. इंदिरा काँग्रेसचे गुलाम हैद्राबाद-

मध्ये राज्य करतात असा त्यांचा मुख्य आक्षेप असून तेलगू भाषिकांच्या प्रादेशिक भावनेला आणि स्वाभिमानाला ते फुंकर घालतात आणि सत्ताधारीपक्षही त्यांना भरपूर खाद्य पुरवतो. आता ज्या पद्धतीने श्री. वेंकटराम याना मुख्यमंत्रीपदावरून हुसकण्यात आले त्यावर एन्. टी. रामराव यांनी खरपूस टीका केली असून नवीन मुख्यमंत्र्यांच्या निवडीबाबतही असमाधान व्यक्त केले आहे. प्रचंड पाठबळ असूनही इंदिरा कॉंग्रेसला सत्ता राबवता येत नाही, या गोष्टीचाही ते वारंवार उल्लेख करतात. त्यांनी आगामी निवडणुकीच्या दृष्टीने तयारी चालविली असून राष्ट्रीय पातळीवरील प्रमुखराजकीय पक्षांच्या सहकार्याने आघाडी उघडण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. राष्ट्रीय पातळीवरील पक्षांपैकी भाजप व कम्युनिस्ट यांना स्वत.साठी थोडेफार स्थान निर्माण करता आले असले तरी चार-सहा महिन्यावर आलेल्या निवडणुकांच्या वेळी सत्ताधारी पक्षाला खरे आव्हान एन् टी. रामराव यांच्या तेलगू देशम् या प्रादेशिक पक्षाकडून दिले जाण्याची शक्यता आहे. कर्नाटक आणि आंध्र प्रदेश या दोन्ही राज्यांत जानेवारी अथवा फेब्रुवारी ८३ मध्ये निवडणुका घ्याव्या लागतील आणि इंदिराजी आपले सारे सामर्थ्य पणाला लावून या निवडणुका लढवतील. दक्षिणेकडून त्यांना सगळयात जोरकस पाठिंबा देणाऱ्या आंध्र प्रदेशात त्याना शह देण्याचे जोरदार प्रयत्न सुरू असून एन्. टी. रामराव याच्या रूपाने उभे राहिलेले हे आव्हान इंदिराजी आणि त्यांचा पक्ष कसे पेलतो हे पाहणे मोठे रोचक ठरणार आहे.

## □ मुलगा वाचवा; मुलगी असेल तर मारा !

अपत्यजन्मापूर्वी दिल्या जाणाऱ्या काही विशिष्ट चाचण्यांमुळे जन्माला येणारे बालक मुलगा की मुलगी हे समजू लागल्यापासून मुलासाठी आसुसलेल्या अनेक मातांनी या चाचणीचा लाभ घेतला व मुलगा असेल तर ठीक, अन्यथा केवळ पोटी पोरगी येणार म्हणून तिला मारा असा सल्ला डॉक्टरला देऊन स्वत:वर शस्त्रक्रिया करवून घेऊन त्या मोकळया झाल्या ! हे असे करणे कितपत सयुक्तिक आहे ? विशेषतः ज्या हिणकस पद्धतीने डॉक्टरमंडळी या गोष्टीचा वापर करत आहेत त्याचे समर्थन करणे शक्य आहे का ? नैतिकदृष्टचा, लिंग समजावून घेतल्यानंतर अॅबॉर्शन करून घेणे हा खुनाचाच प्रकार नाही का ? स्त्री-पुरुष यांच्या संख्येवर या गोष्टीचा विपरीत परिणाम होणार नाही का ? यासारखे प्रश्न सध्या उपस्थित केले जात आहेत. केवळ अपवादात्मक परिस्थिती सोडली तर अशा स्वरूपाची चाचणी बेकायदेशीर ठरवावी असे मत व्यक्त होत आहे. काही राजकारणी मंडळी या मताचा हिरीरीने पुरस्कार करत आहेत.

अशा स्वरूपाची चाचणी घेऊन, जन्माला येणाऱ्या बालकाचे लिंग समजणे शक्य आहे हे स्पष्ट झाल्यावर १९७४ साली स्टॉकहोममध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये बोलताना डॉ. डी. एन. पै यांनी या चाचणीचे जोरदार समर्थन केले होते. कुटुंब-नियोजनाची गरज असलेल्या देशांना ही चाचणी म्हणजे वरदान आहे असे मत त्यांनी बोलून दाखवले होते; पण या चाचणीचा वापर चांगल्या पद्धतीने होत नाही असे दिसून आले आहे. नवी दिल्ली येथे एका विवाहितेने आपल्या पहिल्या अपत्त्याच्या वेळीच अशा स्वरूपाची चाचणी करून घेतली आणि जन्माला येणारे बालक हे कन्या आहे हे समजताच तिने चक्क अॅबॉर्शन करून घेतले. इतकेच नाही तर आपल्या या निर्णयाचे समर्थन केले. आता ५०० रुपये खर्चून पोरीचे हे ओझे हलके करणे अधिक शहाणपणाचे आहे असे तिला वाटले. काही डॉक्टरमंडळीना या संदर्भात प्रतिक्रिया विचारता त्यांनी कुटुंब-नियोजनाच्या दृष्टीने या गोष्टीकडे पाहणे अगत्याचे आहे असे मत व्यक्त केले दोन मुली ज्यांना आहेत अशा माता आपल्या तिसऱ्या खेपेच्या वेळी जर अशी चाचणी देण्यासाठी आल्या तर त्यात गैर काय आहे ? असा प्रतिप्रश्न एका डॉक्टरनेच विचारून केवळ कन्या जन्माला येते म्हणून अॅबॉर्शन केले गेले तर स्त्री-पुरुष याच्या परस्पर प्रमाणाचा समतोल ढळणार नाही का ? या प्रश्नावर त्याचे उत्तर असे की, जेवढा बागुलबुवा दाखवला जातो तेवढा हा प्रश्न गभीर नाही सर्वसाधारणपणे एक किंवा दोन कन्या झाल्यानंतरच माता या चाचणीसाठी येतात. आपल्याला मुलगा व्हावा असा त्यांना सोस असतो आणि तिसरी मुलगी मात्र नको असते. अर्थात लिंग समजावून घेऊन दिलेला हा नकार नैतिक पातळीवर समर्थनीय ठरू शकणार नाही; पण संपूर्ण कुटुंबाचे स्थैर्य, मनःशांती आणि आर्थिक विवंचना यांचा विचार करता मातेने तिसऱ्या मुलीस नकार देणे समर्थनीय ठरू शकेल. आपल्या समाजात मुलाबद्दलची ओढ, धर्मशास्त्राच्या दृष्टीने मुलाला असलेले महत्त्व आणि मुलीच्या विवाहाच्या समस्या याचा विचार करता गरजू माताना याबाबतचे निर्णय घ्यायचे अधिकार देणे हे काळसुसंगत ठरेल. खेरीज माता जबाबदारीने या चाचण्यांचा वापर करतात असेही दिसून आले आहे कारण आपण जे करतो आहोत. ते नैतिकदृष्टया समर्थनीय नाही याची पोच पालकांनाही असते; परंतु केवळ परिस्थितीपुढे हतबल होऊन त्यांना अशा स्वरूपाच्या चाचणीचा विचार करावा लागतो.

स्त्री पुरुष-प्रमाणाच्या संदर्भात या प्रश्नाकडे पाहिले तर असे दिसून येते की, या चाचणीद्वारा घेतल्या गेलेल्या निर्णयामुळे अजून तरी हा समतोल फारसा ढळलेला नाही. १९०१ साली म्हणजे अशा स्वरूपाची कोणतीही चाचणी उपलब्ध नसताना भारतामध्ये एक हजार पुरुषामागे ९७२ स्त्रिया असे प्रमाण होते. १९७१ मध्ये हे प्रमाण एक हजार पुरुषामागे ९३० स्त्रिया असे होते, तर अगदी अलीकडेच झालेल्या जनगणनेप्रमाणे १९८१ मध्ये हे प्रमाण एक हजार पुरुषामागे ९३५ स्त्रिया असे आहे. या प्रमाणावर लिंगचाचणीमुळे फार मोठा परिणाम होईल असे आपल्याला वाटत नाही, असे मत केंद्रीय आरोग्यमंत्र्यांनी व्यक्त केले आहे. खेरीज १९७१ मध्ये आपण गर्भपाताला कायदेशीर मान्यता दिली असल्याने गर्भपाताला विरोध करणे आधी घेतलेल्या निर्णयाशी विसंगत ठरेल ! डॉक्टरमंडळीनी जबाबदारीने या चाचणीचा वापर केला तर पुष्कळसे प्रश्न सुटू शकतील असे त्यांना वाटते. ज्या सामाजिक कार्यकर्त्यांचा अशा स्वरूपाच्या चाचणीला विरोध आहे, त्यानी खाजगी डॉक्टर्सना अशा स्वरूपाची चाचणी देता येऊ नये असे मत व्यक्त केले असून केवळ सरकारी दवाखान्यातच या चाचणीची सोय असली तर या चाचणीच्या बेबंद गैरवापराला आळा बसेल असे त्यांना वाटते. काही महिला संघटनांनी कुटुंबसंस्थेच्या स्वास्थ्याचा विचार करता ही चाचणी आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले असले तरी या बाबतीत अखेरचा शब्द स्त्रीचा असावा असे त्यांना वाटते. केवळ पतीच्या अथवा कुटुंबियाच्या दडपणामुळे एखाद्या स्त्रीला या स्वरूपाच्या चाचणीनंतर गर्भपात करावा लागू नये, असे या संस्थांचे मत आहे. पुण्या-मुंबईमध्ये या प्रश्नाचे स्वरूप तीव्र नसले तरी उत्तर हिन्दुस्थानमध्ये- विशेषतः खुद्द दिल्लीमध्ये ही चाचणी व त्यातून उद्भवणारे गर्भपात याबाबत गंभीर वातावरण असून डॉक्टरमंडळी व्यवसाय आणि धनलाभ या दृष्टीनेच या प्रश्नाकडे पाहत असल्याने सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. □

# श्री. अरुण शौरी आणि त्यांची पत्रकारिता

प्राध्यापक ह. म. घोडके

१९८२ चे मॅगसेसे पारितोषिक श्री. अरुण शौरीना मिळल्याचा आनंद शौरीपेक्षा त्याच्या वाचकवर्गाला जास्त झाला. इंडियन एक्सप्रेसचा हा तरुण कार्यकारी संपादक गेल्या दोन वर्षांपासून देशातील व विदेशातील पारितोषिकामागून पारितोषिके पटकावीत आहे. आपल्या एका संपादकाला आशियाचे नोबेल पारितोषिक म्हणून प्रसिद्ध झालेले मॅगसेसे पारितोषिक मिळाले, हे ऐकून एक्सप्रेस ग्रुपचे मालक श्री. रामनाथ गोएंका आनंदित झाले. मात्र त्याचबरोबर शौरीच्या ह्या तडाखेबंद यशाने ते काहीसे चिंताक्रांतही झाले. मिळालेल्या प्रत्येक यशाने धुंद होऊन शौरी सत्ताधाऱ्यावर एकापेक्षा एक धारदार प्रहार करीत सुटले, तर त्यांना एक्सप्रेस ग्रुपमध्ये संभाळून ठेवणे मोठे अवघड जाईल, हे मालक ह्या नात्याने गोएंकांना माहीत आहे. ते विनोदाने अरुण शौरीना रेसचा घोडा म्हणतात. तो एक्सप्रेसच्या टांग्याला जुंपणे किती कठीण आहे, हे गोएंकांना चांगले ठाऊक आहे. अंतुले-प्रकरण असो की, नुकतेच उद्‌भवलेले कुओ तेलाचे प्रकरण असो, ते शौरीना नेहमी सबुरीचा सल्ला देतात. असे सल्ले ह्या तरुण, उतावळा संपादक कधी ऐकत नाही. त्यामुळे एक्सप्रेस टॉवर्समध्ये नेहमी धाकधकीचे वातावरण असते.

एकेचाळीस वर्षांचा हा तडफदार युवक विलक्षण बुद्धिमान आहे. पत्रकारिता हा त्याचा काही पेशा नाही. ह्या व्यवसायात आपण कधी प्रवेश करू व तो अंगच्या गुणाच्या जोरावर आपण इतका गाजवू शकू, ह्यावर त्यांचाही विश्वास नसावा. वर्ल्ड बँकेमध्ये अर्थतज्ज्ञ म्हणून नोकरी करणाऱ्या शौरीनी एक्सप्रेसमध्ये जानेवारी. १९७९ मध्ये प्रवेश केला. अर्थतज्ज्ञ म्हणून त्याना चागला लठ्ठ पगार मिळत होता; पण आपल्या विचारांना मोठे व्यासपीठ शोधू पहाणाऱ्या शौरीनी इंडियन एक्सप्रेसचं महत्त्व बरोबर हेरल. ज्या काळी ते संपादक म्हणून एक्सप्रेसमध्ये रुजू झाले, तो काळ त्यांना सर्वस्वी अनुकूल होता. कांग्रेस आयची भ्रष्ट राजवट आपल्याच पापाच्या बोजाखाली कोसळून पडली होती, त्या राजवटीचे शौरी हे शत्रू. त्यांनी सुरुवातीच्या उत्साहात कांग्रेस (आय) पक्षाची एकामागोमाग एक प्रकरणे बाहेर काढली,

आपल्या संपादकीय कारकीर्दीत त्यांनी जे लेख लिहिले, ते विलक्षण गाजले. संजय गांधींची गुंडगिरी, इंदिरा गांधीचे कायदे नित्य धाब्यावर बसवणे, मेहरुल्ली येथील फार्महाउसवर त्यांनी दडवून ठेवलेली संपत्ती हे विषय त्यांनी गाजवले. इंदिरा गांधींच्या राजकीय यशाची काही रहस्ये त्यांनी उजेडात आणली. कांग्रेसचे बेगडी नेते, त्यांच्या इस्टेटी, त्यांचे बेकायदेशीर व्यवहार .हे सर्व त्यांचे आवडते विषय होते.

ज्या अंतुले प्रकरणामुळे ते एकदम प्रकाशात आले, ते प्रकरण त्यांनी अत्यंत अभ्यासपूर्वक वृत्तपत्राच्या स्तंभांतून मांडले. अंतुले प्रकरणाचे वैशिष्ट्य असे की, त्यातील भ्रष्टाचार आणि सरकारी अधिकाराचा दुरुपयोग हे काही गुपित नव्हते. लोकांना त्याची पूर्ण कल्पना होती. 'स्टेटसमन' सारख्या वृत्तपत्रानी शौरीच्याही अगोदर ते प्रकरण आपल्या स्तंभातून मांडले होते. मराठी वृत्तपत्रेही बिचकत बिचकत का होईना, अंतुले व त्यांच्या प्रतिष्ठानावर टीका करीत होती तरीही अंतुले प्रकरणाचे सर्व धागेदोरे वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्याचे व मुख्य म्हणजे अंतुलेंना सत्तेवरून घालविण्याचे श्रेय शौरीनाच दिले जाते. कारण ते प्रकरण वृत्तपत्रातून त्यांनी ज्या पद्धतीने मांडले, ती पद्धत त्याच्यापूर्वी कोणी अवलंबिली नव्हती. त्या प्रकरणासंबंधीच्या कायद्यातील तरतुदीचा भंग, त्यास असणारी शिक्षा व कागदपत्राच्या फोटोप्रती त्यानी वृत्तपत्रात पहिल्यांदाच मांडल्या. एकूण १४० स्तंभांतून व ७५०० शब्दामध्ये मांडलेले हे प्रकरण साधेसुधे वृत्तपत्रीय लेखन नव्हते, तर तो सत्ताधाऱ्यांवर योजनापूर्वक टाकलेला बॉंब होता. त्यापाठीमागे चिकाटी, अभ्यास व उत्कृष्ट टीमवर्क होते. मोठ्या कष्टाने मिळवलेली ही माहिती व पुरावे इतके बिनतोड होते की, त्याविरोधी खुलासा करण्याची कुणाला हिंमत झाली नाही, अब्रुनुकसानीचा खटला तर दूरच राहो! भारतीय पत्रकारितेच्या इतिहासात हे सर्व अभूतपूर्व होते. ह्या प्रकारामुळे शौरी वृत्तपत्रसृष्टीत एकदम 'हिरो' 'सुपरस्टार' (?) मानले जाऊ लागले. मात्र आपण हिरोगिरी करतो आहोत किंवा काही तरी सनसनाटी खळबळजनक वार्ता लोकाना देतोय, असा त्यामध्ये अभिनिवेष नव्हता, तर भारताच्या गढुळलेल्या विकृत राजकीय जीवनातील घाण दूर करण्याचा तो एक प्रामाणिक प्रयत्न होता. हे प्रकरण वृत्तपत्रात येऊ लागल्यापासून इंडियन एक्सप्रेसचा खप अठरा हजारानी वाढला! ह्या प्रकरणाने त्या वृत्तपत्राला एक प्रतिष्ठा दिली. शौरी जे काही लिहितात, ते सर्व सत्य असते, तो सत्याचा भेदक आविष्कार असतो, ही खूणगाठ तेव्हापासून लोकानी मनाशी बांधली. देशातील राज्य व केंद्र स्तरावरील बहुतेक सर्व विधिमंडळात राक्षसी बहुमत असलेल्या पक्षाचा एक मुख्यमंत्री एका पत्रकाराने पदच्युत केला, हा भारतीय पत्रकारितेचा गौरव मानला पाहिजे. जे विरोधीपक्षांना जमले नाही, ते कार्य शौरीनी केले. शौरीना तेव्हापासून Giant-killer मानले जाते.

### वॉटरगेट-ट्रस्टगेट

अंतुलेंच्या 'ट्रस्टगेटमुळे' वृत्तपत्राच्या इतिहासात अभिनव अशी अन्वेषणात्मक पत्राकारिता (*Investigative Journalism*) सुरू झाली, पूर्वी ती कधीकधी वापरली गेली; पण ती बहुताशी पिवळ्या पत्रकारितेशी निगडित होती. अरुण शौरी इंडियन एक्सप्रेसमध्ये दाखल झाल्यापासून ह्या पद्धतीचा जास्त जास्त वापर होऊ लागला आहे. शौरीनीच अश्विनी सरीन ह्या पत्रकाराला मोलाची मदत करून 'कमला'ची हृदयद्रावक हकीगत इंडियन एक्स्प्रेसमध्ये वेशीवर टांगली. कमला प्रकरण विलक्षण गाजले. त्याचप्रमाणे भागलपूर अंधांचे प्रकरण एक्स्प्रेसच्या पत्रकारानीच शोधून काढले. मानवी मूल्यांच्या जपणुकीसाठी एक्स्प्रेस ग्रुपच्या पत्रकारानी एका सर्वंकष लढ्याला सुरुवात केली आहे.

पत्रकार स्तंभलेखक म्हणून शौरीच्या ज्या मर्यादा आहेत, त्याही समजून घेणे इथे उचित होईल. वृत्तपत्रीय लेखनाची शैली, बारकावे त्यांना फारसे ज्ञात नाहीत, त्याचा सरावही नाही त्यांचे लिखाण बरेचसे तुटक तुटक असते, ठिसूळ असते. त्यातील विस्कळितपणामुळे ते लिखाण वृत्तपत्रीय लेखन ह्या सदरात मोडणारे नाही अशी काही संपादकांची त्यांच्याबाबत तक्रार आहे. ह्या तक्रारीत तसे बरेच तथ्य आहे. त्यांचे लेख बंदिस्त असे न वाटता ते एक स्वैर चिंतन वाटते. ह्या व्यवसायात ते तसे नवखे. तेव्हा नेहमीची साफसफाई त्यांच्या लेखनात जाणवत नाही. सैद्धांतिक अथवा पांडित्यपूर्ण शैलीत ते कधीही लेखन करीत नाहीत. जो काही विषय ते हाती घेतात;

त्याच्या मुळाशी जाऊन ते भिडतात. त्या विषयांचा सर्व दृष्टिकोनांतून कीस काढून त्याचा राजकीय व्यवस्थेवर, सामाजिक जाणिवावर व एकूणच मूल्य-पद्धतीवर कोणता परिणाम होईल, हे सागण्याकडे त्याचा कल असतो. वृत्तपत्रीय सकेत झुगारून देऊन त्याच्या लेखातील शब्द वाचकांच्या अंतःकरणाला थेट जाऊन भिडतात कधी हे शब्द खोल जिव्हारी जाऊन झोंबतात, तर कधी ते त्यास उद्विग्न, प्रक्षुब्ध करून सोडतात. अवतीभवती भ्रष्टाचाराचा समुद्र पसरलेला आहे व त्यात आपण एकटे सापडलो आहोत, असा भास वाचकाला होऊ लागतो. त्याचे साधे सरळ लेखन सत्यान्वेषी असते. आपला लेख पोचट, बेगडी शब्दांनी सजविणे हे त्यांना मजूर नसावे. अग्रलेखातून पायघोळ प्रवचने झोडण्याची बऱ्याच संपादकांना सवय असते. तसल्या लेखनाचा गेंड्याची कातडी असलेल्या राजकारण्यांवर कितीसा परिणाम होणार? राजकारणातील सराईत मंडळीच्यावर ह्या भोंगळ भाषेचा काहीएक परिणाम होत नाही. मात्र जर त्यानी केलेल्या भ्रष्टाचाराबद्दल थंडसंहितेत किती मुदतीची शिक्षा त्यांना सांगितली आहे हे जर लिहिले तर ते हवालदिल होतात, त्यांची झोप उडते, हे शौरीना अनुभवाने चागले माहीत झाले आहे.

## बांधिलकीचे प्रतीक

इंग्रजी वृत्तपत्रांचे संपादक तर समाजाशी नातेच हरवून बसले आहेत. आपल्या वातानुकूलित खोल्यांमध्ये सेक्रेटरीसह विराजमान झालेल्या ह्या संपादकांना समाजातील प्रखर वास्तवतेची फारशी जाण नाही. शौरींनी ह्या बंदिस्त पत्रकारितेला रस्त्यावर आणून उभे केले. पत्रकाराच्या सामाजिक बाधिलकीचे मूर्तिमंत प्रतीक म्हणजे अरुण शौरी! वृत्तपत्रे ही पोकळीत वावरत नसून समाज नावाच्या अति ज्वालाग्राही वातावरणात वावरत असतात, हे शौरीनी एक्स्प्रेसच्या स्तंभातून अनेक वेळा दाखविले आहे.

लोकशाही मूल्ये व घटनेचे पावित्र्य टिकविण्यासाठी शौरीनी जे प्रयत्न चालविले आहेत, त्यास अनुलक्षून Ombudsman लोकपालाची भूमिका ते बजावतात. असा गौरव त्यांचा काहीनी केला आहे. स्वित्झर्लंडसारख्या काही देशात Ombudsman हे एक महत्त्वाचे पद आहे. राज्यघटनेवर होणाऱ्या अतिक्रमणावर हा अधिकारी डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवतो. भारतीय घटनेत अशा अधिकाऱ्याची तरतूद नाही. भारतात लोकशाही व्यवस्था आहे; पण लोक आपल्या हक्काबाबत पुरेसे सावध नसल्यामुळे राज्यकर्ते हळूहळू घटनेतील स्वातंत्र्याचा सकोच करण्याचा प्रयत्न करतात. भारतीय जनतेची राजकीय उदासीनता एव्हढी प्रचंड आहे की, भूतकालात अनेक परकीयानी इथे निर्धास्तपणे राज्य केले. अशा भारतीयांना राज्यघटनेच्या दुरुस्त्याचे गांभीर्य थोडेच लक्षात येणार? त्यात विरोधी पक्ष ढेपाळलेले असल्यामुळे राज्यकर्ता पक्ष अधिकच शेफारला आहे. विधिमंडळातील प्रचंड बहुमत पाठीशी असल्यामुळे आम्ही करू ती पूर्वदिशा, अशी वृत्ती सत्ताधाऱ्यांची आहे. व्यक्तिस्वातंत्र्याच्या विकासासाठी शौरीनी न्या. तारकुंड्यांच्या Peoples Union For Civil Liberties (P. U. C. L.) ह्या संघटनेत सचिवपदाची जबाबदारी अंगावर घेतली आहे. सार्वजनिक जीवनात ते फारसा रस घेत नाहीत सभा-संमेलने, पार्ट्या ह्यांपासून ते सदैव दूर असतात; पण ह्या नागरी हक्कासंबंधीच्या सघटनेची कामे मात्र ते हौसेने करीत असतात.

नुकत्याच गाजलेल्या कुओ तेलाच्या प्रकरणातही त्यांच्या सत्ताधारी मंत्र्याशी चकमकी झडल्या. मंत्रीमहोदय खोटे बोलून सभागृहाची दिशाभूल करीत असल्याचा शौरींनी आरोप केला होता. हिदायतुल्लानाही, राज्यसभेचे स्थान काय व त्यातील सभापतीची कर्तव्ये कोणती, हे त्यांनी ठणकावून सांगितले होते. मंत्र्यांच्या वक्तव्यावर प्रतिकूल टीका करणे व ते खोटी माहिती सागत असल्याचा आरोप आपल्या वर्तमानपत्रातून करणे, हे धाडस शौरीच करू जाणे. ह्या प्रकरणी जर ते खोटे ठरले असते तर त्यांना संसदेची बेअदबी केली, म्हणून मोठी शिक्षा होऊ शकली असती. हे धोके ते पत्करतात. कारण त्यांची माहिती व राज्यघटनेचे ज्ञान हे पक्के असते. त्यांच्यावर आजतागायत राज्यकर्त्यांच्या टोळीपैकी कोणी खटला भरू शकला नाही.

शौरीच्या सबंध वृत्तपत्रीय लिखाणाला करुणेचा स्पर्श लाभला आहे. सत्ताधारी पक्ष लोकशाही सकेत व नीतिमत्ता सरळ सरळ गुडाळून ठेवतो; पण भारतीय जनता त्यांना जाब विचारीत नाही. त्यामुळे राज्यकर्त्यांचा नित्य नवा खोटेपणा खपून जातो, गुंडगिरी खपून जाते. त्या पक्षाला वठणीवर आणायचे कोणी निकराचे प्रयत्न करीत नाही, ही त्यांची व्यथा आहे. एक टेबल व एक टेलिफोन एवढ्या भांडवलावर सत्ताधारी पक्षातील एक लब्धप्रतिष्ठित व्यक्ती देशाला नऊ कोटी रुपयाना गंडवते; पण त्या व्यक्तीचा बदोबस्त जनता, संसद किंवा विरोधी पक्ष ह्यापैकी कोणीही करू शकत नाही. भारतीय लोकशाहीची ही शोकांतिकाच मानावी लागेल. इंदिराजी देशाला मायाविनीप्रमाणे फसवीत आहेत, त्याचे व त्यांच्या पक्षाचे खरे स्वरूप उघडकीस येऊनही ती सर्व मंडळी आपल्या छाताडावर मजेत राज्य करू शकतात, हा विचार ते आपल्या प्रत्येक लेखात वाचकांसमोर ठेवतात. अंतुले, गुंडुराव आणि कल्पनाथराय याच्यासारख्या नेत्यांच्या पलटणीच्या पलटणी सत्ताधारी पक्षात आहेत; पण त्यांच्या राक्षसी बहुमतामुळे व राज्यावरील त्यांच्या असलेल्या पकडीमुळे सामान्य माणूस त्यांच्या वाटेला जात नाही, जाऊ शकत नाही. देशातील भ्रष्टाचाराला संघटित व संस्थात्मक स्वरूप लाभल्यामुळे सामान्य माणूस असहाय्य झाला आहे. एकपक्षीय राजवटीच्या राक्षसी वरवंट्याखाली राज्यघटनेतील तत्त्वे, राजकीय जीवनातील शुचिता आणि सदाचार किड्यासारखे रगडले जात आहेत, ही त्यांच्या लेखांतून होणारी जाणीव वाचकाला विलक्षण अस्वस्थ करून सोडते.

शौरीचा वृत्तपत्रीय प्रवास आज तरी एकाडा चाललेला दिसतो. ह्या क्षेत्रात त्यानी आपले एक स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. इतर पत्रकार त्यांचे अनुकरण करोत अथवा न करोत, ते आपल्या स्वतंत्र वाटेने पुढे जाणार! बुद्धिवंत, सुजाण वाचकवर्गात त्याचे लेखन विलक्षण लोकप्रिय होऊ लागले आहे. वृत्तपत्रीय लेखनातील नेहमीची चाकोरी टाळून त्यांनी वेगळा मार्ग चोखाळला. त्याच्या लेखनाने पत्रकारितेची संकल्पनाच बदलून गेली आहे. आशियातील मागासलेली, सुस्त आणि गलथान लोकशाही व्यवस्था अरुण शौरीसारखे निर्भीड व अभ्यासू पत्रकार सुधारू शकतील, ही जाणीव झाल्यामुळे मॅगसेसे पारितोषिक त्याना मिळाले. हिंदू धर्माच्या तत्त्वज्ञानाची व्यासंगपूर्ण चर्चा करणारा त्यांचा एक ग्रंथही आज गाजत आहे. घटनेचे पावित्र्य व राजकीय जीवनातील मांगल्य टिकविण्यासाठी त्यांनी धर्मयोद्ध्याची जी आक्रमक भूमिका घेतली आहे, तिला कोणती फळे येतील हे आज निश्चितपणे सांगणे कठीण आहे. अरुण शौरीसारखे आणखी दहा पत्रकार देशात निर्माण झाले असते तर देशाचे चित्रच बदलले असते' हे पिलू मोदीनी लोकसभेत काढलेले उद्गार शौरीना मॅगसेसे पारितोषिकापेक्षाही जास्त काही तरी देऊन जातात. तरीही शौरी एक्सप्रेस टॉवर्समध्ये किती काळ टिकून रहातील, ह्याबाबत अनेकांना चिंता आहे. भ्रष्टाचाराविरुद्ध त्यानी जे अघोषित युद्ध सुरू केले आहे, त्याचा निगरगट्ट राजकारणावर परिणाम होऊ लागला आहे; पण ही लढाई खुद्द शौरीच्यावर उलटण्याचीही तितकीच भीती आहे. ह्या संघर्षात शौरीचा बळी पडला, तर तो दिवस भारतीय लोकशाहीसाठी काळा दिवस ठरेल! □

मणिभाईंनी प्रथम उरळीत पाऊल टाकले तेव्हा परिस्थिती फारच प्रतिकूल होती. आता

# ३६ वर्षांनंतर....तीन तपे उलटल्यावर....?

## रमेश दिघे

'मणिभाईंच्यामुळेच आमच्या उरळीकांचनचे नाव अवघ्या आशिया खंडात फेमसझालं.' उरुळीकाचनच्या एका सामान्य गावकऱ्याचे हे उद्गार! श्री. मणिभाई देसाई यांना ग्रामीण भागातील गरिबांच्या विकासासाठी केलेल्या कार्याबद्दल यंदाचे मॅगसेसे पारितोषिक मिळाले. या प्रकारे जागतिक पातळीवर गौरव होत असलेले कार्य समजावून घ्यावे म्हणून मी उरुळीला गेलो...प्रत्यक्ष मणिभाईंची भेट पुण्यामध्ये झाली होतीच. त्यानी आपल्या कार्याच्या प्रारभाची थोडक्यात माहिती दिली; पण त्याने माझे समाधान झाले नाही. त्यांच्या कार्याचा व व्यक्तिगत जीवनाचा तपशील मिळविण्यासाठी मी भेटलो मणिभाईंचे सुरुवातीपासूनचे एक सहकारी, श्री. दत्ता काचन याना. त्यांनी *एकेका आठवणीला उजाळा देऊन मणिभाईंचा जीवनपट उलगडून दाखविला.* जागेअभावी फक्त निवडक भाग येथे देत आहे.

मणिभाईंचा जन्म गुजराथमधील एका छोटया खेडयात झाला—कोसमाडा (जि. सुरत). कुटुंब सुखवस्तू, वडिलाकडे पाटीलकी त्यांचे वैशिष्टच दिलेला शब्द पाळणे. आई दयाळू, महिलांच्या कामात पुढाकार घेणारी. एकूण पाच भावंडात मणिभाई सर्वांत धाकटे, चौथीनंतरचे त्याचे प्राथमिक शिक्षण मावशीच्या गावी अनावील आश्रमात झाले. येथील संचालक दयाळजीभाई हे विवेकानंदाच्या विचारांचे पुरस्कर्ते. त्याच्यापासून स्फूर्ति घेऊन विवेकानंद चरित्राचे वाचन व अभ्यास केला. विशेषतः विवेकानंदांच्या 'राजयोगा'चा परिणाम होऊन विद्यार्थीदशेतच आजन्म ब्रह्मचारी राहण्याचा निश्चय केला.

१९३० साली गांधीजींनी मिठाचा सत्याग्रह सुरू केला, तेव्हा मणिभाईंचे वय होते अवघे दहा. या बालवयात त्यांनी स्वयसेवक म्हणून सत्याग्रहातील मीठ घरोघर वाटले. १९४२ साली जयप्रकाश नारायण, अच्युतराव पटवर्धन याच्या जहाल नेतृत्वाकडे मणिभाई आकर्षित झाले. भूमिगत चळवळीत भाग घेतला; परंतु पुढे देशातील भूमिगताचे हिंसात्मक कार्य गांधीजीना पसंत पडले नाही. त्या वेळी मणिभाईंनी बाहेर येण्याचा निर्णय घेतला. साहजिकच अटक झाली. हिंसात्मक कारवायामध्ये भाग घेतल्यामुळे त्याना गुन्हेगार कैदयांमध्ये ठेवण्यात आले. हे कैदी होते ग्रामीण भागातील. परिस्थितीने गुन्हेगारीकडे वळलेले. त्याच्या सहवासात असताना मनात विचार आला, 'भारतातील शेतकऱ्याला शेतावर पक्के उभे केले तर तो वाईट मार्गाला लागणार नाही ? या विचाराला जोड मिळाली ती मिल, मार्क्स, म. गांधी व माओ यांच्या तत्त्वविचारांच्या वाचनाची. गुजराथमधील खेडयात राहून रचनात्मक कार्य करण्याचे कैदेत असताना निश्चित केले.

तुरुंगातून सुटका झाल्यावर मणिभाईंनी सेवाग्रामला जाऊन म. गांधीची भेट घेतली. गाधीजीनी 'पदवी' घेतल्यानंतर परत येण्यास सांगितले. बी. एस. सी. ची परीक्षा देऊन ते पुन्हा गाधीजीकडे गेले. गाधीजीनी सुनावले की, 'मी लगेच तुला येथे ठेवून घेणार नाही. कारण तरुण माणूस पुष्कळ वेळा भावनेच्या आहारी जातो. तेव्हा काही दिवस घरी परत जा व महाविद्यालयात जे शिकलास ते विसरून ये !'

मणिभाई गावी येऊन रचनात्मक कार्य करू लागले. हेच कार्य पुढे चालू ठेवण्याचा निर्णय पक्का झाल्यावर त्यानी पुन्हा गांधीजीची भेट घेतली. सेवाग्राममध्ये रचनात्मक कार्याविषयी दादा धर्माधिकारीचे मार्गदर्शन मिळाले.

### उरळीकांचनची निवड

पुढे काही महिन्यानी गाधीजी मणिभाईंना घेऊन पुण्यास आले (१ जानेवारी १९४६). त्या वेळी ते गाधीजीचे हिशोबनीस म्हणून काम पाहात होते. एखाद्या खेडयात निसर्गोपचाराचे कार्य सुरू करावे असे महात्माजीना वाटत होते. 'स्थळा' बाबत त्यांची अट होती. ज्या गावात रेल्वेस्टेशन, पोस्ट, मुबलक पाणी, सडक, कोरडी हवा असेल व जेथील लोक किमान दहा हजार रुपये देतील, तेथे कामाला सुरुवात करावी गाव निवडण्याची कामगिरी सोपविली होती बाळकोबाजी भावे यांच्याकडे !

बाळकोबाजीनी निवड केली उरळीकाचनची. ही निवड करण्यामध्ये पुण्याचे एक व्यापारी मोतीलाल कोठारी, पन्नालाल बलदोटा इत्यादींचा वाटा आहे त्या वेळी गावकऱ्यानी आठ हजार रुपये रोख व महादेव तात्याबा कांचन (पाटील) यांनी चार एकर जमिनीचे दान केले. गाधीजी प्रथम उरुळीमध्ये मणिभाई व बाळकोबाजीसह २२ मार्च १९४६ रोजी आले. निसर्गोपचार आश्रमाची स्थापना झाली. 'रोगप्रतिकारक निसर्गोपचार' अशी गाधीजीची कल्पना होती. याबरोबरच ग्रामसुधाराचे काम हाती घेण्यात आले. गाधीजी स्वातंत्र्याच्या वाटाघाटीसाठी दिल्लीला रवाना झाले.

स्वातंत्र्यानंतर आश्रमाच्या कामाचा तपशील ठरविण्यासाठी मणिभाई दिल्लीला गेले फाळणीमुळे उसळलेल्या दंगली शांत करण्यासाठी उत्तर भारताच्या दौऱ्यावर निघालेल्या बापूजीनी त्यांना

आपल्याबरोबर घेतले. प्रवासात बरीच चर्चा झाली. गांधीजीच्या बोलण्यातून असे सूचित झाले की, त्यांचा वर्षातून सहा महिने उरुळीत राहण्याचा विचार आहे. त्यांचे उद्‌गार होते–'अकस्मात माझा मृत्यू झाल्यास माझा आत्मा उरुळीला येईल ! तेथे तू काम करताना दिसल्यास माझ्या आत्म्याला समाधान लाभेल.' चर्चा संपली. आजन्म उरुळीत राहण्याची शपथ घेऊन मणिभाई परतले !

'उरुळीच्या आश्रमासाठी एक लाख रुपये द्यावेत' हे गांधीजीचे पत्र घेऊन मणिभाई सेवाग्रामला आले. एका सत्तावीस वर्षांच्या तरुणाला गांधीजींनी येवढी मोठी रक्कम देण्याचे सांगावे याचे सेवाग्राम-आश्रम–व्यवस्थापकांना आश्चर्य वाटले. त्यांनी गांधीजींशी प्रत्यक्ष संपर्क साधून खात्री करून घेतली.

सेवाग्राममधून मिळालेल्या रकमेचा पहिला हप्ता घेऊन मणिभाई उरुळीत दाखल झाले. आश्रमासाठी पक्की इमारत बांधण्यात आली. आश्रमाचे काम जोमाने सुरू होत असताना घडलेली दुर्घटना म्हणजे म. गांधींचा वध ! गांधीजींच्या निधनानंतर आश्रमाच्या प्रमुखपदी श्री. वल्लभभाई पटेल यांची निवड होणार होती; परंतु फाळणी व गांधीहत्या यामुळे देशातील वातावरण अशांत होते. 'प्राप्त–परिस्थितीत मला आश्रमाचे अध्यक्षपद स्वीकारता येणार नाही' असे सांगून वल्लभभाईंनी श्री. मोरारजी देसाई यांचे नाव सुचविले. मोरारजीभाईंनी वल्लभभाईंच्या सूचनेचा स्वीकार केला. १९४९ साली गांधीजींच्या कल्पनेतला 'निसर्गोपचार ग्रामसुधार ट्रस्ट' स्थापन झाला !

दरम्यानच्या काळात त्या वेळच्या मुंबई सरकारच्या सूचनेवरून शिक्षकांना सूतकताई, विणकाम इत्यादीचे शिक्षण देण्यासाठी उरुळीमध्ये एक शिबीर मणिभाईंनी आयोजित केले. या शिबिरात एकदा प्रसिद्ध गांधीवादी कार्यकर्ते शंकरराव देव यांचे व्याख्यान होते. गांधीजींनी सासवडऐवजी उरुळीला आश्रम स्थापन केला, याबद्दल त्यांच्या मनात राग होता. इतकेच नव्हे तर पुढे देव–देवगिरीकर–या महाराष्ट्रातील गांधीस्मारकनिधीच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी म. गांधींनी स्वतः स्थापन केलेल्या या आश्रमाला काहीही मदत दिली नाही. तसेच स्मारकनिधीच्या केंद्रीय समितीने आश्रमाला फारशी मदत केली नाही. 'कृषि–गोपालन' हे गांधीजींच्या सर्वोदयात बसत नाही, असे समर्थन स्मारकनिधीच्या प्रमुख कार्यकर्त्यांकडून करण्यात आले.

'तेजोभंग करून घेऊन पैसा स्वीकारायचा नाही' असा निश्चय बाळकोबाजी भावे यांनी केला. आश्रमासाठी फंड गोळा करण्यासाठी ते आफ्रिकेत गेले (१९५४). तसेच ५६ साली भारतभर हिंडून निधी उभा केला. यातील एक आठवण नमूद करण्यासारखी आहे. बाळकोबाजी फंड गोळा करत मुंबईत पायी फिरत असताना, त्याच मार्गाने मोरारजीभाई मोटारीतून जात होते. आपण ज्या संस्थेचे अध्यक्ष आहोत, तिच्यासाठी निधी गोळा करत बाळकोबाजीसारखा कार्यकर्ता रस्त्याने पायी हिंडतोय ही गोष्ट मुख्यमंत्री असलेल्या मोरारजीभाईंना खटकली. त्यांनी दुसऱ्या दिवशी बाळकोबाजींना बोलावून घेतले.

'तुमच्या संकल्पपूर्तीसाठी किती रक्कम हवी ?' याची विचारणा केली व एकसष्ठीनिमित्त स्वतःला मिळालेल्या निधीतून संकल्पपूर्ति केली. यानंतर आश्रमाने कधीही निधी गोळा केला नाही !

आश्रमातील रुग्णांना सकस दूध, लोणी, तूप मिळावे व शिलकी दुधातून आश्रमास चार पैसे मिळावेत म्हणून आश्रमाची गोशाळा असावी अशी कल्पना बाळकोबाजी भावे यांनी मांडली. काही स्थानिक गायी खरेदी करून गो–शाळा सुरू केली. काही दिवसांनंतर जास्त दुधासाठी सौराष्ट्रातून 'गीर' गायी आणण्यात आल्या. दोन वर्षांनंतर गोशाळा तोट्यात चालू असल्याचे बाळकोबाजींच्या लक्षात आले. आश्रमाची व्यवस्था पाहणाऱ्या मणिभाईंनी गोशाळेचेही काम पाहावे असे त्यांनी सुचविले.

## गोशाला–'गोपालरत्न'

गाईविषयी फारसे ज्ञान नसणाऱ्या मणिभाईंनी ही नवीन जबाबदारी स्वीकारली. हे काम वैज्ञानिक दृष्टिकोनातून केले तर यशस्वी होईल असा त्यांचा विश्वास होता. गोपालनविषयक देशी–परदेशी पुस्तकांचे त्यांनी वाचन केले. साडेतीनशेहून अधिक गायींचे शव–विच्छेदन करून गायीच्या शरीरशास्त्राचा बारकाईने अभ्यास केला. याचे फलस्वरूप म्हणजे अखिल भारतीय दुग्ध–स्पर्धेत उरुळी–गोशाळेतील गायींनी सातत्याने पहिला क्रमांक पटकाविला ! १९६२ साली केंद्रीय गो–संवर्धन केंद्राने मणिभाईंचा 'गोपाल–रत्न' हा किताब देऊन गौरव केला !

गोशाळेचे काम जोमाने करीत असताना मणिभाईंच्या असे लक्षात आले की, देशी गायींचे जसजसे दूध वाढते तसतसे जनन-प्रमाण कमी होते या गायींत जर परदेशातील चांगल्या जातीचा संकर केला तर दूधही वाढ शकेल व जननप्रमाणही. असा विचार करून त्यांनी गीर गाय व परदेशी वळू यांचा संकर करण्याचा प्रयोग आश्रमात प्रथम केला. तो अतिशय यशस्वी ठरला. 'या प्रयोगाचा फायदा सर्व-सामान्य शेतकऱ्यालादेखील मिळाला पाहिजे' हा विचार १९६५–६६ च्या दरम्यान त्यांच्या मनात जोर धरू लागला. तसेच गांधीजींनी सुरू केलेल्या कार्यात आपलाही सहभाग असावा अशी श्री. यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक इत्यादींची बरेच दिवसापासून इच्छा होती. त्याला प्रतिसाद देऊन २४ ऑगस्ट १९६७ रोजी मणिभाईंनी भारतीय कृषि–उद्योग प्रतिष्ठानची स्थापना केली. नाईक मुख्यमंत्री व चव्हाण केंद्रीय मंत्रिमंडळात असूनही सत्तेचा कोणताही गैरवापर न करता या सार्वजनिक प्रतिष्ठानने अल्पावधीत मोठा निधी उभा केला. बघता–बघता प्रतिष्ठानचा पसारा वाढला.

१९४६ ते ६६ या वीस वर्षांच्या काळात मणिभाईंनी देशी गाई, कोरडच्या उजाड शेतजमिनी आणि वापरात नसलेले माणूसबळ याबाबतीत अनेक प्रयोग केले. यातून त्यांच्या असे लक्षात आले की; ही तोट्यात असलेली साधने आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाची जोड दिली असता किफायतशीर ठरतात. हेच प्रतिष्ठानचे मुख्य सूत्र. हजारो गरीब लोकांना स्वयंरोजगार मिळवून द्यायचा हा निर्धार !

आज भारताचे पशुधन जगात सर्वांत जास्त आहे, तर दुधाचे उत्पादन सर्वांत कमी. देशी गाय शेतकऱ्याला आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. या गाईंच्या पोटी 'सिद्ध' वळूंच्या बीजापासून नव्या संकरित कालवडी आणि वळू निर्माण करण्याचा कार्यक्रम प्रतिष्ठानने हाती घेतला आहे. यातून जन्मलेल्या गायी दर वेताला अडीच हजार लिटर दूध देतात. संकरित वळू हे देशी वळूपेक्षा जास्त कार्यक्षम असतात.

महाराष्ट्र, राजस्थान, गुजराथ व उत्तर प्रदेश ह्या प्रतिष्ठानने चालू केलेल्या सुमारे चारशे गो–पैदास केंद्रांमार्फत कुशल पशु–वैद्य सात हजार खेडयांतील गाई–गुरांची देखभाल करीत आहेत. आतापर्यंत एक लाखाहून अधिक संकरित गाई व बैल पैदा केले आहेत. सिद्ध वळूचे गोठवलेले वीज वापरून संकरित गाय–बैल पैदा करण्या साठी शेतकऱ्याला प्रतिष्ठानच्या केंद्रात जावे लागत नाही. सर्वप्रकारची सेवा ही मोफत व घरपोच पुरविली जाते.

## यशस्वी उपक्रम

गोपैदाशीच्या कार्यक्रमासाठी आवश्यक अशा सर्व साधनांची निर्मिती, संस्करण व पुरवठा करण्यासाठी उरुळीला मध्यवर्ती संशोधनशाळा आहे. सिद्ध वळूचे गोठविलेले वीर्य ठेवलेल्या पंधरा लक्ष कुप्याचा साठा येथे आहे. तसेच उच्च दर्जाच्या वळूंची पैदास करण्यासाठी विविध वयोगटांतील सहाशे गाई–बैलांची जोपासना उरुळीला केली जाते.

निकृष्ट प्रतीची जमीन व अपुरा पाणी-पुरवठा यावर चाऱ्याचे कमाल उत्पादन करू शकतील अशा वनस्पतीचे संशोधन चालू आहे शेतकऱ्याना वरदान ठरत असलेल्या सुबाभळीवर यशस्वी प्रयोग होत आहेत.

प्रतिष्ठानमार्फत किफायतशीर दूध–व्यवसायाचे शिक्षण दिले जाते. विद्यार्थी व संशोधन यांच्या उपयोगासाठी असलेल्या ग्रंथालयात चार हजार तंत्रज्ञानविषयक मासिके व पुस्तकें आहेत.

पशुसंवर्धनाचा कार्यक्रम जसजसा विस्तारित झाला, तसतशी पशुआरोग्याची व्यवस्थाही अधिक निकडीची ठरू लागली. दर्जेदार प्रतिबधक लस निर्माण करण्यासाठी वाघोली येथे (पुणे–नगर रस्ता) प्रतिष्ठानने एक सुसंपन्न प्रयोगशाळा स्थापन केली...या प्रकारची ही आशियातील सर्वांत मोठी प्रयोगशाळा ठरण्याची शक्यता आहे.

हे कार्य चालू ठेवण्यासाठी प्रतिष्ठानची गुंतवणूक सहा कोट रुपयांहून अधिक आहे. केंद्र सरकार, महाराष्ट्र, राजस्थान, कर्नाटकची राज्य सरकारे, तसेच डेन्मार्क व फ्रान्स याची सरकारे याच्याबरोबर मफतलाल, किर्लोस्कर व एशियन पेंट्स अशा उद्योगसमूहानीही प्रतिष्ठानला भरघोस साहाय्य केले आहे. मणिभाई हे महात्माजीचे शिष्य असल्यामुळे सामाजिक कार्यास धनिकांडून मदत कशी मिळवावी याचे त्याना उत्तम ज्ञान आहे. म्हणूनच मॅगसेसे पारितोषिकाच्या रकमेत (वीस हजार डॉलर्स) त्याहून अधिक रकमेची भर घालून (आपल्या एका मित्राने जमविलेले तीस हजार डॉलर्स) त्यांनी 'बाइफ इंटर नॅशनल' या नव्या संस्थेची उभारणी केली.

मणिभाईंनी प्रथम उरुळीत पाऊल टाकले, तेव्हा परिस्थिती फारच प्रतिकूल होती. दारिद्र्य, निरक्षरता, अनारोग्य व व्यसनाधीनता यांनी सारा समाज वेढलेला. गावातील भैरोबा–मारुती मंदिराच्या जीर्णोद्धाराने कामाला प्रारंभ केला. बहुउद्देशीय शाळेची स्थापना केली. सहकारी पतपेढ्या सुरू केल्या. सिडलेस द्राक्षोत्पादनाचे यशस्वी प्रयोग केले. सहकारी साखरकारखाना काढण्यात पुढाकार घेतला. नद्याचे पाणी अडवून उपसा जलसिंचन योजना अमलात आणल्या. हे सारे करताना शेतकरी हा केंद्रबिंदू मानला. तत्त्वनिष्ठ सहकारी गोळा केले. चांगल्या कार्यकर्त्यांचा संच उभा केला. इतकेच नव्हे तर देशातील उच्च गुणवत्तेचे संशोधक आपल्या प्रयोगशाळेत आणले.

स्वातंत्र्यानंतर अनेक गांधीवादी कार्यकर्त्यांनी ग्रामीण भागात रचनात्मक कार्य सुरू केले; परंतु त्यानी शेतीकडे दुर्लक्ष करून खादीग्रामोद्योगावर अवास्तव भर दिल्यामुळे त्याच्या कामाला भरीव यश मिळू शकले नाही. याउलट मणिभाई देसाई यानी खादीऐवजी कृषि–गोपालन हा मूलोद्योग मानला. आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारून आपले वेगळेपण सिद्ध केले सुरुवातीला मातृभाषा गुजराथी असल्यामुळे स्थानिक बोली मणिभाईंना समजत नव्हती; परंतु सामान्य शेतकऱ्यांच्या वेदनाचे बोल समजावून घेणे त्याना कठिण गेले नाही.

यंदाच्या 'मॅगसेसे' पारितोषिकाशिवाय मणिभाईंच्या कार्याचा गौरव राहुरी येथील कृषि–विद्यापीठाने १९७७ साली 'डॉक्टर ऑफ सायन्स' हा किताब देऊन केला, तर भारतसरकारने १९६८ साली 'पद्मश्री' बहाल करून. या गौरवांनी त्याच्यासारखा एक 'कर्मयोगी' संतुष्ट झालेला नाही. वयाच्या ६२ व्या वर्षी, दिवसातील बारा तासाहून अधिक काळ मणिभाई कार्यमग्न असतात. स्वतःच्या नावावर बँकेत एक पैसा सुद्धा नसणारा हा संन्यस्तवृत्तीचा कार्यकर्ता सतत चिंतन करीत असतो, शेतकऱ्याच्या आर्थिक प्रगतीचे ! ☐


---

## 'अस्पृश्यता' विषयावरील डायरी

'विपुल' ही प्रकाशनसंस्था एक अभिनव डायरी १९८३ या वर्षासाठी प्रसिद्ध करीत आहे. मानवी मूल्याच्या संदर्भात विचार करता अस्पृश्यता हा मानवतेवरील कलंक आहे. हा कलक धुऊन काढण्यासाठी अनेक ज्ञात व अज्ञात व्यक्ती व संघटनांनी प्रयत्न केले. या प्रयत्नाची तारीखवार नोंद या डायरीत असेल. या विषयावर ज्यांचा अभ्यास असेल त्यांनी आधुनिक काळात म्हणज इ. स. १८१८ पासून आजतागायत अस्पृश्यता घालविण्यासाठी जे प्रयत्न झाले, चळवळी झाल्या, आंदोलने झाली, त्या घटनाची तारीखवार नोंद आमच्याकडे पाठवावी, ही विनंती. माहिती १५ ऑक्टोबर १९८२ पर्यंत पाठवावी. माहिती पाठविण्याचा पत्ता :–

**श्री. अतुल कुलकर्णी**, १२१४, शिरोळे रस्ता, डे. जि. पुणे, ४११००४.





# महात्मा आणि माणूस

गांधींचा गुजरात दौरा चालू होता. कैरा आणि बारडोली जिल्ह्यातला प्रदेश त्या वेळी अगदी भारावून गेला होता. गांधी सर्वांना व्हाइसरॉयबरोबर झालेला करार समजावून सांगत आणि पूर्ण स्वराज्याचं ध्येय बोलून दाखवत. वाटाघाटीच्या मार्गानं हे ध्येय साध्य होणार नाही याची कल्पना त्यांना दिल्ली सोडतानाच आली होती. इंग्लंडच्या हुजूर पक्षानं गोलमेज परिषदेत सहभागी न होण्याचा निर्णय घेतल्यामुळं त्यांचं हे मत पक्कं झालं होतं. स्वातंत्र्यप्राप्तीच्या भरात देशांतर्गत प्रश्न गांधी विसरले नव्हते. हिंदू-मुस्लिम प्रश्नावर ते कराचीला जाण्यापूर्वी तोडगा निघेल असं त्यांना वाटत होतं. त्या दृष्टीनं त्यांचे प्रयत्न चालू असताना महमदअली जिना मात्र त्यांचे प्रयत्न उधळून लावत होते.
गांधींविषयी त्यांच्या मनात तिरस्कार निर्माण होत होता.

**' गांधी–अ मेमॉर '–विल्यम शिरर**

लिखित पुस्तकाचा परिचयात्मक
संक्षेप व स्वैर रूपांतर

**भाग सहावा । निखिल वागळे**

सत्तावीस मार्च १९३१ ला काँग्रेसचं पंचेचाळिसावं अधिवेशन कराचीत सुरू झालं. स्वतंत्र भारताची घटना आणि सरकार याविषयीची आपली मतं गांधींनी इथे स्पष्ट केली.

न भूतो न भविष्यति असा तो सोहळा. एखाद्या राजकीय पक्षाचं असं अधिवेशन मी त्याआधी पाहलं नव्हतं, त्यानंतर कधी पाहलं नाही.

सर्वत्र क्रांतीचा जयघोष निनादत होता. उन्हाळ्याचा जोर अजिबात कमी झाला नव्हता.

जवळजवळ साडेतीनशे स्त्री-पुरुष एका तंबूत गांधींच्या पायांशी अर्धवर्तुळाकार बसले होते. हातसूत कातण्यात गुंतलेले, दुसरीकडे चर्चा चालूच. लहान मुलं खेळता-खेळता बोलतात तशीच सहजता.

अधिवेशनाचं कामकाज चालवण्यासाठी सुमारे पाच हजार प्रतिनिधींनी निवडलेली ही विषयसमिती. काँग्रेसची नेतेमंडळी यात होती.

प्रत्यक्ष अधिवेशनावर मात्र गांधींचीच हुकमत चालायची. ते ठरावाचा मसुदा तयार करून अधिवेशनात मांडायचे. त्या वेळचा

त्यांचा ठामपणा आश्चर्यकारक असे. आपल्या सहजसुंदर वक्तृत्वानं ते प्रतिनिधींवर ताबा मिळवत. त्यांच्या बोलण्यात नेहमीप्रमाणे मृदुता असे; पण हळूहळू माझ्या लक्षात आलं की, वेळप्रसंगी तेही कठोर होतात. ज्यांच्याबरोबर त्यांचं जमत नसे त्यांच्याशी वागताना तर हा कठोरपणा काहीसा हुकुमशाहीकडे झुके अधिवेशनात आपल्या काही सूचनांना विरोध होतोय असं दिसलं तेव्हा त्यांनी आपला अधिकार वापरायला कमी केलं नाही. त्या वेळी त्यांच्यातल्या राजकारण्याने संतावर मात केल्याचं स्पष्ट दिसलं.

गोलमेज परिषदेत मांडायच्या मुख्य मागण्यांना पाठिंबा मिळवण्यात गांधींना फारसा त्रास झाला नाही. पूर्ण स्वराज्य, सैन्याचा ताबा, राष्ट्रीय कर्जाचा किती भार भारत उचलेल, सत्तांतराच्या काळात परराष्ट्र किंवा आर्थिक धोरण काय राहील वगैरे प्रमुख मुद्दे यात होते.

दोन मुख्य प्रश्नांबाबत मात्र प्रतिनिधींमधून विरोध झाला. गांधींनी कौशल्याने, धोरणीपणाने तो मोडून काढला. विरोधामुळे ते दबून गेले नाहीत. अधिक जोशात त्यांनी आपली भूमिका मांडली. त्या वेळी गांधींना पाहाणं अक्षरश: रोमहर्षक होत.

दिल्ली-करारावर शिक्कामोर्तब करणाऱ्या ठरावाला अनेक प्रतिनिधींनी विरोध दर्शवला. कॉंग्रेसच्या वतीनं ब्रिटिशांशी बोलणी करण्याचे पूर्ण अधिकार गांधींना देण्याबद्दलही त्यांचा आक्षेप होता. गोलमेज परिषदेत गांधी जे काही ठरवतील त्याला कॉंग्रेसनं मान्यता दिल्याशिवाय ते अंतिम मानण्यात येऊ नये अशी दुरुस्ती त्यांनी सुचवली.

आपल्या अधिकारांचा असा संकोच गांधींना मान्य झाला नाही. काहीशा तुसडेपणानेच ते म्हणाले, 'माझा सगळा अधिकार वापरून मी सुचवू इच्छितो की, ही दुरुस्ती अनावश्यक आहे. कॉंग्रेसनं असं कधी केलेलं नाही. परिषदेला जाणाऱ्या प्रतिनिधीला पूर्ण अधिकार असणं जरुरीचं आहे. 'आम्ही फक्त चर्चा करायला आलो आहोत' असं तो तिथे जाऊन म्हणू लागला तर त्याला काही अर्थ रहाणार नाही. जोपर्यंत कॉंग्रेसचे प्रतिनिधी अधिवेशनात ठरवल्यानुसार वागताहेत तोपर्यंत तुम्ही आक्षेप घेणं योग्य होणार नाही. म्हणूनच अशा तऱ्हेची दुरुस्ती मला अनावश्यक वाटते. यापुढं कसलीही चर्चा न करता ती तुम्ही मागे घ्याल अशी मी आशा करतो.'

महात्म्याचं हे क्वचितच दिसणारं रूप होतं. सगळा नम्रपणा बाजूला ठेवून गांधी सहकाऱ्यांना तंबी देत होते. आता ठरावाला विरोध करणारी मंडळी कोणता पवित्रा घेतात याचा अंदाज घेण्यासाठी मी आजूबाजूला पाहिलं. सर्वत्र शांतता पसरली होती. 'कसलीही चर्चा न करता' हे गांधींचे शब्द त्यांच्या विरोधकांनी तंतोतंत आचरणात आणल्याचं दिसत होतं. दुरुस्ती मागं घेण्यात आली. वाटाघाटी करण्याचे सर्व अधिकार गांधींना मिळाले. त्यांनी केलेला करार कॉंग्रेसला बंधनकारक राहणार होता.

प्रतिनिधींना वस्तुस्थितीची स्पष्ट जाणीव गांधींनी दिली.

'गोलमेज परिषदेतून आम्ही पूर्ण स्वराज्य घेऊनच परतू असं कुणीही मानू नये. परिषदेतून ते मिळालं नाही तर तो अपमान मानण्याचीही गरज नाही. आम्हाला काय हवंय हे ब्रिटिशांना सांगण्यासाठी आम्ही जात आहोत. रिकाम्या हातानं परतलो तरी तुम्ही आमचं स्वागतच केलं पाहीजे, शिव्याशाप देत कामा नयेत. आम्ही देशाचं हित विकणार नाही, गुलाम होऊन परतणार नाही एवढंच आश्वासन मी देऊ शकतो!' ते म्हणाले.

हळूहळू त्यांच्या आवाजातला कठोरपणा कमी झाला. हुकूमशाही वृत्ती लोप पावली. नेहमीच्याच नम्रपणे ते पुढे म्हणाले, 'माझ्याशिवाय काही होऊ शकणार नाही असं मी मानत नाही. या 'महात्म्या' शिवाय गत्यंतर नाही या भावनेतून तुम्ही करार स्वीकारू नका! 'महात्म्या'शिवाय तुम्ही स्वातंत्र्य मिळवू शकला नाही तर ते टिकवूही शकणार नाही हे लक्षात ठेवा!'

हे बोलताना प्रतिनिधींच्या मनातली भावना मात्र गांधी ओळखून होते. मोठी माणस नेहमीच आपली किंमत जाणून असतात. गांधीही याला अपवाद नव्हते. स्वातंत्र्याचा लढा आपल्याशिवाय शक्य नाही हे त्यांनी ओळखलं होतं; पण ते हुशार राजकारणीही होते. अत्यंत नम्रपणे पाठिंब्याचं आवाहन करून त्यांनी आपलं भाषण संपवलं—

'करारातली माझी भूमिका तुम्हाला पटत असेल तर तुम्ही मला खुल्या मनानं पाठिंबा दिला पाहिजे, हिचकीच करता कामा नये!'

प्रतिनिधी गांधींच्या शब्दाबाहेर नव्हते.

गांधी व्यासपीठावरून उतरले तेव्हा त्यांनी एकच जयजयकार केला. हजारो जण त्यांच्या पायांना स्पर्श करण्यासाठी चढाओढ करू लागले.

लंडनच्या परिषदेत गांधी एकटेच कॉंग्रेसचं प्रतिनिधित्व करणार होते. 'ते परिणामकारक असतं आणि खर्चही वाचतो.' गांधी नंतर मला म्हणाले. त्यांच्या शब्दात अहंकाराचा लवलेश नव्हता. असलीच तर ती नियतीची जाणीव...माझ्या मनात आलं.

अधिवेशनात काही वेळा वादावादी झाली. काही वक्ते तर आक्रस्ताळी, रटाळ भाषणं तासन्तास करत होते. कम्युनिस्ट तरुणांच्या एका गटानं थोडा हिंसेचाही प्रयत्न केला; पण गांधींची विनोदबुद्धी कायम होती. अधिवेशनाच्या कामकाजात त्यांच्या या आनंदी वृत्तीचं प्रतिबिंब पडे.

कराची स्टेशनवर उतरल्यावर मार्क्सिस्ट तरुणांच्या एका गटानं त्यांना घेरलं. त्या सर्वांनी लाल शर्ट घातले होते. गांधी ब्रिटिशांना विकले गेल्याचा आरोप त्यांनी केला. त्यांचा एकूण आवेश असा होता की, जणू काही ते गांधींना ठार मारायलाच आले होते!

'गांधी मुर्दाबाद' 'गांधी देशद्रोही आहेत!' अशा घोषणा देत. काळे झेंडे फडकावत ते तरुण गांधींच्या दिशेने धावले. एकाने तर झेंड्याचा दांडा त्यांच्या डोक्यात हाणायचा प्रयत्न केला; पण तेवढ्यात सरोजिनी नायडू पुढं आल्या आणि त्यांनी जमावाला शांत रहायला सांगितलं.

गांधी मग त्या तरुणांकडे वळले आणि हसतहसत म्हणाले, 'तुमच्या मागण्यांसाठी निदर्शनं करायचा तुम्हाला पूर्ण अधिकार आहे; पण माझं डोकं कशासाठी फोडता?'

◻

कराचीतल्या आणखी एका व्यक्तीचा उल्लेख करायला हवा. जग त्यांना ओळखत नव्हतं, पण भारतीयांच्या दृष्टीनं ती एक शक्ती होती. वल्लभभाई पटेल! अधिवेशनाची सारी सूत्रं त्यांच्याच हातात होती. राष्ट्रीय पक्ष म्हणून कॉंग्रेसची यंत्रणा उभारण्यात त्यांचा वाटा, मोठा होता.

गांधी-आयर्विन वाटाघाटीच्या सुमाराला मी त्यांना पहिल्यांदा भेटलो. कांग्रेस वर्किंग कमिटीत त्याचं चांगलंच वजन होतं. गांधी नेहरूंवर जेवढे विसंबत तेवढाच भरवसा पटेलांवर ठेवत. नेहरू आणि पटेल कांग्रेसमध्ये एकमेकांचे प्रतिस्पर्धी आहेत हेही मला तेव्हा जाणवलं. पटेलांचं व्यक्तिमत्त्व स्वतंत्र होतं. गांधी-नेहरूंसारखे ते नव्हते किंवा जिनासारखेही नव्हते. या तिघांप्रमाणे कायद्याच्या शिक्षणासाठी तेही लंडनला गेले होते; पण फार हालअपेष्टात त्यांनी शिक्षण पूर्ण केलं होतं.

गुजरातमधल्या गरीब शेतकऱ्याच्या या मुलाला तसं पाहिलं तर स्वातंत्र्यलढ्याचीच परंपरा लाभली होती. त्यांचे वडील १८५७ च्या बंडात ब्रिटिशांविरुद्ध आघाडीवर होते.

अहमदाबादमधल्या कापडगिरणीत काम करण्यासाठी वल्लभभाईंनी गाव सोडलं. दिवसा काम आणि रात्री जागून अभ्यास अशा परिस्थितीत त्यांनी आपलं शिक्षण संपवलं आणि लंडनला जाऊन वकिली सनद मिळवली. त्यांच्या अशिलात मोठमोठ्या गिरणीमालकांचा समावेश असे. त्यांचा फावला वेळही अशाच बड्या मंडळींच्या सहवासात जायचा. त्यासाठीच त्यांनी शहरातल्या प्रसिद्ध 'अहमदाबाद क्लब'मध्ये जायला सुरुवात केली होती. तिथे पत्ते खेळण्यात त्यांचा वेळ झकास जायचा. गिरणीत मजुरी करणारा मुलगा आता एक यशस्वी बॅरिस्टर झाला होता!

पण हा ऐषाराम फार काळ टिकला नाही.

१९१८ साली अहमदाबादमधल्या गिरणीकामगारांनी आपली दु:खं गांधीपुढं मांडली. गांधींनी मालकांना भेटायचा प्रयत्न केला, पण त्यांनी काहीही ऐकायचं नाकारलं. गांधींनी कामगारांना संपावर जायचं सुचवलं; त्यांनी ऐकलंही.

या संपात पटेलांनी गांधींना मदत केली. गांधींचा नि:स्वार्थीपणा, तळागाळातल्या माणसाबद्दल त्यांना असलेली आच आणि ते लोकात करत असलेली जागृती पटेलांच्या मनात ठसली. कुठे तरी त्यांच्या अंत:करणाची तार छेडली गेली. आजवर ते कोर्टात गिरणीमालकांची बाजू मांडत होते; आता त्यांनी कामगारांचं वकीलपत्र घेतलं. संपाच्या संघटनांत त्यांनी पुढाकार घेतला.

गांधींनी त्या वेळीच पटेलांचं संघटनकौशल्य हेरलं होतं; पण त्यांच्या दृष्टीनं तेवढं पुरेसं नव्हतं.

शेवटी संप फुटायची वेळ आली आणि कामगार परत जाऊ लागले, तेव्हा गांधींनी एक नवंच अस्त्र काढलं. हेच अस्त्र पुढं स्वातंत्र्याच्या लढाईत त्यांच्या कामी आलं. ते उपोषणाला बसले. परिणामाच्या भीतीनं गिरणीमालक हादरले. तीन दिवसांत संपात तडजोड झाली!

अशा तऱ्हेनं संप जिंकणं पटेलांना आवडलं नव्हतं. विसाव्या शतकातल्या कामगारतंट्यात उपोषणासारखा हिंदू रिवाज नेहमी कितपत उपयोगी पडेल याबद्दल ते साशंक होते; पण ते व्यवहारीही होते. त्या वेळी तरी उपोषणामुळंच संप मिटल्याचं त्यांनी पाहिलं होतं.

गांधींनीही संपकाळात पटेलांना जवळून पाहिलं. त्यांनी संपाला एक शिस्त लावली होती. कामगारांना आपल्या कह्यात ठेवण्याची त्यांची क्षमता गांधींना आश्चर्यकारक वाटली.

त्यांनी तावडतोब पटेलांना खेडा जिल्ह्यात बोलावलं. तिथले शेतकरी पिकाच्या अभावामुळं कर भरू शकत नव्हते. सरकारकडे त्यांनी विनवण्या केल्या; पण उपयोग झाला नाही. पटेल गावोगाव फिरले. कर भरू नका असं त्यांनी शेतकऱ्यांना सांगितलं. अखेर तडजोड झाली. श्रीमंत शेतकऱ्यांकडूनच सरकारनं कर घेतला.

गांधींनी त्यानंतर आणखी एक महत्त्वाची कामगिरी पटेलांवर सोपविली. राज्याराज्यात कांग्रेसची यंत्रणा उभी करण्याचं हे काम पटेलांनी समर्थपणे केलं. कराची अधिवेशनापर्यंत कार्यकर्त्यांचं एक जाळंच देशात उभं राहिलं होतं. सत्याग्रहाची कल्पना गांधींच्या डोक्यातून आली हे खरं; पण ती प्रत्यक्षात आणायचं काम पटेलांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांमार्फत केलं. महत्त्वाचे सगळे नेते तुरुंगात गेल्यावरही कायदेभंगाची चळवळ चालू राहिली याचं कारण ही तळापर्यंत पोचलेली यंत्रणा!

पटेलांच्या या कर्तृत्वाला त्यागाचीही जोड होती. खेडा जिल्ह्यातल्या कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी स्वत:ला झोकून दिल्यावर दिल्लीत गांधी मला म्हणाले होते, 'त्यांनी फार मोठा त्याग केला आहे. एवढ्या मोठ्या प्रॅक्टिसवर पाणी सोडणं सोपं नाही. त्यांनी आपलं आयुष्यच स्वातंत्र्यलढ्यासाठी वाहिलं आहे!'

पटेल हुशार वकील आणि त्याहीपेक्षा चलाख राजकारणी होते हे खरं; पण खेड्यातल्या किसानाशी असलेलं नातं त्यांनी कधी तोडलं नाही. त्याचा त्यांना अभिमान वाटे. कराची कांग्रेससंबंधीच्या माझ्या बातमीपत्रात मी त्यांचा उल्लेख 'लिंकनशी जवळीक साधणारं व्यक्तिमत्त्व' 'एक साधा, कणखर किसान वकील' असा केल्याचं आठवतं. सर्वसाधारण शेतकऱ्याप्रमाणे त्यांचाही बुद्धिमंतांवर विश्वास नव्हता. नेहरूंशी असलेल्या त्यांच्या मतभेदातला हा एक महत्त्वाचा मुद्दा होता. (त्यांच्यातली ही स्पर्धा कित्येकदा शत्रुत्वाच्या टोकापर्यंत जात असे)

'बुद्धिवंतांना ज्या गोष्टी आकर्षित करतात त्यात मला किंचितही रस नाही.' कराची कांग्रेसपुढं स्वागताचं भाषण करताना ते म्हणाले होते, 'या गोष्टी देशातल्या किसानाला समजत नाहीत. इथले राजे, महाराजे, जमीनदार यांच्या हक्काबद्दल मी जरूर आदर बाळगतो; पण तळागाळातल्या माणसाला मदत करण्यात, त्याची स्थिती सुधारण्यात मला अधिक रस आहे.'

नेहरूंना वाटे की, तळागाळातल्या माणसाच्या दु:खावर समाजवाद हा एकमेव उपाय आहे; पण पटेलांना हे पटत नसे. समाजवाद हा एक भ्रम आहे, ती एक रंजक कल्पना आहे, असं त्यांना वाटे. शिवाय ती एक 'परकीय' गोष्ट होती हे वेगळंच. कांग्रेसमधल्या इतर अनेक नेत्यांप्रमाणे पटेलांनाही 'परकीय' गोष्टींचं वावडं होतं. नेहरूंप्रमाणे त्यांना आंतरराष्ट्रीय घडामोडीतही रस नव्हता किंवा गांधींसारखी जगाच्या मताची ते पर्वा करत नव्हते आम्हा परदेशी पत्रकारांची गरजच काय असं त्यांचं मत होतं. मला ते खूप मदत करत; पण मी भारतात आलो याचं त्यांना आश्चर्य वाटे. 'तुम्हाला तुमच्या देशात करमत नाही का?' ते मला विचारत.

माझ्या दृष्टीनं ते एक कोडं होतं; पण त्यांचं मला कौतुकही वाटे. राष्ट्रीय चळवळीचे अनेक नेते त्या काळी अक्षरश: हवेत वावरत. गांधी-नेहरूही याला काही वेळा अपवाद नसत; पण वल्लभभाईंचे पाय नेहमी जमिनीवरच राहिले. ते व्यवहारी होते. इतरांप्रमाणे मोठमोठ्या वैचारिक गप्पा मारायला त्यांना आवडत नसे. पर्याय म्हणून

काँग्रेसकडेही सत्तेचा सांगाडा तयार पाहिजे, त्याशिवाय ब्रिटिशांना दूर करता येणार नाही, असं ते म्हणत.

वल्लभभाईंसारखा एककल्ली, कणखर संघटक स्वातंत्र्यचळवळीला लाभला हे गांधीचं आणि या देशाचं सुदैव! स्वातंत्र्य मिळवण्यासाठी गांधी–नेहरूंना हवी असलेली राजकीय यंत्रणा त्यांनी नेमकी घडवली.

¤

गांधीच्या मार्गदर्शनाखाली कराची काँग्रेसनं भारतीय हक्कांची एक सनद तयार केली. भारताच्या भावी घटनेचा हा एक भाग असल्याचं काँग्रेसनं जाहीर केलं आणि पुढं ते खरंही ठरलं.त्या निमित्तानं भारतीयांचे मूलभूत हक्क पहिल्यांदाच नमूद करण्यात आले. जगातल्या सर्वांत मोठ्या आणि आशियातल्या एकमेव लोकशाहीची ही मला नांदी वाटली.

वर्षानुवर्षे हुकूमशाही राजवट अनुभवलेल्या भारतीयांच्या दृष्टीनं हे 'मूलभूत अधिकार' म्हणजे ऐतिहासिक पाऊल असल्याचं गांधींनी आपल्या भाषणात सांगितलं. लोकशाही, नागरी हक्कांची ही दीक्षा गांधीसारख्या काही भारतीयाना ब्रिटिशानीच दिली होती आणि आता तेच हे अधिकार त्यांना नाकारत होते हे मला मजेशीर वाटलं.

महत्त्वाचे मुद्दे मी टिपून ठेवले संघटना करण्याचं स्वातंत्र्य, भाषण–लेखन स्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य वगैरे. धर्मनिरपेक्ष राज्याचीही घोषणा होती. प्रौढ मताधिकार आणि स्त्री–पुरुषाना समान अधिकार याचाही समावेश होता.

त्यातल्या दोन तरतुदी तर हिंदू जाती–व्यवस्थेच्याच विरुद्ध जाणाऱ्या होत्या. कुणालाही एखादी नोकरी, धंदा जाती, धर्म किंवा लिंगामुळं नाकारला जाणार नाही ही एक आणि सार्वजनिक रस्ते; विहिरी, शाळा सर्वांसाठी खुल्या रहातील ही दुसरी तरतूद. यामुळे भारतीय इतिहासात प्रथमच, कागदावर का होईना, पण अस्पृश्यता दूर झाली !

शिवाय मोफत प्राथमिक शिक्षण, कामाचे ठराविक तास, निवृत्तिवेतन, बेकारी याविषयीही या सनदेमध्ये तरतुदी होत्या. स्त्री–कामगारांना विशेष अधिकार देण्यात आले होते. बालकामगारांवरही बंदी घालण्यात आली होती.

शेवटी पूर्णपणे दारूबंदीचा पुरस्कार होता. अर्थात यात आश्चर्य बिलकुल नव्हतं हिंदू–मुस्लिम दोन्ही धर्मांत दारू प्यायला बंदी होती.

माझ्या मते वैयक्तिक स्वातंत्र्याबाबत ही सनद अमेरिकेच्या घटनेपेक्षाही एक पाऊल पुढे होती. सगळ्यात विशेष म्हणजे स्त्रियांना देण्यात आलेले समान अधिकार. केवळ राजकारणातच नव्हे तर सरकारी–खाजगी नोकऱ्या आणि राष्ट्राच्या समाजजीवनातही हे हक्क बजावले जातील असं गांधींनी अधिवेशनात सांगितलं. हे लक्षणीय होतं, ज्या देशातल्या हजारो बायका अजून पडद्यात होत्या किंवा फक्त चूल-मूल करत त्या देशात तर निश्चितच.

गांधी म्हणाले, 'काँग्रेसने स्त्री–पुरुष भेदभाव कधीच केला नाही. श्रीमती ॲनी बेझंट आणि सरोजिनी नायडू या दोन महिला आमच्या अध्यक्षही होत्या. म्हणूनच भविष्यकाळात देशाची राष्ट्रपतीही एक महिला होणं शक्य आहे !"

गांधीचे शब्द खरेही ठरले. परंपरेचा टेंभा मिरवणाऱ्या ब्रिटनच्या आधी भारतात एक स्त्री पंतप्रधान झाली! राष्ट्रपतीपेक्षा अधिक अधिकार तिच्या हाती होते. ब्रिटनमध्ये मात्र स्त्रीच्या हाती हे अधिकार यायला ७९ सालचा मे महिना उजाडावा लागला !

कराची अधिवेशनात माझ्यावर सर्वाधिक प्रभाव पडला, तो याच मूलभूत हक्कांच्या सनदेचा; पण कराची सोडताना ही सनद खरोखरच वास्तवात येऊ शकेल का, अशी शंका माझ्या मनात होती.

वायमारची घटना मला आठवली. तिनंही जर्मनांना असंच स्वातंत्र्य दिलं होतं; पण त्यांनी त्यावर आपल्या मूर्खपणानं पाणी फिरवलं होतं. रशियातही तोच प्रकार. घटनेनं लोकांना दिलेल्या मूलभूत अधिकारांची बूज सरकारच राखत नव्हतं !

भारतात कदाचित असं होणार नाही. स्वातंत्र्य मिळाल्यावर सरकार घटनेचा मान ठेवील. निदान गांधी–नेहरू–पटेल असेपर्यंत तरी... मला विश्वास वाटला !

¤

कराची अधिवेशनामुळं भारत आणि भारतीयांविषयीच्या माझ्या ज्ञानात भर पडली. त्यांच्या स्वातंत्र्याच्या दुर्दम्य इच्छेचा पुन्हा एकवार प्रत्यय आला. गांधीच्या बुद्धिमत्तेविषयीचा माझा अनुभवही समृद्ध झाला. अधिवेशनाचं कामकाज चालवणारा क्रांतिकारक राजकारणी म्हणून मी या महात्म्याला प्रथमच पहात होतो. नेहरूंच्या मते कराचीमध्ये मला हा राजकारणी पूर्णत्वाने दिसला.

गांधीच्या क्षमतेचा मला पुन्हा एकदा अचंबा वाटला. बारिक–सारिक गोष्टीच्या नोंदी त्यांच्या डोक्यात असत. ठरावाचा मसुदा तयार करताना आणि तो प्रतिनिधीपुढे मांडताना त्यांनी दाखवलेलं कौशल्य तर केवळ निर्विवाद ! जवळजवळ साठ हजार लोक त्यांचं भाषण ऐकायला जमत. गांधी त्यातल्या प्रत्येकाला आपल्या कह्यात ठेवत.

गांधीचं भाषण सर्वांना ऐकू जावं म्हणून पटेलांनी बारा लाउडस्पीकर्सची व्यवस्था मंडपात केली होती लाउडस्पीकरचा नेमका उपयोग मला तेव्हा पहिल्यांदा कळला ! पुढे या स्पीकर्समुळं जगभरच्या राजकीय आणि इतर सभांचं स्वरूपच बदलून गेलं. प्रचंड जमावाला वक्ता काय बोलतोय हे स्पष्टपणे कळू लागलं. गांधीच्या दृष्टीनं तर ही देवाचीच देणगी होती. मुळात त्यांचा आवाज बारीक, हळुवार. स्पीकर जणू त्यांच्यासाठीच बनवण्यात आला होता !

---

**गांधींच्या मार्गदर्शनाखाली कराची काँग्रेसनं भारतीय हक्कांची एक सनद तयार केली. माझ्या मते वैयक्तिक स्वातंत्र्याबाबत ही सनद अमेरिकेच्या घटनेपेक्षाही एक पाऊल पुढं होती. सगळ्यात विशेष म्हणजे स्त्रियांना देण्यात आलेले समान अधिकार ! हे लक्षणीय होतं.**

---

त्या काळात गांधीना चार तासांपेक्षा जास्त झोप मिळत नव्हती असं मला त्यांच्या नोकराकडूनच कळलं. अधिवेशनाच्या दिवसभरच्या कामकाजानंतर ते वर्किंग कमिटीतल्या लोकांशी आणि काही महत्त्वाच्या प्रतिनिधींशी चर्चा करत. त्याची मतं जाणून घेत प्रसंगी मतभेद मिटवायचा प्रयत्न करत. ते संपल्यावर मग दुसऱ्या दिवशीची कार्यक्रमपत्रिका आणि ठराव. अगदीच काही नाही तर आपल्या पुढल्या भाषणाबद्दल विचार. या सगळ्यातून वेळ काढून त्यांचं सूत कातणं, सकाळचं फिरणंही चालू होतं. आम्हा पत्रकारांबरोबरही ते थोडा वेळ गप्पा मारत. आपण थकलोय असं त्यांनी कधीच दाखवलं नाही. उलट ते अधिकाधिक ताजेतवाने दिसत त्यांचा आत्मविश्वास नेहमीच कायम होता. मला आठवतं, बऱ्याचदा ते हास्यविनोदही करत.

एवढा कसला आधार त्यांना लाभला होता? ... मला आश्चर्य वाटे ... असल्या संघर्षातून तावून-सुलाखून निघायचं म्हणजे प्रचंड आत्मबळच हवं.

गांधीची तत्त्वं आणि ध्येयाला छेद देणाऱ्या काही गोष्टी कराची अधिवेशनाच्या वेळी घडल्या. साऱ्याच भारतीयांना गांधींचं म्हणणं पटत होतं असं नाही, हेच यावरून स्पष्ट झालं.

आपल्या अध्यक्षीय भाषणात पटेल म्हणाले, 'अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरचा कलंक आहे. तो दूर होत नाही तोपर्यंत स्वातंत्र्याला काही अर्थ नाही!'

पटेलांचे शब्द ठाम होते; पण काहींच्या ते डोक्यावरून गेले असावेत. एक चक्रावून टाकणारं दृश्य मला त्यानंतर अचानक दिसलं, पन्नासेक अस्पृश्य बायकांना अधिवेशनाच्या मंडपातून हाकलण्यात येत होतं बायकांच्या साड्या अक्षरशः चिखलाने माखल्या होत्या. लोक त्यांच्या अंगावर खेकसत होते, जणू काही ती डुकरंच !

यापेक्षा अधिक धक्कादायक होती अधिवेशनाच्या उद्घाटनाच्या दिवशी कानपूरहून आलेली बातमी. तिथे हिंदू-मुस्लीम दंगा सुरू झाला होता. दोन्ही जमाती एकमेकांवर तुटून पडल्या होत्या. खूनबाजी, जाळपोळ, बलात्कार यांना एकच ऊत आला होता.

अधिवेशन संपल्यावर मी कानपूरला गेलो तेव्हा दंगल शमली होती. उध्वस्त मशिदी, तोडफोड झालेली देवळं आणि रस्तोरस्ती विध्वंसाच्या निशाण्या होत्या. काही ठिकाणी गटारात अजूनही प्रेतं कुजत पडली होतो. अत्याचाराच्या कहाण्या एवढ्या भयानक की, बातमीपत्रात त्या लिहिताना मला शब्दही तोकडे वाटले. शहरातल्या हॉस्पिटलात जखमींचा नुसता खच पडला होता. आकड्यांच्याच भाषेत बोलायचं तर मारल्या गेलेल्या २९५ जणांपैकी १९ मुलं, ३८ बायका आणि २३८ पुरुष होते.पैकी १५५ हिंदू आणि ११९ मुस्लिम. २१ जणांच्या धर्माचा पत्ता लावणं अधिकाऱ्यांना शक्य झालं नव्हतं. खरं तर भारतात प्रत्येकाचं शरीरच धर्माचे शिक्के वागवत असतं; पण या लोकाची शरिरं एवढी छिन्नविच्छिन्न झाली होती की, हे शिक्केही दिसत नव्हते!

कानपूरच्या या खूनबाजीची छाया अधिवेशनावर पडणं स्वाभाविक होतं. गांधींनी मृतांबद्दल शोक व्यक्त करण्यासाठी खास प्रार्थनासभा बोलावली. ते हादरले होते. रक्तपात थांबवण्यासाठी त्यांनी कांग्रेसच्या तीन-तीन हिंदू-मुस्लीम नेत्यांना कानपूरला पाठवलं; पण ते उशीरा तरी पोचले किंवा जमावाला आवरणं त्यांना शक्य झालं नाही.काही प्रतिनिधींनी दंग्याला आळा न घातल्याबद्दल ब्रिटिश अधिकाऱ्यांना दोष दिला. त्यांनीच दंग्याला चिथावणी दिल्याचा आरोपही झाला.

पण कानपूरची परिस्थिती पाहिल्यावर या आरोपाबद्दल माझ्या मनात शंका निर्माण झाली. हिंदू-मुस्लिमामधलं हे भांडण मिटवणं त्यांच्या स्वतःच्याच हातात आहे, ब्रिटिशांचं हे काम नाही असं माझं मत झालं.

गांधीनाही हे जाणवलं होतं. प्रार्थनासभेनंतर कुणी तरी त्यांना विचारलं,

'हिंदू-मुस्लिमामधल्या वाढत्या तणावाचा हा प्रश्न तुम्ही गोलमेज परिषदेत ब्रिटिशांकडे सोपवाल का?'

'नाही. नक्कीच नाही!' ते ताडकन् म्हणाले.

'आपल्या घरची भांडणं सोडवायचं काम ब्रिटिशांकडे सोपवण्याइतकं अपमानास्पद मला दुसरं काही वाटत नाही!'

¤

त्या वर्षाच्या एप्रिलमध्ये व्हाइसरॉय बदलला.

पाच वर्षांच्या धकाधकीनंतर लॉर्ड आर्यविन थकले होते. ते मायदेशी परतले. लॉर्ड विलिंग्डन त्यांच्या जागी आले. विलिंग्डन त्यापूर्वी मुंबई प्रांताचे गव्हर्नर आणि कॅनडाचे गव्हर्नर-जनरल हो ते

हा सोहळा पहाण्यासाठी मी मुंबईला परतलो. गांधीनाही मला भेटायचं होतं. लॉर्ड आर्यविननी त्यांना सदिच्छाभेटीचं आमंत्रण दिल्याचं त्यांनीच मला सांगितलं होतं. त्यांची आणि विलिंग्डनची भेटही आर्यविन घडवून आणणार होते. त्यांचा गांधीशी संवाद होऊ शकत होता आणि नव्या व्हाइसरॉयनेही तो कायम राखावा असं त्यांना वाटत होतं. गांधीचीही इच्छा वेगळी नव्हती; पण विलिंग्डन कसे वागतात यावर ते अवलंबून होतं. एकदा ते भारतात राहून गेले होते. त्या वेळी ब्रिटिशांशी एकनिष्ठ असलेल्या भारतीयांशीच गोरे अधिकारी बोलत !

सगळे सरदार-कदरदार, राजे-महाराजे, त्यांच्या राण्या, नबाब आणि प्रतिष्ठित मंडळी मुंबईत आर्यविनना निरोप द्यायला आणि नव्या व्हाइसरॉयचं स्वागत करायला जमली होती. मुंबईतल्या अलीशान घरात आणि ताजमहाल हॉटेलच्या नव्या बॉलरोममध्ये पार्ट्या झडत होत्या. उन्हाळ्याची पर्वा न करता नृत्याचे कार्यक्रम रात्रभर चालत होते हॉटेलाबाहेर म्युझियमसमोरच्या चौकातली गटारं त्या काळात अन्नपदार्थांनी भरभरून वाहत होती. रात्री तिथेच अनेक जराजर्जर माणसं गार वारा आणि डासांपासून आपला बचाव करत झोपी जात !

राज्यकर्ते आणि प्रजेतला हा परस्परविरोध भारतात सर्वत्र होता. अनेकदा या विरोधाच्या विविध छटा माझ्या लक्षात आल्या. लॉर्ड आर्यविन दिल्लीहून सोनपांढऱ्या डिलक्स गाडीने मुंबईला पोचले. तिथे ब्रिटिश सैन्याने त्यांना सलामी दिली. गांधीही त्याच वेळी मुंबईत आले; पण तिसऱ्या वर्गातून ! उपनगरातल्या एका स्टेशनवर ते उतरले आणि उन्हातून चालत आपल्या मित्राच्या घरी गेले. कोणत्याही प्रकारचा जमाव, मिरवणूक त्यांना त्या दिवशी टाळायची होती. 'व्हाइसरॉयच्या आगमनात अडथळा येईल असं काहीही घडता

कामा नये !' असं त्यानी बजावलं होतं.

त्या दिवशी संध्याकाळी मी त्यांना भेटलो तेव्हा ते उत्साहात सूत कातत होते. अतिश्रमान त्याना ताप आल्याचं मला त्यांच्या डॉक्टरनी घरात शिरता शिरता सांगितलं होतं. त्यांनी विश्रांती घ्यावी, झोपावं म्हणून डॉक्टरनी खूप प्रयत्न केले; पण व्यर्थ.

गांधीच्या चेहऱ्यावर तर तापाचं चिन्हही नव्हतं. दुपारी एक तासभर त्यांची लॉर्ड आर्यविनबरोबर बैठक झाली होती. त्यामुळं ते खुषीत दिसत होते

'आम्हा एकमेकांचं पटलं असं नाही; पण आम्ही एकमेकाला समजून घेतलं.' ते म्हणाले. त्यांच्या डोळ्यात एक चमक होती.

खरं तर त्या दिवशी दुपारीच आर्यविननी गिरणीमालकांसमोर केलेल्या भाषणात गांधी आणि कॉंग्रेसवर ते कराराचा फायदा उठवत असल्याची टीका केली होती.

'त्यांची शक्ती त्यांनी ओळखली आहे.' आर्यविननी म्हटलं होतं. 'खरं दुखणं तेच आहे. शांततेला त्यामुळंच धोका निर्माण झालाय. सरकारला कारवाई करणं म्हणूनच भाग आहे.'

मी गांधीना आर्यविनचं हे भाषण सांगितलं. त्यांना त्याची फारशी पर्वा असल्याचं दिसलं नाही.

'शक्ती ओळखली तर चुकलं कुठे?' ते म्हणाले, 'तेच तर मला अभिप्रेत आहे. यात गुपित असं काहीच नाही.'

दुपारीच ते काही कापडव्यापाऱ्यांना भेटले होते. सुमारे अडीच कोटी डॉलर्सचं परदेशी कापड परत पाठवून त्या जागी देशी कापड भरायची योजना त्यांनी त्या बैठकीत आखल्याचं मला सांगितलं. आधीच ब्रिटिश मालावरच्या बहिष्कारानं मँचेस्टरच्या गिरण्यांना फटका बसला होता, त्यात ही नवी योजना म्हणजे प्रहारच. पुन्हा एकदा गांधीच्या हुशारीनं मी चक्रावलो. एक चलाख व्यवहार ते साधत होते, त्यात देवधर्म नव्हता की प्रेम नव्हतं!

संध्याकाळभर गांधीना भेटायला लोकांची रीघ लागली होती. व्यापारी, राजकारणी, वकील, विद्यार्थी आणि इतर अनेक. गांधी प्रत्येकाचं बोलणं काळजीपूर्वक ऐकत होते आणि वाटल तर काही सूचना देत होते.

दुसऱ्या दिवशी लॉर्ड विलिंग्डनजी बोट किनाऱ्याला लागली. एकतीस तोफांची सलामी घेत गणवेशधारी व्हाइसरॉयनं ब्रिटिश सैन्याची पहाणी केली आणि सरकारी विश्रामगृहाकडे तो रवाना झाला. फारच थोडे भारतीय आपल्या नव्या राजकर्त्याचं स्वागत करण्यासाठी रस्त्यावर जमा झाले होते.

शपथविधीसमारंभाचा थाट तर याहीपेक्षा और होता. विद्यापीठ पदवीदान सभागृहात विलिंग्डननी शपथ घेतली, 'भारताचे सम्राट, किंग जॉर्ज (पाचवे) यांच्या सेवेसी...'

बाहेर शंभरेक निष्ठावान भारतीय पोलिसांच्या साखळीपलीकडे उभे राहून हा सोहळा पहात होते.

त्या दिवशीचे हिरो मात्र गांधी होते! शहरातल्या नागरी सभागृहाच्या बाहेर हजारो हिंदू-मुस्लिम गांधीचा जयघोष करत होते. आत महापालिकेच्या वतीनं गांधीना सन्मानपत्र दिलं जात होतं. मुंबईचे नगरपिते चाणाक्ष राजकारणी होते. आदल्याच दिवशी त्यांनी निवृत्त होणाऱ्या आणि नव्या व्हाइसरॉयला सन्मानपत्र दिलं होतं आणि आता गांधीची पाळी होती.

महात्म्याचे शब्द जमलेल्या लोकांपर्यंत पोचवण्यासाठी नागरी अधिकाऱ्यांनी पहिल्यांदाच लाउडस्पीकरची व्यवस्था केली होती. गांधींनी आपल्या भाषणाला गुजरातीतून सुरुवात केली, तेव्हा तर बाहेरचा गलबलाट आणखी वाढला. गुजरातीच त्या वेळच्या मुंबईत प्रचलित होती. इथल्या इंग्रजी लोकांना उपरी वाटायची. त्यांना ती समजत नसे.

'माझा सन्मान हा लक्षावधी अर्धपोटी भारतीयांचा सन्मान आहे असं मी मानतो.' गांधी नागरी अधिकाऱ्यांकडे आपला मोहरा वळवत म्हणाले. त्यापैकी अनेकजण नुकतेच व्हाइसरॉयचा शपथविधी आटपून आले होते. ब्रिटिशधर्तीची ती त्यांच्या पोशाखाची सजावट आणि पायघोळ कोट उठून दिसत होते.

नव्या व्हाइसरॉयच्या भावना लक्षात घेऊन गांधींनी आपल्या भाषणात राजकारण आणलं नाही. व्हाइसरॉय ज्याचा कधी उच्चारही करणार नाही अशा एका विषयावर ते बोलले. कष्टकऱ्याच्या कल्याणाच्या योजना, त्याचं आणि त्याच्या मुलांचं शिक्षण वगैरे प्रश्नांचा विचार करायचं आवाहन त्यांनी केलं. कष्टकरी आणि कामगार यांचं मुंबई हे माहेरघर होतं. जमावातही त्यांचीच बहुसंख्या होती. त्यांनी गांधीचा प्रत्येक शब्द उचलून धरला. तो सहजसंवाद रोमहर्षक होता. गांधीकडे मैदानी वक्तृत्व नव्हतं. आपला

---

ही पहाडी माणसं त्या महात्म्याचं स्वागत कसं करतात हे पहाण्यासाठी मी डोंगर उतरून कलका येथे गेलो.
काहीही फरक नव्हता. जयघोषही तेवढाच.
गांधीबरोबर मिस् स्लेडना पाहून काही जणांना आश्चर्य वाटल्याचं दिसलं पण त्यामुळे त्यांच्या उत्साहात फरक पडला नाही.
'बेताज बादशा की जय' —ही एकच घोषणा त्या पहाडाच्या कुशीत निनादत होती......

महात्मा आणि माणूस
भाग ७ वा
**सिमल्यात गांधी**
पुढील अंकात

---

आवाज त्यांनी कधी चढवला नाही. त्यांचे साधेसोपे शब्दच श्रोत्यांना भारून टाकत होते. अतिशय शांतपणे त्यांनी गांधींचं भाषण ऐकून घेतलं आणि भाषण संपल्याबरोबर असा काही जयघोष त्यांनी केला की, जणू साऱ्या शहरातच तो नाद घुमला !

नव्या व्हाइसरॉयनं गांधींना भेटायचं नाकारलं म्हणून गांधींचे काही सहकारी रागावले होते. गांधी त्यावाबत किती संवेदनाशील होते माहीत नाही; पण असतील तर त्यांनी तसं दाखवलं मात्र नाही. लॉर्ड आयर्विनबरोबरच्या भेटीत त्यांनी जे काही सांगितलं होतं त्यामुळंच कदाचित विलिंग्डननी हा निर्णय घेतला असावा.

नव्या घटनेचा मसुदा तयार करणाऱ्या समित्यांमध्ये वेळ घालवायची आपली इच्छा नाही, लंडनमध्ये तसं होऊ नये हे गांधींनी स्पष्ट केलं होतं.

'एक सर्वसाधारण करार सुरुवातीला व्हावा' गांधींनी आयर्विनना सांगितलं होतं, 'तपशील नंतर ठरवता येईल; पण ब्रिटिश सरकारची आम्हाला काय द्यायची तयारी आहे हे मला आधी समजलं पाहिजे. आमच्या मागणीप्रमाणे स्वातंत्र्य द्यायला तुम्ही तयार असाल तर प्रश्नच नाही. मग तपशील ठरवणं सोपं होईल; पण तशी तुमची तयारी नसेल तर उगाच उपचारात वेळ कशाला घालवायचा? घटना कशासाठी हेच जोपर्यंत तुम्हाला समजत नाही तोपर्यंत त्या घटनेचा मसुदा तयार करण्यात अर्थच काय?'

गांधींची भूमिका मला समजू शकत होती; पण नव्या व्हाइसरॉयला ती फारशी न आवडल्याचं मला सरकारी गोटातून कळलं होतं. आयर्विनही खूष होते अशातला प्रकार नाही. गांधी गोलमेज परिषदेत उगाचच मोडता घालताहेत अशी तक्रार ब्रिटिश अधिकाऱ्यांनी माझ्याजवळ केली.

त्या दिवशी संध्याकाळी लॉर्ड आणि लेडी विलिंग्डनची खास गाडी दिल्लीला जाण्यासाठी निघाली.

गांधींनीही मुंबई सोडली आणि तिसऱ्या वर्गाच्या डब्यातून अहमदाबादकडे कूच केलं.

विलिंग्डननं त्या वेळी गांधींना भेटायचं नाकारलं तरी त्यांची भेट पुढच्या महिन्याभरात सिमला येथे ठरवण्यात आली. भेटीबातच्या या हालचाली गुप्तपणे झाल्याचं मी ऐकलं.

खरं तर आयर्विनना गांधींच्या चळवळीमुळं खूपच त्रास झाला होता. त्यांच्या जागी येणाऱ्या माणसानं एवढ्या संयमपणे वागून चालणार नव्हतं; पण विलिंग्डन वसाहतवादी ब्रिटिशांच्या जुन्या परंपरेतला होता. घाई करून गांधींना भेटावं असं त्याला न वाटणं स्वाभाविकच होतं. भारतात एक क्रांती घडू पहातेय आणि काळ वेगानं पसार होतोय याची तरी त्याला जाणीव होती की नाही कोण जाणे !!

(क्रमशः)

पुस्तके

# पेशवेकालीन गुलामगिरी व अस्पृश्यता

## चिकित्सक नेमकेपणा नाही

इतिहास म्हणजे 'राजकीय कथा' किंवा 'कालचे राजकारण' हा दृष्टिकोन आता इतिहासजमा झाला आहे. मानवी जीवनाच्या विविध अंगांचा विचार इतिहास-लेखक करू लागले आहेत. विशेषतः आर्थिक आणि सामाजिक इतिहासलेखन आता वाढत्या प्रमाणात होऊ लागले आहे. डॉ. पी. ए. गवळी यांचे 'पेशवेकालीन गुलामगिरी व अस्पृश्यता' हे पुस्तक याच परंपरेतले आहे. हा सामाजिक अभ्यास डॉ. गवळी यांच्याच 'Society and Social Disabilities under the Peshwas' या प्रबंधातील 'गुलामगिरी व अस्पृश्यता' या प्रकरणावर आधारलेला आहे. त्याला डॉ. गंगाधर पानतावणे यांची चांगली प्रस्तावना लाभलेली आहे.

गुलामगिरी व अस्पृश्यता या संस्थांची भारतातील परंपरा समजावून देण्याच्या दृष्टीने 'भारतीय गुलामगिरी व अस्पृश्यतेचे स्वरूप' हे प्रकरण लेखकाने सुरुवातीला लिहिले आहे. या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर 'पेशवेकालीन गुलामगिरी' व 'पेशवेकालीन अस्पृश्यता' अशी दोन प्रकरणे आणि त्यांना जोडलेली चार परिशिष्टे, अशी पुस्तकाची रचना आहे.

"भारतीय इतिहासाच्या संदर्भात गुलामगिरी ही एक सामाजिक संस्था आहे आणि तिचे पद्धतशीर पालनपोषण प्राचीन काळापासून झालेले आपणास दिसेल." असे स्पष्ट करून (पृ. २) लेखकाने पहिल्या प्रकरणात भारतातील गुलामगिरी व अस्पृश्यतेच्या ऐतिहासिक परंपरेचा आढावा घेतला आहे. वेद, महाकाव्ये, मनुस्मृती इ. धर्मग्रंथांमधील वर्णनांचे दाखले देऊन प्राचीन काळातले व त्यानंतर मध्यभारतातले—मोगलकाळातलेसुद्धा —या संस्थांचे स्वरूप थोडक्यात विशद केले आहे. हा सगळा आढावा घेतल्यानंतर लेखक आपली खंत व्यक्त करतो— 'मनुस्मृतीने सांगितलेले कायदेकानून आजच्या परिस्थितीत जसेच्या तसे जरी समाजजीवनात दिसत नसले तरी त्या कायदेकानूंची नशा आपणाला अजूनही उतरलेली दिसत नाही. दारू तीच आहे; पण परिस्थितीने बाटली फक्त बदलली; पण अस्पृश्यतेच्या नशेवर अजून उतारा काही सापडलेला नाही,' (पृ. १५) ही खंत रास्तच आहे. 'भारतातील प्रत्येक स्पृश्य हा शरीराने नसला तरी मनाने मनुच असतो' (पृ. १३) असे टोकाचे विधान मात्र अभ्यासकाला न शोभणारे आहे.

डॉ. गवळी यांनी पुढच्या दोन प्रकरणांत पेशवाईतील गुलामगिरी व अस्पृश्यता यांची स्वरूपे कशी भिन्न होती हे स्पष्ट केले आहे. पेशवाईत शूद्र हे गुलाम होते, तर अतिशूद्र हे अस्पृश्य होते आणि अस्पृश्यांना गुलामांपेक्षाही हीन दर्जाची वागणूक मिळत असे—

हा या विवेचनाचा आशय आहे. डॉ. पानतावणे प्रस्तावनेत म्हणतात, 'पेशवाई काहींना प्राण होती, पण काहींना मृत्यू होता. अशा मृत्युकाळाचे कोरीव शिलालेख पेशवाईच्या रूपाने कसे खोदले गेले होते, याचे साधार विवेचन डॉ. गवळी यांनी प्रस्तुत ग्रंथात केले आहे.' (प्रस्ता. पृ. १२)

दुसऱ्या प्रकरणात पेशवेकाळातील गुलामगिरीचे स्वरूप स्पष्ट केल्यावर लेखक म्हणतो, 'एकंदरीत पाहता पेशवेकाळात गुलामाना मिळणारी वागणूक चांगली होती. सणासुदीला गोडधोड खाण्यास मिळत असे, कपडालत्ता मिळत असे. त्यांना संपत्ती धारण करण्याचा अधिकार होता. त्यांना जमीन कसणे व सैन्यात सैनिक म्हणून वावर करता येत असे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे त्यांना गुलामगिरीतून स्वतःची मुक्तता करून घेण्याचा अधिकार होता. हे सर्व हक्क आणि सुखसोयी पाहिल्यानंतर असे वाटते की, पेशवेकाळात अतिशूद्राना गुलाम जरी केले असते तरी त्यांच्या सामाजिक आणि भौतिक परिस्थितीत निश्चितच उत्क्रांती झाली असती; पण धर्मशास्त्राचे आणि ब्राह्मणी धर्माचे रक्षण करणाऱ्या पेशव्यांनी त्या गुलामीचासुद्धा अधिकार दिला नाही ही त्यांच्या सामाजिक दुःखाची केवढी मोठी शोकांतिका !' (पृ. ४०–४१).

—ही *'शोकांतिका'* शेवटच्या प्रकरणात सविस्तर मांडलेली आहे. अस्पृश्यांच्या पेशवेकालीन स्थितीचे वर्णन करून लेखक शेवटी निष्कर्ष मांडतो— 'एकंदरीत पेशवेकाळात अस्पृश्याचे जीवन सामाजिक, धार्मिक आणि राजकीय बाबतीत निकृष्ट होते. सामाजिक तिरस्काराचे दुःख अस्पृश्यांना अनिवार दिले जात होते. त्यांची जीवनाच्या सर्व क्षेत्रात नाकेबंदी होईल अशी खबरदारी घेतली जात असे. त्यांचे एकंदरीत जीवनच कस्पटासमान लेखले जात असे व या सर्व अवनतीमध्ये तत्कालीन समाज व राज्यकर्ते याची भूमिका त्यांचे जीवन अत्यंत हीन बनविण्यास पूरकच होती हेच आपल्या लक्षात येईल.' (पृ. ८०)

डॉ. गवळी यांनी हा सामाजिक अभ्यास अत्यंत कष्टपूर्वक केला आहे, हे जागोजागच्या संदर्भांवरून जाणवते. या अभ्यासूवृत्तीबद्दल लेखकाचे अभिनंदन करायला पाहिजे. माहितीच्या बाबतीत लेखक 'चांगला संग्राहक' आहे, असे म्हणायला हरकत नाही; पण त्याला 'चांगला चिकित्सक' म्हणणे मात्र कठीण आहे. लेखकाचे यश आणि अपयश या दोहोंची कल्पना यावरून येऊ शकेल !

लेखकाने पेशवाईचा कालखंड का निवडला ? — असा प्रश्न विचारणे योग्य होणार नाही. कारण अभ्यासक्षेत्र निवडण्याचे त्याचे स्वातंत्र्य मान्य करायला हवे; पण हा कालखंड निवडल्यावर लेखकावर काही जबाबदारी येऊन पडते. भारतात जर प्राचीन काळापासून आजतागायत गुलामगिरी व अस्पृश्यता आहे, तर पेशवाईच्या संदर्भात त्यांचे वर्णन करताना पेशवाईत या संस्थांमध्ये काही वैशिष्टयपूर्ण व रचनात्मक (Structural) बदल झाले का हे नेमकेपणाने सांगायला हवे. लेखक एकीकडे भारतातली या संस्थांची ऐतिहासिक पार्श्वभूमी मांडतो व दुसरीकडे आजही अस्पृश्यांचा कसा छळ चालला आहे हे स्पष्ट करण्यासाठी पुस्तकाला एक परिशिष्ट जोडतो. (पृ ९४–९५), याचा अर्थ, पेशवाईच्या आधीचा व नंतरचा काळ लेखकाने लक्षात घेतलेला आहे. त्यामुळेच काळाच्या संदर्भात तौलनिक विचार लेखकाने मांडणे आवश्यक होते, असे म्हटले तर ते गैर ठरू नये; पण या बाबतीत तो अयशस्वी ठरला आहे. पेशवाईपूर्व काळातल्या या दोन संस्था पेशवाईत बदलल्या का ? त्यांच्यात सुधारणा किंवा अधोगती झाली का ? की मूळ चौकटीतच राहून काही चालीरीती बदलल्या ? पेशव्यांच्या 'ब्राह्मण' असण्यामुळे या संस्थांवर खरोखरच काही मूलगामी परिणाम झाला का ? पेशव्यांच्या काळात भारतात इतरत्र या संस्थांचे स्वरूप वेगळे होते का ? — अशा प्रश्नांची रोखठोक चिकित्सा लेखकाने केलेली नाही. प्रस्तावनाकाराला मात्र या प्रश्नांचे काहीएक भान आहे, असे दिसते. डॉ. पानतावणे आपल्या प्रस्तावनेत म्हणतात — 'या ग्रंथात पेशवाईतील अस्पृश्यता व गुलामगिरीचे विवेचन आहे, याचा अर्थ हा नव्हे की, पेशवाईव्यतिरिक्तच्या भारतात सर्वत्र समता नांदत होती, सर्व माणसे एकात्मभावनेने जगत होती. भारताच्या सर्व भागात पेशवाईइतकीच पेशवाईच्या काळात समान स्थिती होती ... भारताच्या विविध प्रदेशांत या ना त्या प्रकारे गुलामगिरी अस्तित्वात होती. भारतातील गुलामगिरीच्या संदर्भात हाही विचार महत्त्वाचा आहे.' (प्रस्ता. पृ. १२)

## वैचारिक विसंगती

'पेशवाईच्या काळात अनेक प्राचीन संस्थांचे पुनरुज्जीवन करण्यात आले आणि गुलामगिरीची निर्मिती ही त्यापैकी एक होय, ' असे एक भडक विधान लेखक करतो (पृ. १९). असे विधान केल्यावर 'प्रबंध-लेखका'ने ते साधार व तर्कशुद्ध रीतीने स्पष्ट करायला हवे. राजकारण्यांसारखी हवेतली विधाने अभ्यासकांनी करणे योग्य नव्हे. डॉ. गवळी यांच्या पुस्तकात, कोणत्या अनेक संस्थांचे पुनरुज्जीवन झाले याचा पत्ता लागत नाही ! गुलामगिरी व अस्पृश्यता या त्या संस्था म्हणाव्यात, तर त्या मृत कधी झाल्या होत्या म्हणून त्यांचे पुनरुज्जीवन व्हावे ? डॉ. गवळी मात्र या संदर्भात 'गुलामगिरीची निर्मिती' असा स्पष्ट उल्लेख करतात. हा उल्लेख मोठा अजब म्हटला पाहिजे ! कारण त्यावरून असा आभास निर्माण होतो की, पेशव्यांपूर्वीच्या काळात गुलामगिरी कुठे तरी खंडित झाली होती आणि पेशव्यांनी ती पुन्हा 'निर्माण' केली. ही जर खरोखरच वस्तुस्थिती असेल, तर पेशव्यांना द्यावेत तेवढे दोष थोडेच आहेत; पण मग डॉ गवळी पेशवेकाळाला पुढील प्रशस्तिपत्रक का देतात हे कळायला मार्ग नाही !' ... वरील चर्चेवरून पेशवेकालात गुलामगिरीचे स्वरूप प्राचीन काळाइतके तीव्र नसले तरी गुलामगिरी ही एक सामाजिक जीवनाचे अविभाज्य अंग होते. ... एकंदरीत पाहता पेशवेकाळात गुलामांना मिळणारी वागणूक चांगली होती.' (पृ. ४०) पेशव्यांना जर गुलामगिरीचे जाणूनबुजून पुनरुज्जीवन करायचे होते, तर गुलामगिरीचे सौम्य स्वरूप स्वीकारले गेले असते का आणि गुलामांना चागली वागणूक तरी मिळाली असती का ? लेखकाच्या विचारातली ही विसंगती खटकल्यावाचून राहत नाही. (वास्तविक पेशव्यानी गुलामगिरी मोठ्या जाणीवपूर्वक निर्माणही केली नाही आणि गुलामांना चागली वागणूकही जाणीवपूर्वक दिली नाही! पेशव्यांनी, त्यांच्या राजांनी आणि प्रजेने

गुलामगिरी स्वीकारली व जोपासली ती पूर्वपरंपरेचा भाग म्हणून. अर्थात् परंपराप्रियता हा त्या सर्वांचाच दोष होता हे निर्विवाद.)

'पेशवाईच्या काळात अतिशुद्रांना देवालयात येण्यास प्रवेशबंदी होती' किंवा पेशवाईच्या काळात अतिशूद्रावर अनेक बंधने लादली होती. या चालीरीतीच्या विरुद्ध जर अतिशूद्रांनी बंड केले तर त्याला यश येत नसेच, पण त्यांची अधिक मुस्कटदाबी मात्र जोरात सुरू होत असे यासारखी विधाने (पृ. ७७) वाचताना ही पेशवेकाळाचीच वैशिष्टये आहेत, का त्यापूर्वीही या गोष्टी अस्तित्वात होत्या याचा उलगडा होत नाही.

'पेशवे स्वत: कोकणस्थ ब्राह्मण होते. त्यामुळे तत्कालीन समाजात कर्मठपणाचे स्तोम वाढत गेले. (पृ. ४६) पेशवेकाळात या शिवाशिवीला बहर आला होता (पृ.५९) पेशवाईत ब्राह्मणजातीची सर्वच क्षेत्रात विशेष काळजी घेतली जात असे. (पृ ७३), पेशवेकाळात महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात ब्राह्मणी धर्माने व कर्मकांडाने कळस गाठला होता. (पृ.८७) यासारखी जी विधाने लेखक करतो त्यात काहीएक तथ्य असेलही; पण त्यामुळे गुलामगिरी व अस्पृश्यता या प्राचीन संस्थामध्ये काही मूलगामी बदल घडले, असे लेखकाने रंगवलेले चित्र पाहता वाटत नाही. गुलाम स्त्रिया पदरी बाळगणारा नागपूरचा रघुजी भोसले (पृ.२९) गुलामगिरी पोसणारा, किंबहुना विरूबाई या आपल्या गुलाम स्त्रीचे खाजगी व दरबारी जीवनात विशिष्ट स्थान निर्माण होऊ देणारा छत्रपती शाहू (पृ. २९-३०) तसेच बटकी बाळगणारे इंग्रज, फ्रेंच वगैरे युरोपियन लोक (पृ २९), गुलामाच्या व्यापारात गुतलेले चारण व मुस्लीम व्यापारी (पृ. ३२), पासष्टाव्या वर्षी बारा वर्षांच्या मुलीशी विवाह करणारा महादजी शिंदे (पृ. ८७), मानापमान, हक्क आणि इतर कारणामुळे अतिशूद्र जातीमध्ये व पोटजातीमध्ये होणारे झगडे (पृ. ७९)—अशा सर्व (लेखकानेच उल्लेखिलेल्या) उदाहरणांचा तर पेशव्यांच्या ब्राह्मणत्वाशी काही संबंध नाही ना ? मग असे का घडले ? केवळ राज्यकर्ते ब्राह्मण होते म्हणून की भारतीय समाजजीवनाच्या मूळच्या परिदृढ चौकटीमुळे ? याचा सुस्पष्ट विचार लेखकाने केलेला नाही पेशव्याच्या कर्मठपणाबद्दल त्यांना जरूर दोष दिला पाहिजे. शेजवलकरांसारख्यांनी हे काम उत्तम रीतीने केले आहे पेशव्यांच्या कर्तृत्वाची, दोषांची, घोडचुकांची कठोर चिकित्सा जरूर करावी; पण गुलामगिरी व अस्पृश्यता यांचा विचार करताना हे मान्य करायला हरकत नाही की, पेशव्याचे ब्राह्मणत्व काही चालीरीतीची तीव्रता वाढवण्यास कारणीभूत ठरले असेल; पण तो या संस्थांवर मूलगामी रचनात्मक परिणाम घडवणारा घटक नव्हता. तसा तो असता तर दुसऱ्या जातीचे राज्यकर्ते सत्तेवर आणणे एवढा साधा उपाय गुलामगिरी व अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी पुरला असता ! पण हे इतके सोपे गणित नव्हे !

जाता जाता एक तांत्रिक बाबीचा उल्लेख करायला हवा. प्रस्तुत पुस्तकात ठायीठायी कमालीचे मुद्रणदोष आढळतात. ज्याने प्रबंधलेखन केले आहे, त्याने या गोष्टीकडे थोडे तरी लक्ष देणे जरूर आहे. कहर म्हणजे खुद्द शुद्धिपत्रकातसुद्धा तीन चुका झालेल्या आहेत! पण मुद्राराक्षसाने एवढे ग्रासूनही लेखक प्रास्ताविकात ' उत्कृष्ट' या शब्दात मुद्रणाचे कौतुक करतो !

शेवटी, डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या प्रस्तावनेतील दोन महत्त्वाच्या मुद्द्यांची अवश्य दखल घ्यायला हवी गुलामगिरीच्या स्वरूपाविषयी ते म्हणतात,माणसाचे स्वातंत्र्य हिरावून घेणे म्हणजे त्याच्या मानवी हक्कांना एक प्रकारे नकारच असतो. म्हणून गुलामगिरी ही जितकी सामाजिक व धार्मिक तितकीच ती मानसिकही असते. (प्रस्ता. पृ. ८) निग्रोंची गुलामगिरी व भारतातील अस्पृश्यता यांच्यातील फरक स्पष्ट करताना ते म्हणतात, अमेरिकेतील निग्रोंचा शारीरिक छळ झाला. तो त्यांनी साहिला. भारतातील अस्पृश्यांचाही शारीरिक व मानसिक छळ झाला. तो त्यांनी साहिला. किंबहुना भारतीय अस्पृश्यांचा मानसिक छळ निग्रोंपेक्षाही तीव्र स्वरूपाचा आहे. कारण निग्रोंच्या छळाला धार्मिक आधार नाही; तो अस्पृश्याच्या छळाला आहे. (प्रस्ता. पृ. ११)

—राजा दीक्षित

पेशवेकालीन गुलामगिरी व अस्पृश्यता
ले. डॉ. पी. ए. गवळी
प्रचार प्रकाशन, कोल्हापूर
पृष्ठे १६+९८
मूल्य : ३५ रु.

# प्रतिमा

## असाध्य ते साध्य....

प्रा. रा. ग. जाधव हे नाव आता मराठी समीक्षेला नवीन किंवा अपरिचित नाही. विशेषत: दलित – चळवळ आणि साहित्य या क्षेत्रात नव्या सुजाण जाणिवेने चिंतन करणारे लेखक म्हणून रा. ग. जाधव यांचे विशेषत्व जाणवते. नव्याची नव्या प्रेरणेने स्वीकृती करताना ते दिसतात. ' प्रतिमा ' हे त्यांचे अगदी नव्याने प्रसिद्ध झालेले समीक्षणात्मक लेखाचे संकलन असणारे पुस्तक आहे. या पुस्तकात ज्ञानेश्वरांपासून ते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी याच्यापर्यंत विविध व्यक्तिमत्त्वांचा शोध घेतलेला आहे , आणि हा शोध संदर्भासह आहे. किंबहुना असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही की, ह्या व्यक्तीकडे बघायचा एक नवा दृष्टिकोन हे पुस्तक देते. उदाहरणच द्यायचे झाले तर बाबुराव अर्नाळकरासारख्या रहस्यमय (किंवा डिटेक्टिव्हही म्हणता येईल) साहित्य लिहिणाऱ्या लेखकाकडे वेगळ्या भूमिकेतून रा. ग. जाधव बघताना दिसतात. वास्तविक अशी विपुल लेखन करणारी मंडळी मराठी समीक्षेत एका वाक्यातून बाजूला सारली जातात.

जेव्हा प्रमिमा हा उब्द उच्चारला जातो तेव्हा त्या वस्तूची–घटनेची–आकृती किंवा चित्र आपल्या डोळयापुढे उभे राहते. या पुस्तकात संत, साहित्यिक, विद्वान आणि विचारवंत याची चित्रे रेखाटलेली दिसतात. समाजातील काही व्यक्ती अशा असतात ज्या संपूर्ण समाजाच्या प्रतिबिंबित आकृती असतात. हे कोणत्या अर्थाने ? तर या ना त्या प्रकारे अशा व्यक्तींच्या विचारातून, लेखनातून समाजाची सृजनशक्ती, संस्कृती प्रकट होत असते. ह्या व्यक्ती जुन्या होत नाहीत. त्याचे सामर्थ्य असे असते की, ज्यामुळे त्यांच्याकडे नव्या संदर्भातून पाहिले जाते. या ग्रंथविवेचनातून सांस्कृतिक अर्थपूर्णतेचे असे भान जाणून घेण्याचा व व्यक्त करण्याचा प्रयत्न केलेला आहे. अनेक संदर्भसूचकता,

अनेक अर्थप्रतीती हे प्रतिमेचे वैशिष्ट्य असते. ह्या पुस्तकात ज्या व्यक्तींच्या प्रतिमा रेखाटल्या गेल्या आहेत त्यातून ही प्रतिमा-वैशिष्ट्ये व्यक्त होतात.

ज्ञानेश्वराचे शब्दचित्र काढताना त्यांच्यातील लौकिक जाणून घेण्याचा प्रयत्न 'लौकिक सूराच्या शोधात' आहे. ज्ञानेश्वरांचे रूप कसे होते ? हे निश्चित माहीत नाही. अशा तेजस्वी रूपसौंदर्याला आपण कायमचे मुकलो, ही तळमळ ह्या शोधापाठीमागे आहे. ही तळमळ विशेष लक्षात घेण्यासारखी आहे. अलौकिकाच्या मागे लागून लौकिकाकडे दुर्लक्ष झाले. मानवी शरीर चित्राकृतीत असते. ज्ञानेश्वरांसारख्या एका तत्त्वचिंतक कवीचा ज्ञानेश्वर या केवळ माणूस म्हणून जगणाऱ्या व्यक्तीशी संबंध होता की नाही ? सर्वसामान्य माणूस म्हणून ज्ञानेश्वरांची प्रतिमा कशी असेल ? जीवनातील घटना आणि साहित्यातील परिपक्वता यांचा मेळ कसा घालता येईल ? एक महत्त्वाची गोष्ट ग्रंथकार इथे सांगून जातो, ती म्हणजे व्यक्तिगत जीवनातील पराभव आणि नंतर गीताभाष्याकडे त्यांनी वळणे ह्यात कुठे तरी हाडामाणसाचे ज्ञानेश्वर वावरताना दिसतात. व्यक्तिगत जीवनाला घाट देताना काव्यविषयक जाणिवांना घाट देणे यात धागा आहे तो आत्मन्यायाचा ! जाधवांनी लक्षात घेतली आहे ती प्रामुख्याने तत्कालीन समाजाची जडण-घडण आणि 'ज्ञानेश्वरी'ची निर्मिती.

दुसऱ्या निबंधात प्रा. जाधव रामदासांची प्रतिमा एका वेगळ्या रूपात उभी करतात. रामदासांची जीवनशैली-घाट हा प्राचीन काव्यातील व्यास-वसिष्ठादींशी जुळणारा होता. ब्रह्मचर्याची नवी जोड जीवनशैलीशी जुळणारी होती. कर्ता-कर्तृत्ववान कर्मयोगी म्हणून रामदासाची प्रतिमा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाच्या पार्श्वभूमीवर उभी करतात. रामदासांचा विचार व्यापक परिघात करून आजच्या काळातील मराठी संस्कृतीची पार्श्वभूमी रामदासांच्या काळाशी निगडित होती काय ? असा प्रश्न उपस्थित करतात. तुकारामांचा विचार करताना संत आणि कवी या वैशिष्ट्यांचा एकाच व्यक्तीत झालेला मिलाफ जाधवांनी लक्षात घेतला आहे. संतत्वाचा आणि कवित्वाचा मागोवा घेण्याचा त्यांचा उद्देश आहे. पहिला विचार म्हणजे तुकोबाचे संतत्व आणि कवित्व हे स्वप्नजात आहे हा होय. आता स्वप्नामागे असणारा सामाजिक संदर्भही ते लक्षात घेतात. बाबाजी चैतन्यांनी उपदेश करणे आणि नामदेवांनी काव्यविषयक उपदेश करणे ही गोष्ट महत्त्वाची आहे. संत आणि कवी या दोन भूमिकांतून जाताना सामाजिक निषेधाचा त्यांच्यावर झालेला आघात याचा सखोल विचार इथे झाला आहे. तुकारामांच्या साहित्याचा संबंध तत्कालीन सामाजिकतेशी आहे. प्रत्यक्ष देवळाचा आधार ज्या संतांना घेता आला नाही त्यांना आपण देवळाचा कळस झाल्याचे म्हणतो; पण प्रत्यक्षात समाजात आपले स्थान निश्चित करताना काही किंमत त्यांना मोजावी लागली. प्रा. जाधव ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सामाजिक, सांस्कृतिक संदर्भातून विचार करतात. ह्या पार्श्वभूमीवर साहित्यिक म्हणून असणाऱ्या प्रतिमेचा विचार करतात.

तुकारामांनंतर मध्ये फार मोठा कालखंड सोडून एकदम ते खांडेकरांकडे वळतात. पन्नास वर्षे सतत लेखन करणाऱ्या साहित्य-साधनेमागे असणाऱ्या प्रेरणेचा शोध ते घेतात. सर्वसामान्य माणूस म्हणून जगणारे आत्मसंपन्न खांडेकर आणि साहित्यव्रत अखंड चालवणारे खांडेकर, लौकिक जीवनातले खांडेकर आणि लेखक खांडेकर, आपल्या ध्येयवादी शिक्षकावर नितांत प्रेम करणारे खांडेकर याचा शोध घेण्यात जाधवांच्या दृष्टीतला द्रष्टेपणा दिसून येतो. जे साहित्यमय जीवन खांडेकर जगले, भारतीय संस्कृतीचा स्रोत ज्यांच्या जीवन. साहित्यात होता अशा साहित्यसाधना म्हणजेच जीवनसाधना असे मानणाऱ्या खांडेकरांची प्रतिमा प्रा. जाधवांनी रेखाटली आहे. खांडेकरांच्या ध्येयवादाला खोटा-स्वप्नरंजनी ध्येयवाद असे अनेकांनी म्हटले. रा. ग. जाधवांना असे वाटते की, खांडेकरांनी ध्येयवादी पण रुक्ष शिक्षकी मूल्याला भावनात्मक आदर्शाची नवी जोड दिली. ज्या शिक्षकी मूल्यचौकटीत खांडेकर जगले त्याचा सूक्ष्म विचार प्रा. जाधव करताना दिसतात. याच धाग्यातून खांडेकरांच्या व्यक्तिमत्त्वातील मूळ सूत्र ते उलगडून दाखवतात-ते म्हणजे-शिक्षकी जीवनमूल्य आणि मध्यमवर्गीय माणसाचा आंतरिक पण सापेक्ष शोध ही खांडेकरांच्या जीवनवादातील जीवनसत्ये आहेत.

पु. भा. भाव्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेताना प्रामुख्याने कथासाहित्य प्रा. जाधवांनी मध्यवर्ती मानले आहे. कथासाहित्याचा आशयरूप आढावा घेऊन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार केला आहे. त्यांच्या ठिकाणी असणारी प्रखर हिंदुत्वनिष्ठा यातून सृजनशील झालेले त्याचे मन, त्यातून आकार घेणाऱ्या कथा यांचा एकसंध धागा प्रा. जाधवांनी उलगडलेला आहे. या निष्ठेस पडलेल्या मर्यादा, साचेबंदपणाही ते लक्षात घेतात.

डॉ. वानखेडे यांच्यावरील 'निळी जखम' हा वैशिष्ट्यपूर्ण लेख आहे. एक विचारवंत म्हणून डॉ. वानखेडे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेताना त्यांना वाटते, वानखेडे यांच्या मृत्यूने सामाजिक हानी झालेली आहे; दलित-समाज-चळवळ, दलितसाहित्य यांच्या दृष्टीने डॉ. वानखेडे मरण पावणे म्हणजे निळी जखम आहे. दलित आणि दलितेतर अशा दोन्ही समाजांत त्यांचे महत्त्व होते. डॉ. आंबेडकरांनी एक विशिष्ट सामाजिक संवेदना रुजविली. दलित प्रज्ञाप्रतिभेतून एक जी सांस्कृतिक प्रगती त्यांना अपेक्षित होती, एक जाग आणायची होती, त्या सर्व प्रक्रियेत डॉ. वानखेडे यांना महत्त्वपूर्ण स्थान आहे. मध्यमवर्गीय वळणाचे व्यक्तिमत्त्व घडतानाही नंतर वेगळा आकार मिळाला. इंग्रजीचे अध्ययन करताना दलितांना मराठी साहित्यात प्रवेश नाही, आपले वाटावे असे त्यात फार कमी आहे. त्यामुळे नकळत दलित साहित्यप्रेम इंग्रजीकडे वळले आणि वानखेडे या वस्तुस्थितीचे प्रतिनिधी होते हा मूलगामी विचार प्रा. जाधव मांडतात. दलित तरुण पिढीला मिळालेले नेतृत्व म्हणून वानखेडे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार इथे होतो. दलितांची अस्मिता या अकोमजलेल्या माणसाने केली; पण प्रत्यक्षात एकाकीपणाचे जीवन ते जगले.

'सावळ्या गुन्हेगारीचे जग' ह्या लेखाच्या रूपाने दुर्लक्षित केलेल्या लेखकाकडेही एका वेगळ्या भूमिकेतून पहाता येते हे सिद्ध केले आहे. रहस्यमय लेखन करणाऱ्या लेखकाचे व्यक्तिमत्त्व कसे आहे ? प्रत्यक्ष जीवन हेही रहस्यमय असते का? मानवी जीवनात तिशी ओलांडल्यानंतर जीवनातील रहस्यांची चाहूल लागते का ? ह्या प्रश्नांचा विचार प्रा. जाधव करताना दिसतात. अर्नाळकरांनी रहस्यकथेला

तिष्ठाप्र मिळवून दिली. रहस्यकथाविषयांचा शोध, कथानक घडविताना प्रत्यक्षत: पोलीस खाते, गुन्हेगार लोकांशी त्यांनी संबंध वाढविले. संपूर्ण विपुल लेखनसाहित्यात त्यांनी राखलेला मराठी संयम हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वाचा भाग आहे. मराठी मन—संस्कृती—प्रकृतीचे अधिष्ठान या लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाच्या तळाशी आहे. अर्नाळकरांचा वेगळेपणाही प्रा. जाधवांनी दाखवून दिला आहे. तो म्हणजे भडक शृंगार अश्लीलता यातून त्यांचे साहित्य बाहेर पडले.

या पुस्तकातील शेवटचा लेख महत्त्वाचा वाटतो. विद्वान–विचारवंत याची व्याख्या नव्याने करावी अशा तर्कतीर्थांची प्रतिमा 'कर्मयोगी विचारवत' या लेखातून व्यक्त होते. तर्कतीर्थांची भूमिका ही ज्ञानसंचिताचे संरक्षक आणि समीक्षक म्हणून आहे. ह्यातून जे लेखन झाले ते लेखन विविध निमित्ताने झाले. संपूर्ण विचारसरणीस एक वैज्ञानिक स्पर्श आहे. मानवेंद्र रॉय यांनी म्हटल्याप्रमाणे The best product of the Indian Renasances आहेत. तर्कतीर्थ ही परंपरा आहे. तर्कतीर्थांच्या व्यक्तिमत्त्वाचा अतिशय जवळून घेतलेला हा शोध आहे. त्यांच्या लेखनातील विचारसौंदर्य जाधवांनी लक्षात घेतले आहे. नव्या ध्येयवादाने सतत बदलणे हे या प्रवाही विचारवंताचे वैशिष्ट्य आहे. योग्यायोग्यतेचा साक्षेपी विचार करणारे हे व्यक्तिमत्त्व आहे. तर्कतीर्थांच्या व्यक्तिमत्त्वातील अर्थपूर्ण गोष्टी या लेखात प्रा. जाधवांनी मांडल्या आहेत. नवी पश्चिमी तत्त्वज्ञाने पचवून भारतीय परंपरेची आध्यात्मिकता जोपासण्याचा त्यांनी प्रयत्न केला. एका विशिष्ट मानवतावादाचा सतत ध्यास घेतला. सामाजिक जाणिवांनी प्रवृत्त असणारे, कालचा वारसा जोपासणारे, आजच्या समस्या आणि उद्याचे स्वप्न यांचा मेळ घालणारे हे व्यक्तिमत्त्व आहे.

प्रा. रा. ग. जाधव याचे 'प्रतिमा' हे पुस्तक विविध व्यक्तिमत्त्वांबद्दल नवीन सूत्र मांडणारे, विचारप्रवण आणि वाचकास अंतर्मुख करणारे आहे. एक विशिष्ट विचारसरणी या पाठीमागे आहे. व्यक्ती काय आहे हे समजणे, त्या व्यक्तिमत्त्वातल्या विविध भूमिका लक्षात घेणे, त्या उलगडून मांडून दाखवणे ही अत्यंत अवघड गोष्ट साध्य करण्यात प्रा. जाधव यशस्वी झाले आहेत. ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम आणि आजच्या काळात तर्कतीर्थ ह्या गहनगूढ व्यक्तीची प्रतिमा रेखाटायला अधिकच कठीण; पण रा. ग. जाधव अशा विलक्षण अवघड व्यक्तीच्या अंतर्मनाचा शोध घेण्यात यशस्वी झाले आहेत.

—प्रतिमा केसकर

प्रतिमा
रा ग. जाधव
परिमल प्रकाशन
मूल्य : २० रु.

## 'गझल' लेख
# पाडगावकरांची प्रतिक्रिया

प्रिय डॉ. श्रीरंग संगोराम यांस
सप्रेम नमस्कार

आपले पत्र मिळाले आणि आपण अगत्यपूर्वक पाठविलेला 'माणस'चा ७ ऑगस्टचा अंकही मिळाला. या अकातील "निगाह रक्खो, मराठी गझलयुग येत आहे" हा आपला लेख मी वाचला. या संदर्भात माझ्या प्रतिक्रिया मी व्यक्त कराव्या असे आपण आपल्या पत्रात लिहिले आहे.

आपल्या लेखातून व्यक्त होणारा 'इषारा' महत्त्वाचा वाटतो. पुष्कळ वेळा 'गझल' या काव्यप्रकाराविषयी होणारे लेखन किंवा बोलणे (सार्वजनिक आणि खाजगी गप्पातून होणारे) कवितेचे स्वरूप समजून घेण्याच्या आस्थेतून निर्माण झाले आहे असे वाटत नाही. प्रचाराच्या पातळीवर उतरणारे, कुणाची तरी तळी उचलून धरणारे, अमके लिहितात तेच गझल आणि तमके लिहितात ते गझल नव्हेतच अशी पोरकट उत्साहाची शेरेबाजी करणारे असे हे लेखन–भाषण होते. आपल्या लेखात ही झेंडेबाजी कुठेच आढळली नाही. उर्दू गझलांची, शायरीची सर्व परंपरा आपल्या खिशात आहे आणि आता मराठी कवीना गझल कशाशी खातात हे आपणच सांगू शकतो असा गझलसम्राटी आवही आपल्या लेखात कुठेच दिसला नाही. कवितेचे स्वरूप समजून घेण्याची नम्र आस्था मला आपल्या लेखात जाणवली आणि म्हणूनच माझी प्रतिक्रिया आपल्याला पत्र लिहून कळवण्यास मी उद्युक्त झालो.

(१) "गझल" हा माझा कवितासंग्रह १९८१ मध्ये प्रसिद्ध झाला या संग्रहात ८५ गझल आहेत. गझल या फॉर्मला 'सध्या' भाव आहे की नाही याचा विचार करून अर्थातच हे लेखन झालेले नाही. १९६८ साली मी माझा पहिला गझल लिहिला. त्यानंतर जेव्हा सुचेल तेव्हा, गेली बारा–तेरा वर्षे मी गझल लिहीत होतो. ते गझल मी माझ्या कवितांच्या इतर संग्रहात घेतले नाहीत. याचे कारण असे की, पुरेसे गझल लिहून झाले को, पुस्तकाच्या रूपाने एक फॉर्म म्हणून ते प्रसिद्ध करावे असे माझ्या मनात होते. गेली दोन तपे मी गीते लिहीत आहे; परंतु यातले एकही गीत अजून मी माझ्या कवितासंग्रहात घेतलेले नाही. चांगले पुस्तक काढण्याइतकी गीते लिहून झाली की गीतांचा सग्रह एक फॉर्म म्हणून प्रसिद्ध करावा असे माझ्या मनात आहे

(२) गझल आणि गीत हे कवितेचे प्रकार आहेत. अनेक रूपांनी, प्रकारांनी कविता व्यक्त होत असते. एखाद्या कवीचा मोठेपणा किंवा आवाका तो किती प्रकार आत्मसात करू शकतो, आपल्या विविध जीवनानुभवाची किती रूपे तो शब्दांतून व्यक्त करू शकतो यावरून ठरतो, असे मला वाटते. कविता ही साधना आहे आणि माझ्यापुढे असलेला या साधनेचा आदर्श असा आहे. दहा-पंधरा गाणी लोकप्रिय झाली किंवा पधरावीस गझल कविसंमेलनात उचलले गेले की आपण सम्राट, बादशहा वगैरे झालो असे कुणीही मानू नये. इतर प्रकारच्या कवितांच्या मानाने गझल किंवा गीत हा मैफिलीत परफॉर्म होणारा प्रकार असल्याने त्यांचा सर्वसामान्य लोकप्रियतेच्या पातळीवर बोलबाला अधिक होतो ही गोष्ट खरी. मी स्वत: कवितावाचनाचे कार्यक्रम सतत करीत असल्याने आणि माझी अनेक गाणी ध्वनिमुद्रित झाली असल्याने हा बोलबाला मी चागलाच अनुभवला आहे; परंतु कवितेच्या साधनेत यातला धोका ओळखणे आवश्यक असते. याचा अर्थ असा मुळीच

ाहीन की गीत किंवा गझल लोकप्रिय झाला म्हणून, तो कलात्मकदृष्ट्या कमी दर्जाचा असतो लोकप्रियता म्हणजे खालचा दर्जा असे गृहीत धरून चालणे चुकीचे आहे कोणत्याही कलाकृतीचे मोल तिच्यातून व्यक्त होणाऱ्या जीवनानुभवाची सखोलता आणि कलात्मकता याच्याच निकषावर अंती ठरत असते. आपल्या लेखात या सदर्भात एक फार चांगले वाक्य आपण लिहिले आहे "स्वार्थाच्या बाजारातून हा कलात्मक विरंगुळा मिळत असेल तर ते चांगलेच आहे; परंतु हेच खरे काव्यवैभव असा आग्रह जेव्हा धरला जातो तेव्हा चिंतनीय परिस्थिती निर्माण होते आणि मराठी गझलच्या या नूतन उत्थानाच्या पार्श्वभूमीवर साहित्यप्रेमीना याची जाणीव होऊ लागली आहे." आपण या वाक्यातून दिलेला इषारा मला महत्त्वाचा वाटतो.

(३) उत्तम गझल किंवा उत्तम गीत आपण ऐकतो तेव्हा श्रेष्ठ जातीचा काव्यानुभव आपण घेत असतो आणि म्हणूनच अखेर चागल्या कवितेला आपण जे निकष लावू तेच गझल किंवा गीत याना लावले पाहिजेत. शेवटी, चागली कविता किंवा वाईट कविता हेच खरे ही गोष्ट विसरून चालणार नाही.

(४) गझल हा कविताप्रकार लिहिताना 'किमान' असे काही नियम मी मानतो. यात वृत्तांचे विविध प्रकार आले आणि द्विपदीची विशिष्ट परंपरासंमत रचना आली. उर्दू गझलांच्या परंपरेतून हे गझल सिद्ध करणारे किमान घटक मी स्वीकारले आहेत. शार्दूलविक्रीडितात १४ ओळी लिहून त्याला सुनीत न म्हणता गझल म्हणा असा आग्रह मी धरणार नाही. इथे मी 'किमान' हा शब्द हेतुपूर्वक वापरीत आहे ही गोष्ट आपल्या ध्यानात आलीच असेल. याखेरीज कोणत्याही परंपरेचे कसलेही ओझे मी गझल लिहिताना उचलून घेण्यास बाधलेला नाही. याचे कारण असे की, अशी ओझी उचलल्याने आपला अनुभव सवेदनशीलतेने न्याहाळण्याच्या, त्याचे जाणवलेले स्वतंत्र रूप अनुभवण्याच्या आणि व्यक्त करण्याच्या सर्जनशील प्रक्रियेला बाध येतो.

(५) गझलमधील प्रत्येक शेर (किंवा द्विपदी) हा स्वतंत्र असतो आणि त्याचा आस्वादही स्वतंत्रपणे घेतला पाहिजे हा दंडकही एक ओझेच आहे असे मी मानतो. अशा तऱ्हेची रचना असलेला गझल हा गझलच नव्हे अशी एकान्तिक भूमिका मी घेणार नाही; परंतु त्याचबरोबर अशी रचना केली नाही तर ती एकपिंडी भावकविता. तो गझल नव्हेच, ही दमदाटी मी मुळीच मानणार नाही कोणत्याही कवितेतून व्यक्त होणारा अनुभव हा कवितेच्या रूपाशी एकात्म असतो असे मानणे ही माझी प्रकृती आहे. प्रत्येक द्विपदी संपूर्ण स्वतंत्र असेल तर तिचा गझलमधील विशिष्ट अनुक्रम असणे या गोष्टीला काहीच अर्थ उरणार नाही. चौथी द्विपदी दुसऱ्या जागी वाचली काय आणि सहावी द्विपदी तिसऱ्या जागी वाचली काय एकच ! माझ्या गीतात किंवा कवितेत किंवा गझलमध्ये कडव्यांचा किंवा ओळीचा जो अनुक्रम ठरवतो तो अनुभव साकार करण्याच्या दृष्टीने अपरिहार्य असतो असे मी मानतो. एक कडवे आधी वाचा किंवा नंतर वाचा—फरक नाही असे मी मानीत नाही. त्यामुळे कडव्यांच्या अनुक्रमात, इतकेच नव्हे तर कडव्यांच्या संख्येत, सुरुवातीत आणि शेवटात एक सर्जनशील योजना मला अभिप्रेत असते ही माझी प्रकृती असल्याने माझे गझल या सर्जनशील प्रेरणेने साकार होतात प्रत्येक शेर स्वतंत्र मानला तर चारच कडवी का आणि सहा का नाहीत या प्रश्नाला उत्तरच मिळणार नाही. प्रत्येक शेर जर स्वतंत्र मानला तर गझल अमुक ठिकाणीच का संपवला, म्हणजे दोन ओळी अधिक का लिहिल्या नाहीत किंवा कमी का लिहिल्या नाहीत या प्रश्नालाही उत्तर देता येणार नाही. दाद घेण्यासाठी, फटाका उडवावा त्याप्रमाणे शेर फेकणे ही पद्धती माझ्या स्वतःच्या प्रकृतीला रुचणारी नाही उर्दूमध्येही सर्वच गझल स्वतंत्र-शेर पद्धतीने रचलेले असतात असे नाही. अनेक गझलांत एकपिंडी आणि तरीही अनुभवाच्या बहुविध छटा व्यक्त करणारी रचनाही आढळून येते.

### वृत्त आणि वृत्ती

(६) श्री. पु. ल देशपांडे यांनी गझल हे वृत्त नसून वृत्ती आहे असे म्हटले हे मुळीच चुकीचे नाही; परंतु हे लक्षण फक्त गझल या काव्यप्रकारालाच लागू आहे असे थोडेच आहे ? मी तर पुढे जाऊन असे म्हणेन की, कुठलीही कविता हे वृत्त नसून वृत्ती आहे. इथे वृत्त हा शब्द एका विशिष्ट दृष्टिकोनातून वापरलेला आहे इथे वृत्त याचा अर्थ यांत्रिकतेने केलेली बाह्य रचना असा आहे. अशा तऱ्हेची यांत्रिक रचना गझलांच्याच काय पण दिंडीपासून शार्दूलविक्रीडितापर्यंत आणि ओवी अभगापासून मंदारमालेपर्यंत कोणत्याही वृत्तात वा छंदात करता येते. खरी गोष्ट अशी आहे की, कुठल्याही चांगल्या कवितेत वृत्त आणि वृत्ती या अभिन्न असतात. अपरिहार्यपणे संयुक्त असतात. कोणीही कवी यापैकी एक गोष्ट अधिक महत्त्वाची आणि दुसरी कमी महत्त्वाची असे मानणार नाही. अनेक तरुण कवी अलीकडे गझल लिहितात. त्यांना मात्र वृत्तसुद्धा महत्त्वाचे असते बरे, असे कळवळून सांगण्याची वेळ आली आहे; इतकी त्याची वृत्तरचना सदोष असते. गझल ही वृत्ती असल्यामुळे आम्ही वृत्ताची पर्वा करीत नाही असे जर हे कवी म्हणू लागले तर कठीण प्रसंग ओढवेल ! या प्रवृत्तीचा धोका ओळखलेला बरा !

(७) 'मराठी गझलचे पुनरुत्थान होण्यास किंचित अनुकूलताही गेल्या दोन महिन्यांत निर्माण झाली असे म्हणता येईल' असे आपण


वैराण मुलखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर याचे
प्रेरणादायी चरित्र

**एक होता कार्व्हर**

**लेखिका : सौ. वीणा गवाणकर**

मूल्य : रुपये पंधरा

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पुणे ३०

लिहिले आहे. गझल–गायनाचे दोन–चार कार्यक्रम झाले ही चांगलीच गोष्ट आहे. आणखीही अनेक कार्यक्रम व्हावे.आपण त्याच्या गुणदोषांसकट त्याचे स्वागत करू या; परंतु 'दोन महिन्यात पुनरुत्थानाची अनुकूलता' हे जरा फारच झाले! माधव ज्युलियन यांच्यापासून गझलचे रूप शोधण्याचा प्रयत्न मराठी कवितेत सुरू आहे. ज्येष्ठ आणि समकालीन प्रमुख कवीपासून अगदी अलीकडच्या नव्या कवीपर्यंत गझल अनेकांनी लिहिले आहेत. ही परंपरा, ही धडपड दोन महिन्यांत झालेल्या कार्यक्रमानी प्रेरित झाली आहे असे म्हणणे ठिसूळ अतिशयोक्तीचे ठरेल. ही परंपरा कोणत्याही मैफिलीकडे नजर ठेवून निर्माण झालेली नाही. माधव ज्युलियन यांनी '*गज्जलांजली*' हे पुस्तक प्रसिद्ध केले; पण गझल हा एकच प्रकार घेऊन ते आत्मप्रशस्तीचे ढोल वाजवीत फिरले नाहीत, ही गोष्ट आपण सर्वांनीच नीट ध्यानात घेतली पाहिजे. माधव ज्युलियन याचे काव्यविश्व अनेक प्रकारांनी समृद्ध आहे, बहुविध आहे. काव्याच्या समग्र साधनेचा एक भाग म्हणूनच कोणताही चांगला कवी एखाद्या प्रकाराकडे वळतो. मग तो गझल असो; सुनीत असो, अभंग असो अथवा गीत असो. त्यामुळे एखाद्या प्रकाराचे महत्त्व जाणूनही हे कवी त्याचा अनाठायी किंवा आक्रस्ताळी उदो उदो करीत बसले नाहीत. पुनरुत्थान वगैरे शब्द उत्साहाच्या भरात वापरताना कवितेच्या ऐतिहासिक विकासाची ही प्रक्रिया आणि परपरा आपल्या नजरेआड होऊ नये असे मला नम्रपणे सुचवावेसे वाटते. माझ्या गझल या संग्रहातले गझल गेल्या तेरा वर्षांत लिहिलेले आहेत असे मी प्रारंभी म्हटले तेही आपण या संदर्भात समजून घ्यावे अशी विनंती आहे.

(८'गझलचा प्राण जणू काही याचौथ्या) ओळीत) एकचतुर्थांश भागात साठवलेला असतो आणि हे जेव्हा मनासारखे जमते तेव्हा गझलकाराला स्वर्गसुखाचा आनंद होत असतो' असे एक वाक्य आपल्या लेखात आहे. या संदर्भात माझा दृष्टिकोन मला व्यक्त करावासा वाटतो. कुठल्याही चांगल्या कवितेचा प्राण अमुक एका विशिष्ट ठिकाणी नसतो, असता कामा नये. एखादा जिवंत माणूस तुमच्या पुढे उभा राहिला आणि त्याचा जीव कुठे आहे ते दाखवा असे तुम्हाला सांगितले तर अमुक एका ठिकाणी बोट ठेवून तो, तुम्ही दाखवू शकाल काय? त्या माणसाचे जिवंतपण त्याचे सर्व अस्तित्वच व्यापून राहिलेले असल्याने एका विशिष्ट ठिकाणी बोट कसे ठेवता येईल? कविता ही अशा समग्र जिवंतपणाची निर्मिती आहे. चौथाईच्या वसूलीसाठी केलेली मुलुखगिरी नव्हे! अर्थात आपल्यालाही याची जाणीव आहे. कारण यानंतरचे आपले वाक्य असे आहे, 'गझल ही अशा प्रकारे कृत्रिम बांधणीची आणि भावचमत्कृतीचा हव्यास असलेली पद्यरचना आहे.'

९) कृत्रिम बांधणी आणि भावचमत्कृती गझलच्या आरोग्याच्या संदर्भात अतिशय योग्य असे निदान आपण केले आहे. गझल हा काव्यप्रकार विकसित व्हायचा असेल तर कृत्रिम बांधणीच्या आणि भाव–कल्पना शब्दचमत्कृतीच्या हव्यासातून गझल सुटला पाहिजे असे मला तीव्रनेने वाटते. यासाठी ती एक गोष्ट अत्यंत आवश्यक आहे आणि म्हणजे कोणत्याही आडाख्यात किंवा फॉर्म्युल्यात गझल बसवण्याचा आणि हा फॉर्म्युला म्हणजेच गझल असे मानण्याचा मोह आवर्जून टाळला पाहिजे. प्रत्येक कवीने आपापल्या प्रतिभेच्या, अनुभवाच्या अटळ प्रकृतीनुसार गझलचे रूप सतत शोधीत राहिले पाहिजे. गझलची रूपप्रसिद्धी ही सतत विकसनशील रहाणारी अशी निर्मितिप्रक्रिया असेल तरच हा फॉर्म अभिव्यक्तीचे एक सर्जनशील माध्यम म्हणून काव्यक्षेत्रात टिकून राहील. नाही' तर' लघुनिबंध या प्रकाराचे प्राक्तन त्याच्या वाट्याला येईल. हसत खेळत सुरुवात, आकर्षक उदाहरणे, चटपटीत भाषाशैली, चमकदार आणि जीवनविषयक तात्पर्य सांगणारा शेवट असा लघुनिबंध या प्रकाराचा फॉर्म्युला तयार झाला आणि शेवटी हा लेखनप्रकार जवळजवळ लुप्त झाला आणि म्हणूनच गझलचा 'संप्रदाय' करू नका. विरोधन्यासात्मक रचना एखादा विशिष्ट अनुभव गझलमधून व्यक्त करताना अपरिहार्य असेल तर ती अवश्य स्वीकारावी. परंतु प्रत्येक द्विपदी ही विरोधन्यासात्मक असलीच पाहिजे, स्वतंत्र–इतर द्विपद्यांशी संबंध नसलेली असलीच पाहिजे हे व्यवच्छेदक लक्षण म्हणून जर आपण ठोकत बसाल तर चलाख फॉर्म्युला हेच गझलचे लक्षण होऊन बसेल आणि सर्जनशीलतेचा पूर्णपणे लोप होईल. गझल ही वृत्ती आहे असे श्री. पु ल. देशपांडे म्हणतात तेव्हा त्यांना या सर्जनशील तत्त्वावरच भर द्यायचा असतो. त्यांच्या वाक्यात वृत्त हे फॉर्म्युलाचे आणि वृत्ती हे आतरिक सर्जनशीलतेचे प्रतीक आहे असेच मी मानतो.

१०) आपण पत्रात अपेक्षा केल्याप्रमाणे मी माझ्या प्रतिक्रिया येथे व्यक्त केल्या. गझल या प्रकाराचा माझे नाव छापलेला झेंडा घेऊन मलाच गझल कसा कळलेला आहे असा घोष करीत मी उभा राहिलेला नाही... माझ्या प्रकृतीशी आणि जीवनानुभवाशी सुसंगत असे या काव्यप्रकाराचे रूप शोधण्याचा माझ्यापरीने मी प्रयत्न केला आहे आणि अजूनही करतो आहे. माझ्या हाताला विशेष काही लागले आहे किंवा नाही हे आजच्या आणि उद्याच्या वाचकानी ठरवायचे आहे. गझल या प्रकाराविषयी मला विलक्षण कुतूहल आहे. गाणे लिहिणे किंवा गझल लिहिणे हे काव्यक्षेत्रात कमीपणाचे आहे असे मी कधीच मानले नाही. कविता लिहिणे हे *माझ्यासारख्या* कवीचे काम. आपल्यासारख्या पंडितांनीच तिच्या स्वरूपाची तत्त्वचर्चा करावी. तो माझा अधिकार नव्हे; परंतु माझ्याविषयी आपण अगत्य दाखवून आस्थेने पत्र लिहिले म्हणून मी हा एवढा प्रपंच केला. कळावे.

११–८–८२ आपला;

मंगेश पाडगांवकर


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०



# बॉक्स ऑफिसचा हुकमी एक्का

# जितेंद्र

## अमिताभच्या स्पर्धेत राहण्यासाठी त्यानं शोधलेलं नवं तंत्र

फिल्मी दुनियेत आज लोकप्रिय असलेला नट उद्याला तितकाच लोकप्रिय राहील याची काही गॅरेंटीच देता येऊ नये इतका फिल्मी दुनियेचा दस्तूर काही औरच आहे. एका रात्रीत होत्याचं नव्हतं होण्याची किमया इथेच घडते. अगदी उदाहरणच घेऊन बोलायचं झालं तर एके काळी अख्खी दुनिया राजेश खन्नावर फिदा होती. इतकी की असं वाटावं राजेशच्या आधी कुणी नट झाला नाही आणि पुढेही बहुधा होणार नाही, पण 'जंजीर'नंतर अमिताभनं कात टाकली आणि लोक राजेशऐवजी 'अमिताभ अमिताभ' करत घुमायला लागले. अमिताभची शानच काही निराळी होती. त्यामुळं त्यानं समकालीन अभिनेत्यांचा पार खुर्दा उडवून टाकला आणि जो तो अमिताभच्या स्पर्धेत टिकण्यासाठी जिवाचं रान करू लागला; पण सुपरस्टार कोणीही असो, फिल्म इंडस्ट्रीतला एक अभिनेता मात्र सुरुवातीपासून आजपर्यंत फिल्म इंडस्ट्रीत आपले पाय घट्टपणे रोवून उभा आहे आणि तो म्हणजे जितेंद्र ! आता जितेंद्र हा फिल्म इंडस्ट्रीच्या दृष्टीनं तसा निरुपद्रवी प्राणी. कारण तो राजेश–अमिताभ इतका टॉपवरही कधी जाऊन पोचला नाहीकी, धवन, धीरज, विजय अरोरा, नवीनसारखा पायथ्याशीही कधी घुटमळत राहिला नाही. त्याची वाटचाल ही बरीचशी स्थिर स्वरूपाची आहे आणि त्यामुळे सुपरस्टारपद जरी त्याला कधी मिळालं नसलं तरी 'बॉक्स ऑफिसवरचा हुकमी एक्का' मात्र निश्चितच ठरला.

जितेंद्रचा पहिलाच चित्रपट 'गीत गाया पत्थरोंने' प्रचंड हीट झाला खरा, पण त्याचा फायदा जितेंद्रला मात्र झाला नाही. नाही म्हणायला 'गीत गाया पत्थरोंने'-पाठोपाठ त्याला चार चित्रपट मिळाले खरे; पण या चारही चित्रपटांचे करार केवळ कागदोपत्रीच राहिले. कारण आज नाही तर उद्या तरी चित्रीकरण सुरू होईल या आशेनं जितेंद्रच्या स्टुडिओत चकरा चालायच्या; पण प्रत्यक्षात मात्र दिग्दर्शकानं दुसऱ्याच नटाला घेऊन तिसऱ्याच चित्रपटाची तयारी चालवलेली असायची. त्याच सुमारास त्याला 'फर्ज' मिळाला आणि अवघ्या पंधरा आठवड्यात तयार झालेल्या 'फर्ज'नं जितेंद्रला कुठल्या कुठे पोचवलं. त्या वेळेस 'फर्ज'ची गाणी, जितेंद्रचा नाच भलताच फेमस झाला होता आणि जितेंद्रच्या नाचांनी लोकांना शम्मी-कपूरची आठवण झाली. त्यामुळे 'फर्ज'पाठोपाठ जितेंद्रवर अशा हल्लागल्ला भूमिकांचा एकच वर्षाव झाला; पण चित्रपटसृष्टीत जितेंद्रचं बूड जरा कुठे स्थिरावतंय न स्थिरावतंय तोच राजेश खन्नानं चित्रपटसृष्टीवर आपली जादू पसरायला लावली होती. जितेंद्रचा 'वारिस' आणि राजेश खन्नाचा 'आराधना' एकाच दिवशी प्रदर्शित झाले होते, पण 'आराधना' जितका यशस्वी ठरला तितकं यश 'वारिस' मात्र मिळवू शकला नव्हता.

'फर्ज', 'गुनाहों के देवता' वगैरे चित्रपटातील जितेंद्रच्या नृत्यानं सगळ्यांचंच लक्ष वेधून घेतलं होतं; पण प्रत्यक्षात हे नृत्य म्हणजे जितेंद्रची निव्वळ 'पोपटगिरी' होती. कारण नृत्यदिग्दर्शकानं दाखवल्याप्रमाणे जितेंद्र अगदी जसंच्या तसं करून दाखवायचा; पण त्याला स्वतःहून नाचायला सांगितलं तर मात्र त्याला काहीही करता येत नसे; पण नृत्याची उपजतच जाण असल्यामुळं नृत्यदिग्दर्शकानं सांगितलेली स्टेप मात्र तो चटकन आत्मसात करत असे. त्यामुळं त्याच्यातील याच गुणाचा फायदा घेतला गेला आणि जितेंद्र आणि धूमधडाका असं समीकरणच तयार

झालं. हृषिकेश मुखर्जींचा 'आनंद' जर त्याच्या वषण्यात आला नसता तर जितेंद्र कदाचित कायमचाच अशा हूल्लागुल्ला भूमिकांच्यात गुरफटला गेला असता आणि शम्मी कपूरची गादी चालवत बसला असता; पण 'आनंद'मधील राजेशच्या भूमिकेनं जितेंद्रला हुरवलं ते गवसल्यासारखं वाटलं. त्यानं ताबडतोब त्याच त्याच प्रकारच्या येणाऱ्या भूमिका नाकारायला सुरुवात केली. सुरुवातीच्या काळात त्याच्या दृष्टीनं हे फार मोठं धाडस होतं; पण तरीही हा धोका त्यानं पत्करायचं ठरवलं. अर्थात याची किंमतही त्याला खूप मोजावी लागली. कित्येक महिने प्रतीक्षेत आणि बेकारीत घालवावे लागले; पण गुलजारनं त्याला 'परिचय'मध्ये वेगळयाच भूमिकेत पेश केलं आणि यात त्याचं लोकानी ज्या उत्साहानं स्वागत केलं, त्यामुळं त्याच्या तपश्चर्येला फळ आलं. त्यापाठोपाठ 'बिदाई' 'नया रास्ता', 'जीने की राह', 'परिवार', 'बडी दीदी' अशी त्याची घोडदौड सुरू झाली आणि एके काळी माकडासारख्या उडया मारत वेडंवाकडं नाचणाऱ्या जितेंद्रनं संवेदनाक्षम भूमिकातून पाडलेली संयत अभिनयाची छाप सगळयांनाच आश्चर्याचा धक्का देऊन गेली. अशा भिन्नप्रकृती भूमिकातच जितेंद्र खरा रमला.

## त्याची शक्कल !

अमिताभच्या आगमनानंतर संपूर्ण फिल्म इंडस्ट्रीवरच 'अँग्री यंग मॅन' इमेजचा शिक्का बसला. अर्थातच बाकीच्या सगळया नटांच्या कारकीर्दीच्या चिंध्या झाल्या आणि यशस्वी होण्यासाठी सगळयापुढे एकमेव मार्ग उरला—अमिताभचं अनुकरण ! तेही प्रेक्षकवर्ग इतक्या सहजासहजी खपवून घेत नव्हता. त्यामुळे अमिताभच्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी सगळयाचीच धडपड चालली होती; पण अमिताभच्या 'अँग्री यंग मॅन' इमेजला शह देण्यासाठी जितेंद्रनं एक नवीनच शक्कल लढवली. त्यानं आपला मोहरा शांतपणे कौटुंबिक चित्रपटाकडे वळवला! कौटुंबिक चित्रपटांना मिळणारा महिलावर्गाचा प्रचंड प्रतिसाद पाहून महिलावर्गाची आवड जोपासण्याचा त्यान प्रयत्न केला आणि त्याची ही चाल यशस्वी ठरली. 'आशा'. 'स्वर्गनरक' 'एक ही भूल', 'माग भरो सजना', 'नीयत', 'जुदाई', 'मेहंदी रंग लाएगी'अशा कितीतरी कुटुंबपटांची नावं वानगीदाखल देता येतील.

एकदा 'अँग्री यंग मॅन' या इमेजला कवटाळल्यानंतर त्या चौकटीतून बाहेर पडणं किती कठीण आहे, हे अमिताभला त्याच्या 'आलाप', 'सिलसिला', 'एक नजर' वगैरे बॉक्स ऑफिसवर दणकून आपटलेल्या सिनेमांनी दाखवून दिलं होतं. त्यामुळं अमिताभ परत मूळ भूमिकाच्या वाटेला गेला नाही. उलट बॉण्ड टाइप भूमिकांचं घोंगडं जितेंद्रनं मात्र अगदी सहजी झुगारून दिलं आणि शांत गंभीर भूमिकात तो सहज चपखलपणे बसला. त्याच्या ह्या भूमिकांची लोकांना इतकी काही सवय झाली होती की, 'ज्योती बने ज्वाला'-मध्ये त्यानं केलेला निगेटिव्ह रोल फारसा पसंत पडला नाही. इतकंच नाही तर अमिताभच्या स्पर्धेत टिकण्यासाठी जितेंद्रनंही असा बेगडी सहारा घेतला असल्याचा आरोपही त्याच्यावर केला गेला; पण वस्तुस्थिती मात्र वेगळीच होती. नकारात्मक भूमिकात प्रेक्षक आपला कसा काय स्वीकार करतात, याचा त्याला अंदाज घ्यायचा होता.

जितेंद्रनं जुन्या अभिनेत्रीपासून नव्यांपर्यंत जवळजवळ प्रत्येकींबरोबर काम केलेलं आहे. हेमामालिनी (खुशबू, किनारा, ज्योती, मेरी आवाज सुनो), जया भादुरी (परिचय), राजश्री (गीत गया पत्थरोने), सुलक्षणा पंडित संकोच) पूनम धिल्लॉं (निशाना), रीना रॉय (आशा), रामेश्वरी (शारदा), जयाप्रदा(लोक-परलोक) मौशमी चतर्जी (प्यासा सावन, स्वर्ग-नरक), रेखा(एक ही भूल, मांग भरो सजना, जुदाई, अपना बना लो, नीयत), शबाना आझमी (रास्ते प्यारके) याशिवाय परवीन बाबी (अर्पण) आणि टीना मुनीम (दिदारे यार) वगैरे अभिनेत्रींबरोबरही तो आहेच; पण ह्यातही त्याची खऱ्या अर्थानं जोडी जमली ती रेखाबरोबरच ! याआधी हेमामालिनीबरोबरही त्याचं ट्यूनिंग बऱ्यापैकी जमलं होतं; पण पुढं मात्र त्यांची जोडी टिकली नाही. जितेंद्र आणि रेखा यांची जोडी आज सर्वात हीट जोडी मानली जाते. रेखाचे अमिताभपेक्षा किती तरी जास्त सिनेमे जितेंद्रबरोबर आहेत आणि या जोडीचे जवळजवळ सगळे सिनेमे हीट झाले आहेत. अमिताभ आणि रेखा यांच्या मध्यंतरी गाजलेल्या प्रेमप्रकरणामुळे रेखा भलतीच गाजत होती आणि त्यामुळं रेखाबरोबर नसलेल्या जोडीचा जितेंद्रला नाही म्हटलं तरी फायदा झालाच. जितेंद्र टिकून राहण्याचं आणखी एक महत्त्वाचं कारण म्हणजे त्याची अच्छी खासी सेहत! इतकी वर्षं फिल्म इंडस्ट्रीत काढूनही जितेंद्रचा चेहरा अजूनही ताजातवाना, तरतरीत आहे. धर्मेन्द्र, राजेश खन्नाप्रमाणे त्याच्या चेहऱ्यावर अजून निबरटपणा आलेला नाही की, संजीवकुमारप्रमाणे त्याच्या फॉर्मचं अजूनही खोबरं झालेलं नाही. त्यामुळं पूनम, टीनासारख्या नव्या नव्या नायिकांबरोबरची जितेंद्रची जोडी अजूनही डोळयांना सुखदायक वाटते.

अमिताभशी आज जितेंद्रची उघड उघड स्पर्धा चालली असली तरी राजेश खन्नाशीही त्याची छुपी स्पर्धा चालूच आहे. 'वारिस' आणि 'आराधना' हे एकाच दिवशी प्रदर्शित होण्यापासूनच या स्पर्धेला सुरुवात झाली होती. त्यानंतर राजेश खन्नाचा 'थोडीसी बेवफाई' आला तर जितेंद्रचा 'जुदाई' आला. एकाच विषयावरचे दोन चित्रपट. जितेंद्रचा 'प्यासा सावन' तर राजेश खन्नाचा 'दर्द'! दोघांच्याही वडील आणि मुलगा अशा दुहेरी भूमिका. राजेशचा 'धनवान', जितेंद्रचा 'ज्योती बने ज्वाला'. दोघांचेही निगेटिव्ह रोल ! दोघांच्याही चित्रपटातील साम्यामुळे उमटलेल्या उलटयासुलटया प्रतिसादात राजेश-जितेंद्र याच्यातील स्पर्धेला चांगलाच रंग भरत होता. त्यातच पुन्हा 'सम्राट' या धर्मेंद्र—हेमामालिनी—राजेश खन्ना यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या मदनमोहन यांच्या चित्रपटात राजेशबरोबर तीन रिळं पूर्ण झालेली असूनही राजेशची उचलबांगडी करून जितेंद्रला घेण्यात आलं, तर 'जानवर' या निर्माता प्रद्युम्न यांच्या चित्रपटातील मुद्दाम जितेंद्रला डोळयासमोर ठेवून लिहिलेली 'टेलरमेड' भूमिका परस्पर राजेश खन्नाच्या झोळीत टाकण्यात आली. दसारी नारायण या दाक्षिणात्य निर्मात्याचं तर जितेंद्रशिवाय पान हलत नाही, अशी अवस्था असताना त्यांनी जितेंद्रला डावलून राजेशला घेतलं. राजेश आणि जितेंद्र यांच्यातील भूमिकांच्या अदलाबदलीच्या सावळया गोंधळात त्यांच्यातील स्पर्धा मात्र चांगलीच उघड झाली.

पण 'एक दूजे के लिए'पासून कमल हसनची अजीब कमाल हिंदी सिनेसृष्टीवर पसरली आणि जितेंद्रला खऱ्या अर्थानं प्रतिस्पर्धी निर्माण झाला. कारण आज

सिनेसृष्टीत जितेंद्रच्या नृत्यकौशल्याला आव्हान देणारं कुणीच नाही आणि दाक्षिणात्य सिनेसृष्टीत नटाबरोबरच नृत्यदिग्दर्शक म्हणून मान्यता पावलेल्या कमल हसनचाही नृत्यात हात धरणारं कुणी नाही त्यामुळे इतर कोणापेक्षाही कमल हसननं सिनेसृष्टीला दिलेली धडक ही जितेंद्रला सर्वांत जास्त घाबरवणारी ठरली. कमल हसन आणि जितेंद्र यांच्यातील स्पर्धेची पहिली ठिणगी पडली ती बरखा रॉय निर्माण करीत असलेली 'सनम तेरी कसम'च्या वेळेस! कारण नृत्यप्रधान अशा या भूमिकेसाठी जितेंद्रशिवाय कुणीच न्याय देऊ शकणार नाही, या खात्रीनं तिनं जितेंद्रलाच ही भूमिका दिली; पण '*सनम तेरी कसम*'साठी डेटस् देण्याच्या बाबतीत जितेंद्रनं केलेली चालढकल पाहून बरखा वैतागली आणि तिनं ही भूमिका सरळ कमल हसनला दिली. एवढंच नाही तर 'फर्ज'पासून मद्रासचा हिंदी चित्रपट म्हटला की, त्याचा नायक जितेंद्रच असला पाहिजे, हे समीकरणच झालं होतं; पण कमल हसनमुळं त्याला हिंदीत तर धोका निर्माण झालाच; पण मद्रासमधील हिंदी चित्रपटांचा एकमेव नायक म्हणूनही जितेंद्रच्या मक्तेदारीला धोका निर्माण झाला. 'माझं स्थान कायम आहे आणि माझ्या स्थानाला कुणीही धक्का लावू शकत नाही' असं जितेंद्र वरवर म्हणत असला तरी मल्लिकार्जुन राव, पूर्णचंद्र राव, टी. रामाराव, दसारी नारायण राव यांना '*जितेंद्रच कशाला हवा, कमल हसन आहेच की*' असा पवित्रा घेतल्यानंतर मात्र जितेंद्र मनातल्या मनात दबकला. अर्थात कमल हसन नुकता नुकता सिनेसृष्टीत आला होता तेव्हा 'कमल हसन जितेंद्रची मोनॉपली संपवणारा' म्हणून खूप गदारोळ उठला होता; पण हळूहळू त्यातली लज्जत कमी होत गेली. कारण कमल, राजेश वगैरे लोकांनी त्याचे सिनेमे लाटायला सुरुवात केली असली तरी जितेंद्र मात्र अजूनही स्थिर आहे.

—शुभदा रानडे

## खास बात

प्रसिद्ध बंगाली अभिनेत्री सुचित्रा सेन हिची मुलगी मुनमुन सेन हिची कहाणीही खूपशी डिम्पलसारखीच आहे. तिनंही एकेकाळी सिनेशौकिनांना आपल्या सौंदर्याची भुरळ घातली होती. त्यानंतर कुणाच्याही ध्यानीमनी नसताना ती घाईघाईनं लग्न करून मोकळी झाली. त्यापाठोपाठ दोन मुलांची आईही बनली. त्यामुळं साहजिकच तिच्यातला Interest कमी होत आला असतानाच तिनं अचानक कात टाकल्यासारखा मॉडेलिंगच्या व्यवहारात प्रवेश केला आणि हळूहळू सिनेमात काम करण्याचा मानसही व्यक्त केला. त्याबरोबर सगळे निर्माते–दिग्दर्शक झोपेतून जागे झाल्यासारखे खडबडून उठले. *आता बंगालीबाबूबरोबरच* मुंबईकर निर्माता–दिग्दर्शकही तिच्या घरी खेटे घालत आहेत. असं म्हणतात की, तिचाच आदर्श डोळ्यासमोर ठेवून डिंपलही परत सिनेमात काम करायला उत्सुक आहे. अर्थात डिंपलनही परत सिनेमात यायचं ठरवताच तिचंही उत्साहानं स्वागत करण्यात आलं; पण मुनमुननं सिनेमात यायचा निर्णय घेतला याला तिच्या नवऱ्याचा काहीही विरोध नाही. कारण बायकोनं मॉडेलिंग करावं नाही तर सिनेमात जावं, त्याचा कशालाच विरोध नाही. उलट डिंपलनं पुन्हा सिनेमात काम करावं याला राजेशचा सक्त विरोध— त्यामुळं डिंपलनं सरळ घटस्फोटाचा मार्ग धरला. याचा शेवट काय होणार कोण जाणे; पण डिंपलच्या पुन्हप्रवेशाविषयी सिनेसृष्टी मात्र खूष आहे. *

---

विज्ञानेश्वरी । डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर

# 'नाही' म्हणण्याचे शास्त्र

कितीही चांगली कविता 'सत्यकथे'कडे पाठवा. यथाकाल नकारघंटा घेत ही कविता परत येते. पंधरा पंधरा दिवस घरात आरशासमोर रंगीत तालीम करून कॉलेजसुंदरीशी बोलावयास जा. मोजके दोन शब्द बोलून ती आपल्याला वाटेला लावते. खूप अभ्यास करून परीक्षेला बसा. आपण नापास होतो, किमान पक्षी आपली श्रेणी तरी हमखास चुकते. या अशा एकेक नकारघंटा घेत, ठेचा खात म्हणा हवं तर, मी लहानाचा मोठा झालो.

तुम्ही घेतलेल्या *या नकारघंटा कदाचित थोड्या वेगळ्या अस*तील. प्रत्येकाची खानदान तशी थोडी वेगळी असतेच! पण तरीही तुमच्या-माझ्या खिशात जमलेल्या 'नाही' या नाण्यांची एकूण संख्या फारशी वेगळी नसेल. आपणाला नकारघंटा देणाऱ्या प्रत्येकावर आपण तेव्हा मनापासून चिडलो होतो. लहानपणी आजीने सांगितलेल्या गोष्टीतील राक्षसाशी मी तरी त्या प्रत्येकाची तुलना करत मोकळा झालो होतो. आपणावर काही लहानपणापासूनचे संस्कार असतात. आपण हसतमुख असावे, पदरमोड करून समोरच्या माणसाच्या भावनांचा प्रथम विचार करावा, वगैरे वगैरे. एक ना अनेक.

हे संस्कार बरोबर घेऊन मोठे होत आपण सामान्यांच्या गर्दीत कुठे तरी उभे राहतो. आपल्याबरोबरची काही बेरकी माणसे आपल्याला मागे टाकून पुढे निघून जातात. *यश आणि अपयश यांच्या* सीमारेषा ओळखता येणार नाहीत इतक्या सफाईने एकमेकांत मिसळून गेलेल्या असतात. आपण या माणसांना नशीबवान समजतो. नशीब हा प्रकार अजिबात नसतोच असे नव्हे; पण 'दैवम् पंचमम्' म्हणणाऱ्या भगवद्गीतेने त्याला वीस टक्क्यांहून अधिक महत्त्व दिलेले नाही. विज्ञानही नशिबाला यापेक्षा अधिक मान देत नाही!

यश-अपयश यांच्या विज्ञानाचा माझा तसा खूप उशीरा परिचय झाला; पण कळत-नकळत त्याची पहिली ओळख झाली ती आचार्य *अत्रे यांच्या 'मी कसा झालो' या पुस्तकात त्यात आचार्यांनी आपल्या* 'बी. टी.'च्या परीक्षेची गोष्ट आपल्या ढंगात सांगितली आहे. कायम तिसऱ्या वर्गाच्या डब्याने प्रवास करणारे अत्रे या परीक्षेत विद्यापीठात पहिले आले! अत्रे म्हणतात, 'या जगात यशस्वी माणसे




तो तेव्हा 'हो' म्हणाली असती तर ?




त्यानं वडलांना वळणावर आणलं...

असामान्य ठरतात. उरलेली असामान्य माणसे सामान्यांच्या गर्दीत कुठे तरी लुप्त होतात. या पहिल्या यशाने लोकांचेच नव्हे तर माझाही माझ्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलून गेला !'

हा स्वतःचा स्वतःकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे फार महत्त्वाचे असते. आपला हा अनेकदा बदलत नाही याचे एक कारण आपणावर लहानपणापासून झालेले संस्कार ! हे संस्कार चुकीचे नसतात; पण ते 'अभिमन्यू 'प्रमाणे आपण मिळवलेले अर्धवट ज्ञान असते. हसतमुख असावे, लोकांच्या भावनांचा आदर करावा, हे विज्ञान म्हणते बरोबर आहे; पण ही फक्त चक्रव्यूहात शिरावयाची कला झाली. लोकांच्या भावनांचा आदर करताना सर्वप्रथम आपणाला लोक समजून स्वतःच्या भावनांचाही आदर करावा लागतो. किंबहुना हसतमुख राहण्याची ती एक किंमत असते. हे चक्रव्यूहात अडकून न पडता त्यातून बाहेर पडण्याचे ज्ञान असते.

हे ज्ञान लोकांना शिकवण्याचा वसा घेतलेले शास्त्रज्ञ आपणाला माहीत नसलेल्या काही मुलखावेगळ्या गोष्टी आपणाला सांगतात. वॉशिंग्टन विद्यापीठात वैद्यकशाखेच्या मानसशास्त्र विभागात प्रोफेसर डॉ. बूथ तर लोकांना यशस्वी कसे बनावे याचे शिक्षण देणारे अभ्यासक्रम चालवतात. त्या अभ्यासक्रमात ते माणसाला फक्त नाही कसे म्हणावे आणि लोकांनी नाही म्हटलेले होय कसे करावे, एवढेच शिकवतात; पण त्यांच्या मते माणसाच्या व्यक्तिमत्त्वात हा 'नाही' फार काही करून जातो. होते काय, समोरचा माणूस दुखावला जाऊ नये म्हणून अनेकदा आपण त्याला 'नाही' म्हणून स्पष्टपणे न कटवता 'होय' म्हणून बसतो आणि हे 'होय' म्हणण्याचे एकदा व्यसन लागले की, आपण स्वतःवर भलती आफत ओढवून घेतो. स्वतःला पटलेल्या विचारांचा आपण अवमान करतो आणि आपल्यात सामान्यपणाची भावना रुजवत आपल्या अपयशाचा पाया खणतो.

प्रोफेसर डॉ. बूथ म्हणतो, तुम्हाला कसे ठसठशीतपणे 'नाही' म्हणता आले पाहिजे. तुम्ही भोवतालच्या लोकांना योग्य वेळी नाही म्हणू शकत नसाल तर लोक तुम्हाला चांगले वगैरे समजतात हा भ्रम सोडून द्या. खरे पाहता तुम्हाला योग्य वेळी, नीटपणे आणि ठामपणे नाही म्हणता येत नसेल तर भोवतालचे लोक खरे पाहता तुम्हाला गृहीत धरून चालतात ! तुम्हाला चक्क अलपटात काढतात! खरे पाहता प्रोफेसर बूथ शिकवतो यात तसे नवे काही नाही. नाही म्हणता येत नाही म्हणून चांदरात फुलवू शकणारा एखादा कवी 'भिडे भिडे ' अध्यक्ष म्हणून मोडीत निघतो आणि अक्षय प्रतिभेचे वरदान घेऊन आलेला फार मोठा कादंबरीकार प्रस्तावनाकार बनतो. हे सारे आपण पाहिलंय; पण न्यूटनच्या पूर्वीही झाडावरून खाली पडणारी फळे सारेजण पाहत होतेच. न्यूटनने त्याला सिद्धांतरूप, सूत्रमय बनवलं.

डॉ. बूथ यांचा अभ्यासक्रम नेमके हेच काम करतोय. भोवतालच्या लोकांनी तुम्हाला गृहीत धरू नये, अलपटात काढू नये म्हणून ठामपणे नाही कसे म्हणावे हे त्यांच्या अभ्यासक्रमात शिकवले जाते. डॉ. बूथ आपल्या अभ्यासक्रमात काय व कसे शिकवतात हे डॉ. डेव्हिड यांनी प्रसिद्ध केलंय. त्यात त्यांनी त्या अभ्यासक्रमात शिकत असतानाची राम आणि शाम यांची गोष्ट सांगितली आहे.

शाम– राम, या रविवारी आपण सहलीला जाउ या. खूप दिवसांत आपण कोठे गेलो नाही. तंबू घेऊन सकाळीच निघू. मी डबा घेतो. दिवसभर जंगलात जाम भटकू !

राम – नको. या रविवारी नको. मी दमलोय.

शाम–रडचा कुठला ! अरे, दमलाहेस तर दोन दिवस विश्रांती घे! पाहिजे तर झोपेची गोळी घेऊन जरा लवकर झोप आणि जंगलात जाऊन तरी आपण कुठे वाघ मारणार आहोत? पत्ते आणि ट्रानझिस्टर घेऊन जाऊ. निसर्गाच्या सहवासात पत्त्याचा डाव मांडू !

राम–अरे, माझ्याजवळचा तंबू मी दुरुस्तीला टाकलाय. त्यातून सोमवारी सकाळी ऑफिसात एक फार मोठा सौदा पटवायचाय.

शाम–अरे, मग तर छानच! रविवारी सहलीत जाम ताजातवाना होशील आणि तंबू वगैरेची काही तरी सबब पुढे मांडू नको ! तंबूशिवाय काही अडत नाही. तुला पाहिजेच असेल तर मी दुसरीकडून तंबूची सोय करतो. उगीच काही तरी खोटया सबबी पुढे करू नकोस! तुला माझ्याबरोबर यावयाचे नाही का ? खरे काय ते मनातले सांग बाबा !

राम–खरं सांगू. तुझ्याबरोबर जंगलात हिंडण्यासारखी मजा नाही; पण या रविवारी नाही. पुढच्या रविवारी. पण या रविवारी मला फक्त घरी आरामखुर्चीत बसून आराम करावयाचाय चहा घेत, सिगारेट शिलगावत. बाबूराव अर्नाळकरांच्या रहस्यकथा वाचत !

साऱ्या वर्गाला हा संवाद सांगून डॉ. बूथ म्हणतात, '**मानवी इतिहासात, मानवी जीवनात, पुन्हा पुन्हा येणारे व फार महत्त्वाचे असलेले तीन शब्द आपण विसरून जातो. ते शब्द म्हणजे स्वातंत्र्य, मालकी आणि आक्रमण.** राम आणि शाम यांचा संवादही खरा या तीन शब्दांभोवतीच नकळत सुरू होता. येणाऱ्या रविवारवर रामची मालकी होती. त्यावर शामचे आक्रमण सुरू होते. कारण नसताना खोटे न बोलता, शामला न दुखवता रामला हे आक्रमण परतून लावावयाचे होते. शाम युक्तिवादात, म्हणजेच लढाईतील साधनसामुग्रीत वरचढ आहे; पण त्यामुळे रामचे काही बिघडत नाही. कारण राम आक्रमण करत नाहीये, तर स्वतःच्या मालकीचे संरक्षण करतोय. त्यामुळे त्याची बाजू श्रेष्ठ आहे. शेवटी नम्रपणे पण ठामपणे नाही म्हणून राम हे आक्रमण परतवून लावतो. हे करताना तो शामला अजिबात दुखवत नाही. त्याच्याबरोबर सहल करण्यात फार मजा आहे हे मान्य करतो. पुढील रविवारी त्याच्याबरोबर जाण्याचे मान्य करतो......खरे म्हणजे तो हळूच शामच्या पुढील रविवारवर थोडेसे आक्रमण करून ठेवतो !

या अभ्यासक्रमाप्रमाणे, स्वातंत्र्य, आक्रमण, मालकी, संरक्षण हे मानवी जीवनातले स्थायीभाव आहेत. बाप-बेटा, आई–लेक, नवरा–बायको, मालक–नोकर या सर्वांपासून आगगाडीतून प्रवास करणाऱ्या दोन उतारूंपर्यंत सर्वांच्यातले संबंध या चार शब्दांभोवती फिरत असतात. तुम्ही जेवढे अधिक जवळचे तेवढे हे शब्द एकमेकांशी अधिक घासतात, कमी नव्हे. ठिणग्या उडण्याचे प्रकार अधिक येतात. पुष्कळदा त्या ठिणग्या फुटत नाहीत मनात साठत जातात. कधी, पुढे–मागे त्या स्फोट करून बाहेर येतात. कधीकधी तुमच्यातले मी पण हरवून टाकतात. मनात स्फोटक दारुगोळा साठलेली वा 'मीपण' हरवलेली माणसे जगात यशस्वी ठरू शकत नाहीत.

डॉ. डेव्हिड यांनी तशी एक विनोदी गोष्ट पण सांगितली आहे. उच्च अभिरुची असलेल्या, स्वच्छतेची, नीटनेटकेपणाची आवड अस-असलेल्या एका फार हुशार प्राध्यापकाचा आठ वर्षांचा मुलगा कुढा

---


# नाझी भस्मासुराचा उदयास्त

**वि. ग. कानिटकर**

**प्रसिद्धी ?**

**किंमत ?**

**चौथी डिलक्स आवृत्ती प्रकाशनाच्या वाटेवर**

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०

MANOOS (Marathi Weekly) Two Rupees Regd. No PNC–W 28
( Licensed to post without prepayment of postage–No. 11)

बनला होता. आणखी काही वर्षांनी हा मुलगा हिप्पी बनला असता; कदाचित संतप्त तरुण बनला असता. मुलगा हुशार होता. डॉ. बूथनी त्याला आपल्या अभ्यासक्रमाला येऊन बसावयाला सांगितले. मुलगा उनाडक्या करत इतरांच्याबरोबर गप्पा-टप्पा मारत बसे.कानावर पडे ते टिपकागदासारखे उलटेसुलटे मनावर टिपून घेई. मुलाला संध्याकाळी क्रीडांगणावर जाऊन मातीत, चिखलात म्हणा हवं तर हुंदडायची आवड होती. बाबांनी त्याला दम देऊन ठेवला होता, 'बाहेर मातीतून खेळून आलास तर कानाखाली आवाज काढीन !' ह्या अभ्यासक्रमाला येऊन बसायला लागल्यावर एक दिवशी मुलगा संध्याकाळी चक्क धुळवड खेळून घरी परत आला. प्राध्यापकमहाशयांचा पारा अचानक वर चढला त्यांनी पोराला झापटले, 'मी तुला सागितले होते, मातीतून खेळून आलास तर मार मिळेल. तू कबूल केले होतेस मी मातीत खेळणार नाही. तू तुझा शब्द पाळलेला नाहीस. मी आता काय करावे ?'—युक्तिवादाने मुलाला त्याची चूक पटवून त्याची धुलाई करावयाचा समंजस प्राध्यापकाचा विचार होता. मुलगा क्षणभर गांगरला; पण एक क्षणच! त्याने बाबांच्याकडे रोखून पाहिले. मग शांतपणे म्हणाला, 'बाबा, मी माझा शब्द पाळला नाही. तुम्हाला पण स्वतःचा शब्द पाळावयाचे कारण नाही !'

प्राध्यापक खरोखरच समंजस होते. त्याच क्षणी मुलाला तसाच बरोबर घेऊन ते प्रोफेसर बूथकडे आले. जे जाणवावयास हवे ते त्यांना जाणवले होते. मुलगा हुशार आहे हे पटले होते. त्याहीपेक्षा तिसऱ्या माणसासमोर काही तडजोड व्हावयास हवी होती. स्वच्छता आणि नीटनेटकेपणा हा बाबांचा स्वधर्म होता. मुलाचा स्वधर्म, सहजप्रेरणा काही वेगळ्या होत्या. हम करेसो कायदा अशी दांडगाई करून बाबा त्याच्यावर काही गोष्टी लादू पहात होते. स्वतःला हरवून बसलेला मुलगा त्यातून उद्या तयार झाला असता. त्यापेक्षा मुलाने ठराविक वेळ मातीत भरपूर खेळावे; पण घरात येताना अंघोळ करून कपडे बदलून बाबांच्या खोलीत यावे अशी दोघांच्याही सहजप्रेरणांचा आदर करणारी वाट निघाली. दोघांच्याही मनावर कारण नसताना येणारे दडपण कमी झाले. एकाला प्रथम नाही म्हणता येत नव्हते. दुसरा प्रथम कारण नसताना अधिक आग्रहाने नाही म्हणत होता. या दोन्हीचीही काही जरुरी नव्हती. कारण नसतानाही दोघांच्याही मनातील तणाव वाढत होते.

कोणतीहि दोन माणसे जवळ येतात त्या वेळी ते दोघे पळण्याच्या रिले शर्यतीत भाग घेतल्याप्रमाणे एकमेकांना मदत करून पुढे जाणार की पायात पाय अडकवून तीन पायांची शर्यत खेळून धबकन, एकमेकांच्या तंगड्या एकमेकांच्या गळ्यात घालून खाली कोसळणार हे या नाही म्हणण्याच्या कौशल्यावर अवलंबून असते. स्वतःच्या भावना, उपजत प्रेरणा समजावून घेऊन ठामपणे पण नम्रपणे नाही म्हणता आले तर कारण नसताना मनातले दाव वाढत जातात. त्यानंतर पुढे जमेल तेव्हा उगाचच नाही म्हणावयाची सवय लागते. आपण योग्य वेळी नाही म्हणू शकलो नाही त्याची तुमच्या सुप्त मनाला लागलेली टोचणी तुम्हाला असे करावयास भाग पाडते. स्वतःच्या हाताखाली काम करणारे लोक वा स्वत.चे सहकारी, जे आपणाला काही त्रास देऊ शकणार नाहीत; त्यांना कारण नसताना नाही म्हणून, मोडता घालून, त्यांचा हिरमोड करून, आपण आपल्या दुखावलेल्या मनाला दिलासा देतो. आपल्या अपयशाचा पाया आपण मजबूत करतो.

डॉ. बूथ म्हणतात, तुम्ही किती झपाट्याने रागावता त्यावरून तुम्ही कितीदा नाही म्हणू शकला नव्हता हे समजू शकते. हे तुम्ही जसे शिकता तसा तुमचा राग कमी होतो. तुमचा चेहरा हसरा बनतो. आपल्या या अभ्यासक्रमात आपण अनेकांना असे शहाणे करून सोडलेय असा डॉ. बूथ यांचा दावा आहे

कचेरीतील सारेजण एखाद्या फंडाला पैसे देत असताना आपण त्याला नाही कसे म्हणावे वा केवळ इतरांपेक्षा आपण वेगळे आहोत हे दाखवण्यासाठी नाही म्हणावयाचा मोह कसा टाळावा, हे त्यांनी शिकवलंय. कारण नसताना आवळ–आपट करणाऱ्या आपल्या आईला मुलीने वा मुलीला आईने सहन करत बसण्यापेक्षा समोरासमोर बसून नाही कसे म्हणावे हे समजावून दिलंय.

डॉ. बूथ यांचे सारेच म्हणणे वा त्यांच्या अभ्यासक्रमात शिकवले जाणारे सारेच काही मला पटते असे नव्हे; पण मला पटण्या-न पटण्यावर वैज्ञानिक सिद्धांतांचे आणि अनुभमानांचे मोल अवलंबून नसते हे मला माहीत आहे. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे मी लहानपणी ऐकलेली 'भीड भिकेची बहीण' ही शिकवणच त्यांनी खरे पहाता शास्त्रीय पद्धतीने सांगितली आहे. हे सारे समजल्यावर मी लहानपणापासून घेतलेल्या नकारघंटांची मी अधिक चांगली मांडणी करू शकतो. माझ्यासारख्या अनेक 'होनहार' कवींच्या कविता न कचरता परत करून सत्यकथेने आपला दर्जा अबाधित राखला ! माझ्यासारख्या अनेक अलबत्या–गलबत्यांशी घो घो गप्पा करावयाचे नाकारून कॉलेजसुंदरीने स्वतःच्या सौंदर्याला शालीनतेची जोड दिली ! प्रथम श्रेणीची खिरापत न वाटता त्या वेळी माझ्या विद्यापीठाने स्वतःचा दर्जा फार वरचा ठेवला !—त्या सर्वांच्यावर मी त्या वेळी तात्पुरता रागावलो तरी मी खरे पाहता मनातल्या मनात त्यांचा कायम आदरच केला. मला सुधारावयास पण मला या नकारांचाच उपयोग झाला. जगात प्रत्येकाला यशस्वी बनावेसे वाटते. प्रत्येक यशस्वी माणूस हा सर्वप्रथम एक यशस्वी विक्रेता असतो हे मात्र आपण विसरतो—जगाच्या बाजारात स्वतःला यशस्वीपणे विकणारा विक्रेता ! यशस्वी विक्रेत्याला नम्रपणे पण ठामपणे समोरच्या माणसाला नाही म्हणता यावे लाग ते. समोरच्या माणसाने वा परिस्थितीने कारण नसताना आपणाला नाही म्हटले तर अक्कलहुशारीने त्या नकाराचा होकार बनवता यावा लागतो. स्वातंत्र्य, आक्रमता, मालकी, संरक्षण हे शब्द सहजपणे रोजच्या जीवनात समजावून घेऊन वागावे लागते. या शब्दांच्यातील आशय नीटपणे समजला तर यश आणि अपयश यांच्यातील नकार ही नेहमीच सीमारेशा असते.

□